॥ नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्बुद्धस्स ॥

पालिपाठ संस्था, मुंबईचे
चवथे पुष्प

सिरीसोमप्पहायरियरइया

# नलकहा

: संपादक :


प्रा. माधव श्री. रणदिवे, एम्. ए.
प्राकृत–पालि–विभागप्रमुख
छत्रपती शिवाजी महाविद्यालय,
कँप सातारा.


मूल्य रु. ५–००

प्रकाशक–पालि पाठ संस्था, मुंबई.
अध्यक्ष–श्री. प्रसेनजित वडवलकर
प्रकाशन विभाग
१२/२४ वरळी, बी. डी. डी. चाळ,
मुंबई–४०० ०१८

जुलै १९७८

मुद्रक– ना. दा. चावरे,
नागरिक छापखाना,
२३०, व्यंकटपुरा, सातारा.

श्रमण संस्कृतीच्या
उपेक्षित पालि प्राकृत भाषांच्या प्रचारार्थ
कार्यप्रवण करणारे
परमपूज्य
आचार्य श्री पद्मसागरसूरीश्वरजी
यांच्या चरणकमली—

— माधव

આ. ભ. શ્રી પદ્મસાગર સૂરીશ્વરજીને [illegible] નમઃ
આ. ભ. શ્રી [illegible]
પ. પૂ. પં. [illegible]
પ. પૂ. [illegible]
પ. પૂ. [illegible]

[illegible]

ને [illegible]
[illegible] છે. [illegible]

ડૉ. અરવિંદ તથા ડૉ. સુભાષ

‘पालि व प्राकृत या लोक-सांस्कृतिक भाषांमधील प्राचीन वाङ्मय हे मानवी मनाची उन्नती करणारे, स्वतंत्र विचारांना चालना देणारे व उच्च नैतिक पातळीवर वावरणारे आहे. अशा वाङ्मयाचा अभ्यास ‘बहुजनहिताय बहुजनसुखाय’ या सर्वमान्य ध्येयाप्रत नेणारा असल्याने, त्याचे संवर्धन व प्रचार भारतीय लोकशाही शिक्षणसंस्थामधून योग्य रीतीने व आग्रहाने होणे अपरिहार्य आहे, याची तीव्र जाणीव शिक्षणतज्ञांना असणे हे खऱ्या लोकजागृतीचे एक लक्षण समजावे.’

( जर्मनी मधील बॉन युनिव्हर्सिटीत पालि व बौद्धदर्शनाचे भूतपूर्व प्रोफेसर आणि जागतिक कीर्तीचे संस्कृत, पालि व प्राकृतचे प्रकांड पंडित. डॉ. व्ही. व्ही. गोखले, पुणे. )

## निवेदन

पालि पाठ संस्था मुंबई, द्वारा 'नलकहा' हे चवथे पुष्प विद्यार्थीवर्ग आणि रसिक वाचकांच्या हाती देताना आम्हाला परम आनंद होतो आहे.

१९७१ साली स्थापना झालेली पालि पाठ संस्था 'श्री प्राकृत भाषा प्रचार समिती, पाथर्डी, प्रमाणेच समतावादी श्रमण संस्कृतीच्या उपेक्षित पालि-प्राकृत भाषांच्या प्रचारार्थ सुरवातीपासून जागरूकतेने कार्य करते आहे. मुंबई येथे आमच्या संस्थेने १९७२ च्या मे महिन्यात अखिल भारतीय पालि साहित्य संमेलन घेतले. मे १९७६ मध्ये मुंबईत तीन दिवस पालि व्याख्यान-माला घेतली. ११ डिसेंबर १९७७ रोजी सातारा मध्ये पालि-प्राकृत-अधिवेशन घेतले.

आमच्या संस्थेने आता प्रकाशन कार्य हाती घेतले आहे. बौद्धधम्म-मानवी जीवनमार्ग या पुस्तिके बरोबर जातकमाला, अगडदत्तचरियं, नलकहा, वज्जालग्गं व अभयक्खाणं ही पालि-प्राकृतची क्रमिक पुस्तके आम्ही प्रकाशित करीत आहोत. पण अनुदानाशिवाय उपेक्षित पालि-प्राकृत भाषेतील पुस्तकांचे प्रकाशन करणे अशक्य आहे. अशा कार्यास अनुदान मिळणेही दुरापास्त झाले आहे. तेव्हा आमचे उपाध्यक्ष प्रा. मा. श्री. रणदिवे यांचे परम मित्र श्री. सुधाकरराव मेंच (सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सातारा येथील ऑफिसर ऑन स्पेशल ड्यूटी) यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाने आम्ही कार्यकारिणी सभेत या पुस्तकांना जाहिरातरूपाने अनुदान मिळवायाचे ठरविले. आमची संस्था श्री. सुधाकरराव मेंच यांची सदैव ऋणी राहील.

प्रा. रणदिवे यांचे परम स्नेही व जैन समाजातील उत्साही कार्यकर्ते श्री. अनिल यशवंतराव नागावकर, निपाणी, यांचा पालि-प्राकृत पुस्तकांच्या प्रकाशनार्थ जाहिरातरूपाने अनुदान मिळवून देण्यात सिंहाचा वाटा आहे. श्री. अनिल नागावकरांचे ऋण आम्ही कधी विसरणार नाही.

कोल्हापूरातील सुप्रसिद्ध व्यापारी श्री. शांतिनाथ तवनाप्पा पाटणे यांनी तवनाप्पा पाटणे पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मधून पाच पुस्तकांना मिळून रु. १०० अनुदान दिले आहे. ,त्याबद्दल संस्था त्यांची ऋणी आहे.

आम्हाला जाहिरात व शुभेच्छा रूपाने अनुदान देऊन या उपेक्षित पालि-प्राकृत पुस्तकांच्या प्रकाशनार्थ ज्यांनी मोलाची मदत केली. त्या सर्वांचे आम्ही अंत:करणपूर्वक ऋणी आहोत. जयसिंगपुरचे व्यापारी श्री. आण्णासाहेब गुंडे, सातारचे श्री. हिंमतलाल हिरण, कोल्हापूरचे श्री. माधवराव राऊत आदि मित्र आणि नागरीक छापखान्यातील सर्व कामगार यांचे आम्ही ऋणी आहोत.

विशेष म्हणजे या पुस्तकांना आकर्षक करण्याचे महत्त्वाचे कार्य सैनिक स्कूल सातारा मधील थोर चित्रकार श्री. शेरसिंग कुक्कल यांचे आम्ही हार्दिक आभार मानतो.

ही पुस्तके शिवाजी विद्यापीठाच्या भाग २ व भाग १ च्या अभ्यासक्रमास मंजूर झाली आहेत.

प्राकृत पालि भाषाच्या प्रचाराचे अविरत कार्य करीत असलेले पालि प्राकृत भाषांचे व्यासंगी अभ्यासक आमचे उपाध्यक्ष प्रा. मा. श्री. रणदिवे यांनी ही पुस्तके मराठी भाषांतरासह विद्यार्थ्यांना उपयोगी पडतील व इतरेजनांनाही मनोरंजक व बोधपर होतील या दृष्टीने संपादित केलेली आहेत. संस्थेला ती प्रकाशित करताना अभिमान वाटतो. तेव्हा विविध ठिकाणच्या शाळा, कॉलेजच्या लायब्ररी व स्वत:करिता ही पुस्तके विकत घेऊन जनतेने संस्थेला उपेक्षित पालि प्राकृत भाषांच्या प्रचारार्थ साहाय्य करावे ही नम्र विनंती.

पालि पाठ संस्था
९४/२४ वरळी बी. डी. डी. चाळ
मुंबई – १८
२१–७–१९७८

आपला नम्र
प्रसेनजित वडवलकर

# ग्रंथकार

प्रस्तुत ' नलकहा' ( नलकथा ) कुमारपालप्रतिबोध या कथात्मक ग्रंथातून घेतली आहे. या ग्रंथाचे कर्ते सोमप्रभाचार्य. ते वैश्य जातीतील प्राग्वाट किंवा पोरवाड पंथातील होते. ते जिनदेवाचे नातू आणि सवंदेवांचे सुपुत्र होत. त्यांनी बालपणीच जैनधर्म स्वीकारला. विजयसिंहाचे ते शिष्य पट्टावलीनुसार ते भ. महावीरानंतर ४३ वे आचार्य होते. ते संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश भाषेतील प्रभावी लेखक होते.

त्यांचा समय – सोमप्रभाचार्यांचा निश्चित जीवनकाळ आपणास सांगता येत नाही. तरी पण काही गोष्टीवरून त्यांच्या समयाचा अंदाज करता येतो. कलिकालसर्वज्ञ हेमचंद्राचार्य ११७२ इसवी आणि राजा कुमारपाल ११७४ इसवी मरण पावले. सोमप्रभाचार्यांनी कुमारपालप्रतिबोध हा ग्रंथ ३ जून ११८४ रोजी पूर्ण केल्याचा उलेख आहे. कुमारपालानंतर इ. स. ११७४ ते ११७९ पर्यंत होऊन गेलेल्या अजयदेव आणि मूळराज या दोन राजांचा सोमप्रभाचार्यांनी उल्लेख केला आहे. यावरून त्यांचा काळ साधारण शेवटचे अर्धे १२ वे शतक मानता येईल.

## यांची ग्रंथसंपत्ती

१) कुमारपालप्रतिबोध— अणहिलपुर (पाटण) येथील श्रीपाल कवीच्या घरात शेठ अभयकुमारांची मुले हरिश्चंद्र आणि श्रीदेवी यांना उपदेश देण्याकरिता सोमप्रभाचार्यांनी कुमारपालप्रतिबोध हा प्राकृत, संस्कृत व अपभ्रंश भाषांतील गद्य-पद्य मिश्रित प्रदीर्घ असा कथाग्रंथ रचला. यात कलिकालसर्वज्ञ हेमचंद्राचार्यांनी गुर्जराधिपती कुमारपाल राजास बोध करण्यासाठी पाच

प्रस्तावात चोपन्न कथा सांगितल्या. त्यामुळे धर्मजागृती निर्माण होऊन ते सम्यक्त्वी बनले.

२) सुमतिनाथचरित्र- पाचवे तीर्थंकार भ. सुमतिनाथ यांचे त्यांनी प्राकृतात प्रदीर्घ चरित्र लिहिले. त्यात ९५०० हून अधिक गाथा आहेत.

३) सुक्तिमुक्तावली-भर्तृहरीच्या नीतिशतकाप्रमाणे त्यांनी संस्कृतात १०० श्लोकांचा संग्रह केला. तो सिंदूरप्रकर किंवा सोमशतक या नावाने प्रसिद्ध आहे.

४) शतार्थकाव्य- त्यांनी वसंततिलकावृतात एकच संस्कृत श्लोक लिहिला. तसेच त्यावर १०० वेगवेगळे अर्थ विशद करणारी टीकाही स्वतःच लिहली. त्यात २४ तीर्थंकर, ब्रम्हा-विष्णू-महेश सारखे देव, अजितदेव, विजयसिंह, हेमचंद्रादि जैन मुनी, जयसिंह, कुमारपाल, अजयदेव, मूलराजा हे राजे आणि स्वतः सोमप्रभांचाही त्यांनी नामनिर्देश केला आहे. या एकाच श्लोकावरून व त्यावरील टीकेवरून त्यांचे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व सिद्ध होते. त्यामुळेच त्यांना शतार्थिक किंवा शतार्थी म्हटले आहे.

त्यांची दुसरीही एखादी कृती असावी. पण ती अद्याप हाती आली नाही. कारण शतार्थ काव्यात कुमारपाल राजाला उद्देशून त्यांनी दोन श्लोक लिहिले आहेत. त्याबाबत ते 'यदवोचाम' (जसे आम्ही दुसरीकडे सांगितले) असे म्हटले आहे. पण हे श्लोक वरील कोणत्याही ग्रंथात आढळत नाहीत.

## नलकथा

द्यूत ! जुगार ! किती भंयकर व्यसन ! द्यूताच्या दुष्परिणामाचे विवेचन करण्यासाठी कलिकालसर्वज्ञ हेमचंद्राचार्यांनी गुर्जराधिपती कुमारपाल राजाला द्यूतासक्त नळ राजाची कथा सांगितली. १२ व्या शतकात होऊन गेलेल्या सोमप्रभाचार्यांनी ही कथा जैनमहाराष्ट्रीय भाषेत गद्यपद्यात्मक चंपू स्वरूपात सुलभ व आकर्षक शैलीत लिहिली आहे.

सुप्रसिद्ध इक्ष्वाकु कुळातील महाप्रतापी राजा निषध कोशला राजधानीमध्ये राज्य करीत होता. सुंदरी त्याची महाराणी. तिच्यापासून त्याला नळ आणि कूबर नावाचे दोन पुत्र झाले.

इकडे विदर्भदेशाच्या कुंडिनपुरामध्ये प्रभावशाली भीमरथ राजा राज्य करीत होता. अंतःपुराला भूषणभूत झालेल्या पुष्पदंती महाराणीपासून त्याला सुंदर कन्या झाली. तिच्या कपाळावर स्वाभाविक असा तिलक होता. त्याचा प्रकाश सूर्याप्रमाणे तेजाने झळाळत असे. ती गर्भात असताना राजाने सर्व शत्रूंचे दमन केले म्हणून तिचे नाव दमयंती असे ठेवले. योग्य वेळी कलाचार्यांनी तिला विविध कला व सर्व धर्मशास्त्राचे शिक्षण दिले. अत्यंत बुद्धिमती असल्यामुळे आरशात प्रतिबिंबित झाल्याप्रमाणे ती सर्व विद्येत लवकरच पारंगत झाली. आपल्या प्रभावी वाणीने प्रवचन देऊन तिने आपल्या आईवडीलांना सम्यक्त्वी बनविले.

तारुण्यात पदार्पण करताच तिचे रूपलावण्य अधिकच फुलले. अशा अप्रतीम सौंदर्यशालिनी कन्येला कुलरूपगुणादींनी अनुरूप वर मिळावा म्हणून भीमरथ राजाने दूत पाठवून ठिकठिकाणच्या राजेराजपुत्रांना दमयंतीच्या स्वयंवराकरिता निमंत्रण दिले.

भव्य स्वयंवर मंडप उभारण्यात आला अंतःपुरातील द्वारपालिका भद्रे सह राजकुमारी दमयंतीने स्वयंवर मंडपात प्रवेश केला. मंडपात उत्तमोत्तम आसनावर विराजमान झालेले राजे-महाराजे आश्चर्याने आणि अभिलाषेने लावण्यलतिका राजकुमारीकडे एकटक पाहू लागले.

चतुरा भद्रा बल, सिंह, महेंद्र, जयकोश, जय, वीरमुकुट, पद्मनाभ अशा राजा-महाराजांच्या वैभव-पराक्रम, आदींचे गुणगाऊन योग्य वाटणाऱ्या राजास वरण्यास राजकुमारीला सांगू लागली. पण प्रत्येकापुढून दमयंती नाराजीने पुढेच जाऊ लागली. ज्याच्या दर्शनाने आपले हजार डोळे सफल झाले असे इंद्राला वाटले त्या नळाचे अप्रतीम सौंदर्य पाहून दमयंतीने नळाच्या गळ्यात वरमाला घातली. तिने उत्तम वर निवडला म्हणून चोहोंकडून तिची स्तुती होऊ लागली. पण मत्सरामुळे कृष्णराजाने निषेध केला. तो युद्धास उभा राहिला. दमयंतीच्या अरिहंतावरील परम भक्तीमुळे शासनदेवतेच्या प्रभावाने कृष्णराजा निस्तेज झाला. तलवार हातातून खाली पडली. नळ राजा सामान्य नाही, अशी खात्री होऊन कृष्ण राजाने अपराधाची क्षमा मागितली. उदार नळाने त्याला सन्मानाने निरोप दिला. विधिपूर्वक विवाह समारंभ आटोपला. हत्ती, घोडे, आदि सह विपुल द्रव्य नळास आंदन म्हणून मिळले.

सासरी जाताना प्रेमळ पुष्पदंती महाराणीने आपल्या लाडक्या कन्येला वडिलधाऱ्यांशी विनयाने वागण्यास व सावलीप्रमाणे पतीच्या संगतीत राहून त्याची सेवाकरण्यास सांगितले.

नळ दमयंतीला घेऊन मोठ्या वैभवाने चतुरंग सेनेसह आपल्या राजधानीकडे निघाला. त्यावेळी वेगात जाताना सैन्याच्या पादाघातांनी वर उडत असलेल्या धुळीमुळे वातावरण झाकाळून आकाश काळवंडले. मार्ग दिसेनासा झाला. तेव्हा नळाच्या सूचनेप्रमाणे दमयंतीने कपाळावरील तिलकास स्पर्श करून प्रकाश पाडला. त्या प्रकाशात ते सर्वजण राजधानीत आले. कोशलापुरीत भव्य जिनमंदिरे असल्याचे ऐकून दमयंतीला अत्यानंद झाला.

जनता नल–दमयंतीचे मोठ्या हर्षाने व उत्साहाने स्वागत करू लागली. मांगलिक तूर्यवाद्यांच्या जयघोषांत त्यांनी राजधानीत प्रवेश केला. आईवडिलांच्या शुभाशीर्वादाने नल व दमयंती विविध क्रीडा करीत सुखाने कालक्रमणा करू लागली.

योग्य समयी निषध राजाने नळाला राज्यावर बसविले. कुबराला युवराजपद दिले. स्वत: विरागी बनून दीक्षा घेतली. विधीपूर्वक विहार करीत तो दक्षतेने मुनिधर्म पाळू लागला.

निषध २/३ भारतवर्षाचा राजा होता. तक्षशीलेच्या कदंब राजाचा विरोध असल्यामुळे नळ राजाने त्याच्यावर स्वारी करून त्यास पराजित केले. कदंब राजा संसारविरक्त बनला. त्यास विनयाने वंदन करून नळ राजाने त्याचा सुपूत्र जयशक्ती यास तक्षशीलेच्या गादीवर बसविले. सर्व राजांनी भारतार्धाचे अधिपती म्हणून नळ राजाचा राज्याभिषेक केला. त्याची आज्ञा शिरसावंद्य मानण्याचे सर्वांनी मान्य केले.

कूबर राज्यप्राप्तीची संधी पाहत होता. तो रोज नळाबरोबर द्यूत खेळे. नळ द्यूतासक्त झाला. एकदा उलटे फासे पडू लागले. नळ द्रव्याबरोबरच गावे, व्यापारी शहरे, नगरे हरू लागला. दमयंतीने व मंत्र्यांनी नळास द्यूतक्रीडेपासून परावृत्त करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. सन्निपात झालेल्या माणसाजवळ औषधाचा काय परिणाम होणार? शेवटी नळराजा सर्व राज्य स्वत:च्या अंगावरील अलंकार आणि दमयंतीसह अंत:पुर हरवून बसला.

संकटातही नळ धैर्यशील बनून राज्य सोडून निघाला. त्याच्या मागून जाणाऱ्या दमयंतीला कूबराने आपले अंतःपुर भूषविण्यास अडविले. आपल्या शील-प्रभावाने सती दमयंती जाळून भस्म करेल, असे मंत्र्यांनी सांगताच कुबराने तिला जाऊ दिले. फुलासारख्या नाजूक दमयंतीला सुकोमल अनवाणी पावलांनी दुर्गम, तप्त व काटयाकुटयांनी भरलेला रस्ता कसा चालवेल ? म्हणून मंत्र्यांच्या विनवणीवरून नळराजा दमयंतीसह रथात बसला. सारथी रथ हाकू लागला. प्रजा शोकाकुल झाली.

जात असतानाच नळाने नगरीतील पाचशे हात उंचीचा खांब सहज लीलेने उखडला व पुनः तेथेच उभारला. पूर्वी दिव्यज्ञानचक्षू मुनींनी केलेले भाकित खरे ठरले पण नळ जिवंत असता दुसरा राजा कोशलामध्ये कसा राज्य करू शकेल ? अशी लोकांना शंका आली.

दमयंतीच्या सांगण्याप्रमाणे रथ कुंडिनपुराकडे निघाला. वाघ-सिंहासारखी हिंस्र श्वापदे विषारी नागांनी युक्त अशा भयानक अरण्यांतून जात असता भिल्लांनी अचानक त्यांच्यावर हल्ला केला निधड्या छातीचा नळ तलवार घेऊन युद्धाकरिता सामोरा गेला. तेव्हा त्याची विजयी तलवार कोल्हयासमान असलेल्या या क्षुद्र भिल्लांच्या रक्तानें विटाळली जांऊ नये म्हणूण दमयंतीने त्याचा हात धरला. आपल्या शीलप्रभावाने तिने दुःसह असा हुंकार सोडला. त्याबरोबर सिंहगर्जनेने पळणाऱ्या हरिणाप्रमाणे ते सर्व भितीने पळून गेले. मात्र जाताना रथ व सारथी यांना त्यांनी नेले.

आता नळ दमयंतीसह अरण्यातून निघाला. तिच्या मस्तकावर असलेले राजचिन्ह पट्टवस्त्र काढून त्याने तिचे रक्तबंबाळ पाय बांधले, थकलेल्या दमयंतीला त्याने द्रोणातून पाणी आणून दिले. नेसत्या वस्त्राच्या टोकाने तो तिला वारा घालू लागला. १०० योजनांचे दीर्घ व भयानक अरण्य त्यांनी अवघी पाच योजने ओलांडले होते. त्यांचे दुःख पाहून जणू लज्जित होऊन सूर्यही पर्वताआड निघून गेला. नळाने अशोक पालवीची शय्या तयार केली. त्यावर आपले अर्धे वस्त्र पसरले. पंचपरमेष्ठी मंत्राचा जप करून दमयंती निद्राधीन झाली. नळ पहारा करू लागला.

संकट समयी सासऱ्याच्या आश्रयाला जाणे नळाला नामर्दपणाने वाटले. मन कठोर करून त्याने सर्व संकटांना एकटयाने तोंड देण्याचा निर्धार केला.

खंजिराने अर्धे वस्त्र कापून त्याने दमयंतीच्या पदरावर आपल्या रक्ताने लिहिले--या वटवृक्षाच्या उजव्या बाजूस विदर्भाला जाण्याचा व डाव्या बाजूस कोशलाला जाण्याचा मार्ग आहे. तिने कोणत्याही मार्गाने जावे. तो रात्रीच निघाला. पण दमयंती भुकेल्या श्वापदांचे भक्ष्य होऊ नये म्हणून तो परत विचार करून तो सकाळी निघून गेला.

पहाटे दमयंतीला स्वप्न पडले. फळांनी लहडलेल्या आम्रवृक्षावर चढून दमयंतीने मधुर फळे खाल्ली. तोच एका रानहत्तीने ते झाड उखडून टाकले. ती जमिनीवर पडली. सकाळी ती जागी झाली. जवळ नळ न दिसल्यामुळे ती बावरून गेली. तिने स्वप्नाचा अर्थ लावला तो असा—बहरलेला आम्रवृक्ष म्हणजे नळ. फळांचा अस्वाद म्हणजे राज्योपभोग. आम्रवृक्ष उखडला जाणे म्हणजे नळ राज्यावरून भ्रष्ट होणे. ती जमिनीवर पडणे म्हणजे नळापासून वियोग होणे

दमयंती नळविरहाने शोक करू लागली. तोच रक्ताने लिहिलेली पदरावरील अक्षरे वाचून तिला समाधान वाटले. नळाने आपला त्याग न करता आदेश दिला आहे. म्हणून तिने पित्याकडे जाण्याचा निश्चय केला. ती कुंडिनपुराच्या रस्त्याने निघाली.

तिच्या शीलप्रभावाने सिंह, हत्ती, अग्नी, नाग, भूतपिशाच्चादि तिला उपसर्ग न करता निस्तेज बनून दूरून जाऊ लागले. वाटचालीने ती अत्यंत थकली. तोच एक व्यापारी तांडा तिच्या दृष्टीस पडला. तिला हायसे वाटले, पण भयंकर चोरांनी अचानक चोहोंकडून तांड्यावर हल्ला केला. धनुष्याच्या टणत्काराने कावळे उडून जावेत, तसे तिच्या हुंकाराने घाबरून चोर पळून गेले.

अवचित कोसळलेल्या प्राणघातक संकटातून आपणास वाचवले म्हणून तांड्यातील लोकांसह सार्थवाहाने तिला माता मानून वंदन केले. ती नळ महाराजांची पट्टराणी असल्याचे ऐकून त्यास धन्यता वाटली. त्याने तिला आपल्या निवासस्थानी नेले.

मुसळधार पाऊस तीन दिवस पडू लागला. पाऊस थांबताच दमयंती तांडा सोडून एकटीच निघाली. समोर प्रत्यक्ष कृतांतकाळच असा काळाकभिन्न शस्त्रधारी राक्षस उभा. पतीशिवाय आपले जीवन व्यर्थ आहे. तेव्हा मरणच दुःखातून सोडवेल. म्हणून ती मोठ्या आनंदाने सात दिवस उपवाशी असलेल्या

राक्षसाचे भक्ष्य होण्यास तयार झाली. तिच्या धैर्याने खूष होऊन त्याने तिला सांगितले, 'प्रवास दिवसापासून बारा वर्षांनी स्वतःच नळ तुझ्या पित्याच्या घरी येऊन तुला भेटेल.' आपल्या दैवी प्रभावाने एका क्षणात तिला पोहोचवण्यास तो तयार असताही त्या सतीने विनयाने त्याचे म्हणणे नाकारले. देवाचे तेजःपुंज शरीर प्रकट करून तो राक्षस अदृश्य झाला. तेव्हा नळ भेटेपर्यंत लाल कपडे, पानाचा विडा, अलंकार, विलेपन आणि उन्मादक आहार न घेण्याचे तिने व्रत घेतले. बीजरहित फलाहार करून ती भ. शांतिनाथांचे ध्यान करीत एका पर्वतगुंफेमध्ये जाऊन बसली.

तांड्यात दमयंती न दिसल्यामुळे सार्थवाह तिचा शोध करीत पर्वतगुंफेपाशी आला. ध्यान संपताच ती त्याच्याशी बोलू लागली. त्याचे बोलणे ऐकून तेथील तपस्वी तेथे आले. ती सर्वांना धर्मोपदेश करू लागली. त्याच वेळी मुसळधार पाऊस पडू लागला. तिने शीलशापना ( शीलाची शपथ ) घेतली. त्यामुळे तिने त्यांच्या भोवती मारलेल्या गोलाकार रेषेबाहेर पाऊस पडू लागला. त्या चमत्कारामुळे ती कोणी देवता असावी अशी सर्वांची समजूत झाली. ती सर्वज्ञ, निर्दोष व हितोपदेशी अशा अरिहंताचे ध्यान करीत असल्यामुळे निर्भय होती सद्देव सद्गुरू आणि सद्धर्माचे स्वरूप ऐकून सर्वांनी जिनधर्म स्वीकारला. येथे तपस्वी आत्मजागृत झाले म्हणून सार्थवाहाने तापसपुर नावाचे नगर वसवले. १६ वे तीर्थंकर भ. शांतिनाथांचे भव्य मंदिरही बांधले.

एकदा मध्यरात्री तिने पर्वतशिखरावर सुप्रभातीच्या सूर्याप्रमाणे प्रकाश पाहिला आणि देव करीत असलेला जयजयकार ऐकला. लोकांसह ती पर्वतावर चढली. तेथे देव सिंहकेसरी मुनींचा केवलज्ञानप्राप्तीचा उत्सव करीत होते. त्याच वेळी सिंहकेसरी मुनीवर्यांचे जयभद्र नावाचे गुरू तेथे आले. सर्वांनी वंदन केल्यावर केवली संसाराचे आसार स्वरूप विषद करणारा धर्मोपदेश देऊ लागले.

इतक्यात आकाश प्रकाशित करीत तेथे एक देव आला. केवलीना वंदन करून त्याने दमयंतीला आपली पूर्वजीवनकथा सांगितली. तेथेच तापसवनात तो कुलतींचा कर्पर नावाचा उग्र तपाचरणी शिष्य होता. पंचाग्नीतप साध्य करूनही कोणी त्याचे अभिनंदन केले नाही. म्हणून क्रोधाविष्ट होऊन तो दुसरीकडे निघाला. रात्री काळोखात पर्वतदरीत पडून अत्यंतिक वेदना सहन

करीत' तो सात दिवसांनी मरण पावला. मरणसमयीच्या द्वेषयुक्त क्रोधामुळे त्या तापसवनात तो साप झाला. दमयंतीला दंश करण्याकरिता पुढे धावला. अपराजित अशा पंचपरमेष्ठी मंत्राच्या जपामुळे त्याची गती रोखली गेली तो परत बिळात गेला. क्रोध, मान, माया, लोभ या अनंतानुबंधी कषायामुळे पुढील जन्मी तिर्यंच गती मिळून किती दुःख भोगावे लागते, असा तपस्व्यांना देत असलेला हितोपदेश ऐकून जातिस्मरण होऊन त्याने दुराचाराची निंदा करीत आमरण अनशन स्वीकारले. तिच्या धर्मप्रभावामुळे आत्मजागृत झाल्याने तो सौधर्मस्वर्गात कुसुमप्रभ नावाचा देव झाला आणि त्या धर्ममातेच्या दर्शनाला आला. ते सापाचे कलेवर झाडावर लटकवून, 'जो क्रोध करील त्यास कर्पराप्रमाणे सर्पगती मिळेल,' असे सांगितले.

कुलपतीच्या विनवणीने केवली आपली जीवनकथा सांगू लागले. सिंहकेसरी म्हणजे कोशलनगरीतील कूबराचे सुपुत्र. पित्याच्या अनुज्ञेने भंगाधिपती केशरी राजाच्या बंधुमती कन्येशी विवाह करून तो तिच्यासह परत जात होता. वाटेत जयभद्राचार्यांचा धर्मोपदेश ऐकून त्याने आपले जीवन किती आहे असे विचारले. केवळ पाचच दिवस आयुष्य राहिलेले ऐकून त्याने आचार्यांपाशी संसारविरक्त होऊन मुनिदीक्षा घेतली. शुक्ल ध्यानाने घातीकर्मांचा नाश करून ते केवली झाले. शेष अघातीकर्मांचाही नाश होऊन ते मोक्षाला गेले. देवांनी त्यांच्या शरीराला अग्नीसंस्कार केला. कुलपतीने यशभद्राचार्यांपाशी दीक्षा स्वीकारली.

आचार्यांनी दमयंतीचे नळाशी पुनर्मिलन होणार असल्यामुळे तिला दीक्षा दिली नाही. आचार्य तापसपुराला गेले. धर्मपरायण दमयंती पर्वतगुंफेत राहून आत्मसाधना करू लागली. अशा रीतीने सात वर्षे झाली.

एकदा 'दमयंती, मी अमक्या ठिकाणी तुझ्या पतीला पाहिले,' हे एका प्रवाशाचे शब्द ऐकून ती हर्षाने गुंफेतून बाहेर आली. पण तिला कोणी दिसले नाही. उदास मनाने शोक करीत ती परत गुंफेकडे जात असता एक विकराळ राक्षसी तिला खाण्याकरीता पुढे आली; पण तिच्या शीलप्रभावाने तिला मागच्या मागे निघून जावे लागले.

आता ती गुंफेकडे न जाता पुढेच निघाली. टाचेचा प्रहार करताच

शीलप्र. ावामुळे निर्माण झालेले पाणी पिऊन ती पुढे चालली. विसाव्यासाठी अशोक झाडाखाली बसली.

तांड्यातील लोकांनी तिची विचारपूस करून तिला धनदेव सार्थ-वाहाकडे नेले. तिने त्यास आपण वणिक-कन्या असून अरण्यात झोपल्या वेळी पती आपणास सोडून गेल्याचे सांगितले. तिला कन्या मानून अत्यंत सन्मानाने तिला घेऊन तो तांड्यासह अचलपुराकडे चालला.

एकदा रम्य गिरिकुंजामध्ये वसती केली असता रात्री तिने कोणीतरी पंचनमस्कार मंत्र जपत असल्याचे ऐकले. तो आपला धर्मबांधव मानून ती धनदेवासह त्याच्यापाशी गेली. तो होता कांची नगरीचा व्यापारी. धर्मगुप्त ज्ञानी मुनींच्या हितोपदेशाने भ. मल्लिनाथ तीर्थंकरांच्या जिनबिंबाची तो रोज विधीपूर्वक पूजा करी. त्याने तिला बहिण मानले.

दमयंतीला अचलपुरात सोडून सार्थवाह पुढे गेला. तहान लागल्यामुळे ती विहिरीपाशी गेली. तेथील स्त्रियांना ती जलदेवीप्रमाणे दिसली. विहिरीच्या काठावर गोधासापाने तिचा डावा पाय धरला. पण नमस्कारमंत्राच्या प्रभावाने ती मुक्त झाली. पाणी पिऊन ती खिन्न मनाने तेथे बसली.

अचलपुरात ऋतुपर्णराजा चंद्रयशेसह राज्य करीत होता. दासींनी दमयंतीचे अप्रतीम रूप पाहून महाराणीला तिच्याविषयी सांगितले. तिला राजवाड्यात आणतील. तिने आपण वणिककन्या असून पतीने आरण्यात सोड-ल्याचे सांगितले. राणीने तिला आपली मुलगी मानले. दमयंतीने आदराने तिला प्रणाम केला.

चंद्रयशा महाराणी दानशाळेत याचकांना भोजनादी दान देववीत असे. आपला पती कदाचित भोजनाकरिता आल्यास ओळखता येईल, म्हणून महा-राणीच्या संमतीने ती दान देऊ लागली. 'असा रूपवान पुरुष तुम्ही पाहिला का ? अशी ती पतीबद्दल याचकांकडे विचारपूस करू लागली.

एकदा चंद्रावती राजकन्येच्या रत्नजडित सुवर्णालंकारांचा रत्नकरंडक चोरून नेत असलेल्या चोराला मृत्युदंडाची शिक्षा सुनावल्यामुळे कोतवाल त्यास वधस्थानाकडे नेत होता. त्यावेळी दमयंतीस पाहून चोर तिला शरण गेला. सुष्टांचे रक्षण व दुष्टांचे पारिपत्य करणे हा राजधर्म असला तरी क्षमाशील दमयंतीने त्याच्याविषयी दया येऊन शीलप्रभावाने त्याचे बंधन तोडले.

तो चोर म्हणजे तापसपुरातील वसंत व्यापाऱ्याचा पिंगलक नावाचा सेवक. द्यूतादि व्यसनासक्त झाल्यामुळे त्याने मालकाच्याच घरी चोरी केली. ते द्रव्य नेत असता त्याला दुसऱ्या चोरांनी लुटले. नंतर तो ऋतुपर्ण राजाचा सेवक झाला. तेथेही त्याने लोभाने राजकन्येचे अलंकार चोरले आणि तो मृत्युसंकटात पडला. दमयंतीने बोध केल्यावरून पिंगलकाने मुनिदीक्षा घेतली.

इकडे वसंत व्यापारी द्रव्य चोरीला गेल्यामुळे सात दिवस उपवाशी राहिला. कूबर राजास मौल्यवान नजराणा अर्पण केल्यामुळे त्याने वसंत व्यापाऱ्यास तापसपुराचा राजा केले.

कूबराने नळाला द्यूतात हरवून राज्य जिंकले आणि नळ दमयंतीसह अरण्यात गेल्याची बातमी समजताच पुष्पदंती रडू लागली. भीमराजाने त्यांच्या शोधार्थ हरिमित्र नावाचा कुशल दूत पाठविला. अचलपुरात येऊत त्याने चंद्रयशा राणीला नळदमयंतीची हकिगत सांगितली. राजा व राणी कष्टी झाली. भुकेमुळे हरिमित्र दानशाळेत गेला. तेथे त्याने दमयंतीला ओळखले व राजाराणींना सांगितले. त्यांनी उत्तम वस्त्रप्रावरणांनी दरबारात रात्री दमयंतीच्या भालावरील स्वाभाविक तिलकामुळे प्रकाश फाकला.

त्याचवेळी एक तेज:पुंज देव दमयंतीच्या दर्शनास आला. पूर्वजन्मातील तो पिंगलक चोर. मुनिअवस्थेत स्मशानात ध्यानधारणा केल्यामुळे मरणानंतर तो देव झाला. तेथे सात कोटी सुवर्ण मोहरांचा वर्षाव करून तो अदृश्य झाला. पिंगलकाच्या बाबतीत सत्कर्मांचे प्रत्यक्ष फळ पाहून ऋतुपर्ण राजा जिनानुयायी बनला.

ऋतुपर्ण राजाने मोठ्या सन्मानाने चतुरंग सेना बरोबर देऊन दमयंतीस हरिमित्राबरोबर कुंडिनपुरास पाठविले. गंगायमुनेच्या संगमाप्रमाणे माता-कन्येची आनंदाश्रू वाहत भेट झाली. भीमराजाने प्रसन्न होऊन हरिमित्रास पाचशे गावे दिली.

इकडे नळ दमयंतीस सोडून चालला असता अरण्यात भयंकर वडवाग्नी पेटला. आपले नाव घेऊन रक्षण करण्याची विनंती करणारा आवाज नळाने ऐकला. आवाजाच्या रोखाने जाताच एक नाग दिसला. दया येऊन नळाने उत्तरीय वस्त्राच्या साहाय्याने त्याला आगीतून वाचविले, पण दूध पाजणाऱ्यासच दंश करण्याच्या कृतघ्न स्वभावाने नागाने त्याच्या हातास दंश केला. क्षणात

त्याचे रूप पालटले. तो विद्रूप बुटका बनला. अशा विरूपावस्थेत जगण्यापेक्षा परलोकवास हितकर मुनिदीक्षा घेण्याचा त्याने निश्चय केला.

नागाने दिव्य देवरूप धारण केले. तो निषध राजाचा जीव होता. विधीपूर्वक मुनीधर्म पाळल्यामुळे तो ब्रम्हलोकात तेजःपुंज देव झाला. अवधिज्ञानाने नळाची विपदावस्था जाणून साहाय्य करण्याकरिता तो नागरूप घेऊन आला होता. आता विद्रूप बुटक्याची अवस्था प्राप्त झाल्यामुळे नळास ओळखून कोणी त्रास देणार नाही. म्हणून हा दंश हितकर कडू औषधासारखा मानावा असे त्याने सांगितले. अद्याप राज्यभोग भोगावयाचा असल्यामुळे योग्य समयीं मुनिधर्म स्वीकारावयाची सूचना देण्याचे आश्वासन देऊन दिव्य वस्त्रे व अलंकारांनी युक्त बेलफळ आणि रत्नकरंडक त्याच्या स्वाधीन केले. ते धारण करून योग्य वेळी त्याने नळरूप प्रकट करावे. नळाच्या सांगण्यावरून देवाने त्यास आपल्या दिव्य शक्तीने सुंसुमार नगराला पोचवले.

नळ जिनमंदिरातील भ. नमिनाथांच्या प्रतिमेस वंदन करून नगरात शिरला. याच वेळी एक मदोन्मत्त हत्ती साखळदंडाने बांधलेला खांब मोडून नगरात उधळला. बुटक्याने आपल्या कौशल्याने हत्तीस खेळवून जेरीस आणले. ते पाहून तेथील दधिपर्ण राजा त्याच्यावर प्रसन्न झाला. आपण हुंडीक नावाचा नळाचा स्वयंपाकी असून आपणास सूर्यकिरणावर स्वयंपाक करण्याची सूर्यपाक विद्या नळाकडून साध्य झाल्याचे त्याने सांगितले. सूर्यकिरणावर तयार झालेला उत्तम स्वयंपाक खाऊन राजा खूष झाला. त्याने त्यास वस्त्रालंकार, एक लाख रुपयांची नाणी, आणि ५०० गावे दिली. पण त्याने गावाव्यतिरिक्त बाकीचे द्रव्य घेतले. त्याच्या सांगण्यावरुन शिकार व दारू यांना त्याच्या राज्यात बंदी घालण्यात आली.

कूबराने द्यूतात नळाचे राज्य जिंकल्याने नळ दमयंतीसह अरण्यात गेला व तेथेच मरण पावला. अशी हकिगत ऐकून दधिपर्णास वाईट वाटले.

एकदा काही मित्रकार्यानिमित्त दधिपर्णाचा दूत भीमराजाकडे आला. त्याने आपल्या स्वामीपाशी आपण नळराजाचा स्वयंपाकी असून सूर्यकिरणावर स्वयंपाक करतो, असे सांगितले. तेव्हा दमयंतीच्या आग्रहाने कुशल ब्राम्हणास त्या स्वयंपाक्यास पाहण्यास पाठविले. जाताना शुभशकुन झाले. पण बेढब बुटक्यास पाहून हा नळ नव्हे म्हणून कुशल निराश झाला. बुटक्याने कुशलचा

आपल्या घरी सत्कार करून बधिपर्णाने दिलेले द्रव्य व अलंकार त्यास देऊन टाकले कुशल परत आला.

हत्तीस वश करणारा, सूर्यपाक विद्या जाणणारा आणि विपुल द्रव्य उदारपणे दान देणारा नळच असावा; पण कोणत्यातरी दोषामुळे तो बुटका झाला असावा, असे दमयंतीचे मन सांगू लागले.

तेव्हा त्या विलक्षण बुटकयाला कुंडिनपुरात आणण्याचा उपाय म्हणून भीम राजाने दमयंतीचे खोटेच स्वयंवर करावयाचे ठरविले. पूर्वी दधिपर्ण दमयंतीवर मोहित झाला होता. म्हणून केवळ त्यालाच निमंत्रण पाठविले. चैत्र शुद्ध पंचमीचा मूहूर्त आणि दूत कितीतरी दिवसांनी आदल्या दिवशी आलेला. तेव्हा दधिपर्ण उदास झाला. बुटक्याम कारण समजले. ' वती दमयंती परपुरुषाची इच्छा कधी करणार नाही. तरी आपण जिवंत असता कोण तिच्याशी विवाह करेल ?' असा विचार करून उत्तम रथ व जातिवंत घोडे असतील, तर आपण सहा प्रहरात कुंडीनपुरास नेऊ असे त्याने सांगितले.

दधिपर्ण राजा, सारथी बुटका, पानाचे तबक वाहणारा, छत्र धरणारा, व दोघे चवऱ्या ढाळणारे असे सहा जण रथातून स्वयंवराकरिता निघाले. मध्येच वाऱ्याने दधिपर्णाचे उत्तरीय वस्त्र उडून गेले. क्षणात रथ २५ योजने पुढे आला होता. रस्त्यात बहरलेल्या बिभितक झाडाची फळे न मोजता दधिपर्णाने सांगितली. नळाने एका मुठीच्या प्रहाराने पाडून मोजली, ती बरोबर १८००० भरली. मार्गातच बुटक्यानें तुरंगहृदयविद्या दधिपर्णाला दिली व त्याच्याकडून फलसंख्याविद्या ग्रहण केली.

त्या दिवशी पहाटे दमयंतीला स्वप्न पडले निर्वृतिदेवीने कोशलातील बाग कुंडिनपुरात आणली. दमयंती आंब्याच्या झाडावर चढली. देवीने तिच्या हाती कमळ दिले. आगोदरच झाडावर बसलेला पक्षी खाली पडला. भीमराजानें त्या स्वप्नाचे फळ सांगितले. निर्वृतिदेवी म्हणजे दमयंतीचे अगणित पुण्य उदयाला आले. कोशलातील बाग म्हणजे पुन: राज्यप्राप्ती. झाडावर चढणे म्हणजे नळाशी भेट. पहाटे स्वप्न पडले म्हणजे आजच नळाशी भेट होणार. पक्षी खाली पडणे म्हणजे कूबर राज्यभ्रष्ट होणे.

सकाळी रथ कुंडिनपुरात आला. भीमराजाने दधिपर्णाचे आनंदाने स्वागत केले बुटक्यास सूर्यकिरणावर स्वयंपाक करण्याचा आदेश दिला. भोजनाच्या

स्वादाने दमयंतीची तोच नळ असल्याची खात्री पटली. पण आणखी एक परीक्षा म्हणून त्यास तिने एकांतात बोलावले. त्याच्या बोटाचा स्पर्श तिच्या वक्षस्थळास होताच ती रोमांचित झाली. तिच्या विनवणीने बुटक्याने बेलफळातील दिव्य वस्त्रे परिधान केली व रत्नकरंडकातील मौल्यवान अलंकार घातले. लगेच विद्रूपता जाऊन नळाचे मूळ स्वरूप प्रकट झाले. नळदमयंतीचे दीर्घकाळाने पुनर्मिलन झाले. आनंदी आनंद झाला.

भीम राजाने नळास आपल्या सिंहासनावर बसविले. दधिपर्णाने नळाची क्षमा मागितली. ऋतुपर्णराजा चंद्रयशेसमवेत आला. तापसपुराहून वसंतश्रीशेखर राजाही आला. तेव्हा राजसभेत एक देव अवतीर्ण झाला. तो पूर्वायुष्यातील तपस्व्याचा कुलपती. दमयंतीच्या उपदेशाने मुनिधर्म पाळून मरण पावल्यावर सौधर्मस्वर्गात देव झाला. सात कोटी सुवर्ण मोहरांची वृष्टी करून तो परत गेला.

बाकीच्या राजांनी नळाचा राजाभिषेक केला. सर्वांची सेना एकत्र करून नळ कोशलापुरी आला. प्रतापी नळाबरोबर युद्ध करणे अशक्य वाटल्यामुळे पुनः द्यूतक्रीडा सुरू झाली. यावेळी नळाने कूबरास जिंकले. पण क्षमा करून त्यास युवराजपद दिले. त्यांनी कोशलापुरीतील जिनमंदिरांचे दर्शन घेतले. नळ व दमयंती कितीतरी वर्षे राज्योपभोग भोगू लागली.

हा योग्य समय वाटून निषधदेवाने त्यास आत्मकल्याणार्थ मुनिदीक्षा घेण्याचा आदेश दिला.

याच वेळी अवधिज्ञानी जिनभद्र आचार्य तेथे आले. त्यांना वंदन करून नळाने आपली पूर्वजन्माची हकिगत विचारली.

भारतातील अष्टापद पर्वताजवळ संगर नगरात मम्मण राजा वीरमती राणीसह सुखाने राज्य करीत होता. एकदा तिच्यासह शिकारीस जाताना समोर तांड्यात एका मुनीस पाहून तो अपशकुन मानून त्याने त्याची राजवाड्यात नेऊन १२ घटिका अवहेलना केली. पण ते मुनी अष्टापदास जिनप्रतिमांचे दर्शन घेण्यास जात असल्याचे ऐकून त्यांनी अपराधाची क्षमा मागितली. काही दिवस मुनींना ठेऊन घेऊन सन्मानाने निरोप दिला. मुनिवर्यांच्या उपदेशाने ती दोघे श्रावकांची व्रते पाळू लागली. एकदा शासन-

देवीने वीरमतीस अष्टापदास तेथील २४ जिनप्रतिमांना वंदन करण्यास नेले. विधीपूर्वक पूजा करून तिने प्रत्येक जिनाकरिता २०–२० आयंबिल तप केले. तिने माणके जडवलेले सुवर्णाचे तिलक करविले. पुनः व्रताचे उद्यापन करण्याकरिता तिने अष्टापदास जाऊन जिनपूजा केली. प्रतिमांच्या मस्तकावर ते रत्नजडित तिलक चिकटविले. दृढतेने श्रावकधर्म पाळून ती दोघे सौधर्म स्वर्गात देव व देवी झाली.

तेथील आयुष्य संपल्यावर मम्मणाचा जीव पोतनपुरात धन्य नावाचा गोपाळ झाला व वीरमती धूसरी नावाची त्याची पत्नी झाली. एकदा पावसाळ्यात म्हशी चारत असताना एक तपाचरणी मुनी कायोत्सर्ग ध्यानात मग्न असलेले दिसले. ते पंडुदेशातून लंकापुरीकडे आपल्या आचार्यांना वंदन करण्यास चालले होते. धन्यने भक्तीने दिलेले दूध घेऊन मुनीने पारणे केले. दीर्घकाळ श्रावकधर्म व नंतर श्रमणधर्म पाळूत ती दोघे मरणानंतर हिमवंतावर हरिणयुगुल झाली. तेथून सौधर्मस्वर्गात तो क्षीरडिंडिर देव व ती क्षीरडिंडिरा देवी झाली.

त्यानंतर आता मम्मण नळराजा झाला व वीरमती दमयंती झाली. पूर्वजन्मात मुनींना आहार दिला व श्रावकव्रते पाळली म्हणून दोघांनाही सुंदर शरीर व राज्यप्राप्ती झाली. जिनप्रतिमांना रत्नजडित तिलक लावून आयंबिलव्रताचे उद्यापन केल्यामुळे दमयंतीच्या भालावर स्वाभाविक सूर्यतेजासारखा तेजस्वी तिलक निर्माण झाला. १२ घटिका मुनीची विटंबना केल्यामुळे त्यांना १२ वर्षे राज्यभ्रष्ट व्हावे लागले.

नळराजाने आपला सुपुत्र पुष्कर यास गादीवर बसवले व दमयंतीसह भगवती दीक्षा स्वीकारली. पण विचित्र कर्मगतीमुळे दोघांनाही मुनी व साध्वीच्या अवस्थेत वैषयिक भोग भोगण्याची तीव्र लालसा निर्माण झाली. त्यावेळी निषध देवाने येऊन व बोध करून त्यांना संयमामध्ये स्थिर केले. आमरण अनशन करून ती दोघे क्षुद्र देव व देवी झाली. पुढील जीवनात विधीपूर्वक तपाचरणाने कर्मांचा क्षय करून ती दोघे क्रमाने मोक्षास जातील.

अशी ही कर्मसिद्धांतावर आधारलेली नळ–दमयंतीची सुरम्य कथा सोमप्रभाचार्यांनी द्यूतव्यसनाचा दुष्परिणाम दाखविण्यासाठी लिहिली आहे.

● ● ●

।। ॐ नमो सुयदेवयाए ।।

सिरीसोमप्पहायरियरइया

# नलकहा

रन्ना भणियं—' को सो नलो ? ' गुरुणा वुत्तं–' सुण,

अत्थि इह भरहखित्ते कोसलदेसम्मि कोसलानयरी ।
जायंति गुणा वसणस्स हेउणो जत्थ अच्छरियं ।। १ ।।
इक्खागुकुलुप्पन्नो निरुवमनयचायविक्कमप्पुन्नो ।
अरिपत्थिवदुव्विसहो निसहो नामेण तत्थ निवो ।। २ ।।

तस्स सुंदरीदेवीकुक्खिसंभूया जणमणाणंदणे दुवे नंदणा, नलो कूबरो य ।

इओ य विदब्भदेसमंडणं कुंडिणं नयरं । तत्थ अरिसंघसिंहसरहो भीमरहो राया । तस्स सयलंतेउरतरुपुप्फं पुप्फदंती देवी । ताणं विसयसुहमणुहवंताण समुप्पन्ना सयलतइलोक्कालंकारभूया धूया ।

तीए तिलओ जाओ सहजो भालम्मि तरणिपडिबिंबं ।
सप्पुरिसस्स व वच्छत्थलम्मि सिरिवच्छवररयणं ।। ३ ।।

जणणीगब्भगयाए इमीए मए सव्वे वेरिणो दमिय त्ति पिउणा कयं तीए ' दमयंति ' त्ति नामं । सियपक्खचंदलेह व्व सव्वजणनयणाणंदिणी पत्ता सा वुड्ढिं । समए समप्पिया कलोवज्झायस्स ।

आयंसे पडिबिंबं व बुद्धिजुत्ताइ तीइ सयलकलाओ ।
संकंताओ जाओ य सक्खिमत्तं उवज्झाओ ।। ४ ।।

मुणिजणसेवावसओ सम्मत्तं पाविउण सा जाया ।
दुरवगमकम्मपयडिप्पमुहवियारेसु कुसलमई ।। ५ ।।

तीए य पवयणत्थं पयंपमाणीएँ महुरवाणीए ।
पिउणो वि हु जणणीए जाणिया जिणधम्मपडिवत्ती ।। ६ ।।

पगिट्ठपुन्नपेरियाए निवुइदेवयाए समप्पिया तीए भाविसंतिजिणस्स कणयमयपडिमा। भणिया य सा वच्छे! इमा तुमए निच्चमच्चणिज्जा। सा वि तं पडिवज्जिऊण तहेव काउमारद्धा । पत्ता य सा वम्महमहारायलीलावणं जुव्वणं । तं दट्ठूण चिंतियं जणणीजणएहिं--

एसा असरिसरूवा विहिणो विन्नाणपगरिसो एसो ।
जणेसा निम्मविया दलेण इत्तियं चेव ।। ७ ।।

ता नत्थि इमीए समाणरूवो वरो । अत्थि वा तहवि सो न नज्जइ। अओ सयंवरो काउं जुत्तो । जेणं तत्थ नियइच्छाए इमीए अणुचियवरपयाणजणिओ दोसो अम्ह होइ त्ति । तओ पेसिऊण दूए हक्कारिया रायाणो रायपुत्ता य। आगया गयतुरयरहपाइक्कपरियरिया ते। नलो वि निरुवमसत्तो पत्तो तत्थ । भीमनिवइणा कयसम्माणा ठिया ते पवरावासेसु । कराविओ कणयमयक्खंभमंडिओ रम्मयाए विमाणमाणनिम्महणपंडिओ पवणुद्धुयपारद्धतंडवो सयंवरमंडवो । तत्थ ठवियाइं नाणारयणकिरणकडप्पकप्पियसुरिंदसरासणाइं सुवत्तसिंहासणाइं ।

निविट्ठा तेसु परोप्परं रिद्धिपाडिसिद्धीए पयडियप्पाणो रायाणो। पयट्टा पयासिउं बहुप्पयारे कामवियारे ।

एत्थंतरे जणयाएसेण समागया पसरियपहाजालभालतिलयालंकिया पुव्वदिस व्व रविबिंबबंधुरा पसन्नवयणा पुन्निमनिस व्व संपुन्नससिसुंदरा, घणत्थणमंडला मयणकेलिसरसि व्व मिलिएक्कचक्कवायमिहुणा, आरत्तकरचलणकमला कंकेल्लितरुलय व्व नवपल्लवपेसला,

थूलमुत्ताहलाहरणहारिणी मल्लिय व्व उम्मिल्लंतकुसुमसमूहसोहिया, धवलदुकूलनिवसणा गयणलच्छि व्व सच्छसरयब्भसंगया, वलक्खकडक्खच्छडाविच्छुरियदिसमुहा ससुद्दवेल व्व समुच्छलंतमच्छरिंछोलिसंकुला सयंवरमंडवं मंडयंती दमयंती। तं दट्ठूण विम्हियमुहेहिं महिनाहेहिं स च्चेव चक्खुविक्खेवस्स लक्खीकया।

तो रायाएसेणं भद्दा अंतेउरस्स पडिहारी।
कुमरीएँ पुरो निवकुमरविक्कमे कहिउमाढत्ता ॥ ८ ॥

कासिनयरीनरेसो एसो दढभुयबलो ( बलो ) नाम।
वरसु इमं जइ गंगं तुंगतरंगं महसि दट्ठुं॥ ९ ॥

दमयंतीए भणियं –भद्दे ! परवंचणवसणिणो कासिवासिणो सुव्वंति ता न मे इमम्मि रमइ मणं ति अग्गओ गच्छ। तहेव काऊण भणियं तीए–

कुंकणवई नरिंदो एसो सिंहो त्ति वेरिकरिसिंहो।
वरिऊण इमं कयलीवणेसु किलसु सुहं गिम्हे ॥ १० ॥

दमयंतीए भणियं –भद्दे ! अकारणकोवणा कुंकणा, ता न पारेमि इमं पए पए अणुकूलिउं तो अन्नं कहेसु। अग्गओ गंतूण भणियं तीए–

कम्हीरभूमिनाहो इमो महिंदो महिंदसमरूवो।
कुंकुमकेयारेसुं कीलीउकामा इमं वरसु ॥ ११ ॥

कुमरीए वुत्तं –भद्दे ! तुसारसंभारभीरुयं मे सरीरयं किं न तुमं जाणसि ! तो इओ गच्छामो त्ति भणंती गंतूण अग्गओ भणिउं पवत्ता पडिहारी

एस निवो जयकोसो कोसंबीए पहू पउरकोसो।
मयरद्धयसमरूवो किं तुह हरिणच्छि ! हरइ मणं ॥ १२ ॥

कुमरीए वुत्तं–कविंजले ! अइरमणीयादंड वरमाला विणिम्मविया। भद्दाए चिंतियं–अप्पडिवयणमेव इमस्स नरिंदस्स पडिसेहो । तओ अग्गे गंतूण वुत्तं भद्दाए ।

कलयंठकंठि ! कंठे कलिंगवइणो जयस्स खिव मालं ।
करवालराहुणा जस्स कवलिया वेरिजससिणो ।। १३ ।।

कुमरीए वुत्तं—तायसमाणवयपरिणामस्स नमो एयस्स । तओ भद्दाए अग्गओ गंतूण भणियं–

गयगमणि ! वीरमउडो गउडवई तुज्झ रुच्चइ किमेसो ?
जस्स करिनियरघंटारवेण फुट्टइ व बंभंडं ।। २४ ।।

कुमरीए जंपियं–अम्मो ! एरिसं पि कसिणभंसणं माणुसाणं रूवं होइ त्ति तुरियं अग्गओ गच्छ । वेवइ मे हिययं । तओ ईसि हसंती गया अग्गओ भद्दा जंपिउं पवत्ता ।

पउमच्छि ! पउमनाहं अवंतिनाहं इमं कुणसु नाहं ।
सिप्पातरंगिणीतीरतरुवणे रमिउमिच्छंती ।। १५ ।।

कुमरीए वुत्तं— हद्धि परिस्संत म्हि इमिणा सयंवरमंडवसंचरणेण, ता किच्चिरं अज्ज वि भद्दा जंपिस्सइ । चिंतियं च भद्दाए–एसो वि न मे मणमाणंदइ त्ति कहियं कुमरीए । ता अग्गओ गच्छामि त्ति तहेव काउं जंपिउं पवत्ता भद्दा ।

एसो नलो कुमारो निसहसुओ जस्स पिच्छिउं रूवं ।
मन्नइ सहस्सनयणो नयणसहस्सं धुवं सहलं ।। १६ ।।

चिंतियं विम्हियमणाए दमयंतीए––अहो ! सयलरूववंतपच्चाएसो अंगसंनिवेसो, अहो ! असामन्नं लावण्णं, अहो ! उदग्गं सोहग्गं, अहो ! महुरिमनिवासो विलासो, ता हियय ! इमं पइं पडिवज्जिऊण

पावेसु परमपरिओसं ति । तओ खित्ता नलस्स कंठकंदले वरमाला ।
अहो ! सुवरियं ति समट्ठिओ जणकलयलो !

एत्थंतरे खग्गं कड्ढिऊण नलमक्खिविउं पवत्तो कण्हराओ । भो नल ! न लब्भए दमयंती परिणेउं । अजुत्तं कयं इमीए जं तुमं वरिओ। न मं मुत्तुं अन्नो उचिओ इमीए । ता मुंच एयं जुज्झसज्जो वा होहि ।

नलेण भणियं –अरे नराहम ! जइ तुमं न वरिओ दमयंतीए ता किं दूमिओ सि ! संपयं पुण मम्मि वरिए एयं परित्थियं पत्थंतो न गणेसि कुलकलंकं, नासंकसे अयसपंकं, न लज्जसे लोआओ, न बीहसे परलोयाओ, ता तुमं परिचत्तसंतमग्गो मए सिक्खवियव्वो त्ति करवालं घेत्तूण उट्ठिओ जलंतकोवाणलो नलो ।

दोण्हं पि संनद्धाइं विविहपहरणभीसणाइं सिन्नाइं ।

तओ चिंतियं दमयंतीए–हा ! किं मंदभग्गाऽहं जं मह कए उवट्ठिओ एस पलओ । ता जइ मह अरहंते भत्ती तो भयवइ सासणदेवी ! लहउ विजयलच्छि नलो, उवसमउ समरं ति भणंतीए गहिओ वारि-भिंगारो । खित्ताओ तिन्नि तोयच्छडाओ । कण्हराओ तोएण फरिसियंगो अंगारो व्व निव्वाणो नित्तेओ जाओ । पक्कपत्तं व पायवाओ पडियं से मंडलग्गं करग्गाओ

निव्विसो विसधरो व्व रोसरहिओ कण्हराओ चिंतिउं पवतो । अजुत्तं मए नलं पइ पलत्तं । न सामन्नपुरिसो एसो । ता मे पणमिउं जुज्जइ त्ति । तओ तेण पणामपुव्वं खमाविओ निययावराहं नलो ।

संभासिउं नलेण वि विसज्जिओ कण्हपत्थिवो पणओ ।
जं पणयवच्छला उत्तम त्ति सच्चं बुहा बिंति ।। १७ ।।

नलचरिएण तुट्ठो भीमो सक्कारिऊव विसज्जिया तेण सेसपत्थिवा ।

कराविओ महाविच्छड्डेण दमयंतीए करग्गहणं नलो। दिन्नाइं नलस्स करमोयणे अणेयकरितुरयरयणालंकारवत्थाईणि। एवं भीमेण सम्माणिज्जंतो ठियो तत्थ कइवयदिणाइं। तेण कयाणुगमणो पत्थिओ नियनयरिं नलो। दमयंती वि नलेण सह वच्चंती भणिया जणणीए।

जंपेज्ज पियं, विणयं करिज्ज, वज्जेज्ज पुत्ति! परनिंदं।
वसणे वि मा विमुंचसु देहच्छाय व्व नियनाहं॥ १८॥

तं सिक्खं पडिवज्जिऊण कयप्पणामा विसज्जिया जणणीजणएहिं पत्थिया दमयंती। रहमारोविऊण नलेण निवेसिया नियउच्छंगे। तओ चउरंगबलुक्खयखोणिरेणुनियरेण रुद्धनहमंडलस्स नलस्स वच्चंतस्संतराले अत्थं गओ गयणमणी। पूरियं भुवणं विहियदिट्ठिप्पसरसंरोहेण तिमिरसंदोहेण। न लक्खिज्जए जलत्थलतरुगिरिगड्डाइविसेसो। तहवि नियनयरुक्कंठियमणो गमणाओ न नियत्तए नलो।

संरुद्धदिट्ठिपसरं बलं खलंतं पडंतमवडेसु।
गच्छंतमुप्पहे दट्ठुं भणिया नलेण पिया॥ १९॥

देवि! जग्गसु खणं पयासेसु भालतिलयतरणिं। जओ तिमिरतिरोहियनयणमग्गं समग्गं बलं अबलं गंतुं।

उट्ठिऊण दमयंतीए करेण परामुट्ठं भालवट्टं। फुरिओ फारपहानिलओ कयंधयारविलओ तिलओ। तओ निप्पच्चूहं पहे पयट्टं बलं।

कोसलापुरीपरिसरं गएण भणिया नलेण दमयंती, देवि! जिणभवणमंडियप्पएसा एसा मे पुरी।

तीए भणियं—धन्नाऽहं जा लद्धूण नलं नाहं निच्चमच्चिस्सं चेइयाइं।

अह पसत्थदियहे बहुप्पवंचमंचवित्थरियरिद्धिडंबरं पइभवणपणच्चियधयं चलचुंबियंबरं विविहतूररवाऊरियदियंतरं नच्चंततरुणिचक्कनिरंतरं

पए पए कीरंतमंगलो नलो पविट्ठो नयरिं। पणमिया दमयंती-सहिएण तेण जणणिजणया। अहिणंदिओ णेहिं एसो।

तओ नलो दमयंती य कयाइ जलकीलं कुणंति। कयाइ दोलंदोलणसुहं अणुहवंति। कयाइ सयंगुच्छसुरहिकुसुमेहिं परोप्परं विचित्तबंधं धम्मेल्लं पूरंति। कयाइ अक्खजूएण रमंति। कयाइ सयं विविहाउज्जवायणपरो रहसि दमयंतिं नलो नच्चावेइ। एवं नलो दमयंतीए अविउत्तो नवनवेहिं विणोएहिं कालं वोलेइ।

अन्नया नलं नियरज्जे कूबरं च कुमरत्ते ठाविऊण पडिवन्नं निसहेण समणत्तणं।

अनलो व्व नलो दुव्विसहतेयपसरो सरोसवेरीहिं।
पत्थिवमत्थयपणमियपयकमलो पालए रज्जं ॥ २० ॥

अन्नया नलेण पुच्छिया मंतिणो–जणओवज्जियं चेव किमहं महिं पालेमि, अओ अहियं ? तेहिं भणियं–तिभागूणं भरहद्धं भुत्तं निसहेण, तुमं पुण सयलं भरहद्धं भुंजसि। ता जुत्तं पुत्तो पिउणो अहिओ त्ति। किंतु पुरी तक्खसीला अत्थि इओ दोहिं जोयणसएहिं। तत्थ कयंबो राया। सो तुह आणं न मन्नेइ।

तुह जसससिम्मि विमले समत्तभरहद्धविजयसंभूए।
उव्वहइ दुव्विणीओ एसो च्चिय लंछणच्छायं ॥ २३ ॥

एसो य तुमए उविक्खिओ रोगलेसो व्व लद्धोवचओ दुसज्झो जाओ। जइ पुण इमं पइ पराजयमणं कयं ता पव्वयब्भट्ठो घडो व्व विणट्ठो चेव एसो। अओ पढमं दूयपेसणेण से मुणिज्जउ मणं। पच्छा जहाजुत्तं किज्जउत्ति। तओ सिक्खविऊण पेसिओ विचित्तभणिइ-कुसलो दूओ। गंतूण तेण भणिओ निव्विलंबं कयंबो—

वेरिवणदहणदावाणलेण पहुणा नलेणा आणत्तं ।
मह पडिसेवं पडिवज्जिऊण पालेसु नियरज्जं ॥ २२ ॥

अह न करिस्ससि एवं सीसब्भट्ठो मुणि व्व सुकयस्स ।
पाविहिसि परिब्भंसं इमस्स सत्तंगरज्जस्स ॥ २३ ॥

किं च मए तुब्भ हियं विचिंतयंतेण पेसिओ दूओ ।
अन्नह अतक्किओ चिय अहं करिंतो तुह विणासं ॥ २४ ॥

इय दूयवयणमायन्निऊण दसणग्गदट्ठओट्ठपुडो ।
अप्पाणमयाणंतो कयंबराओ भणइ दूयं ॥ २५ ॥

तुब्भ पहू किं बालो ? किं मत्तो ? किं च वाउम्मत्तो सो ।
जो सयलरिउभुयंगमगरुडं न वियाणइ ममं पि ॥ २६ ॥

गुणदोसवियारखमा किं तस्स न संति मंतिणो के वि ?
जेहिं नलो न निसिद्धो असमंजसजंपिरो एवं ॥ २७ ॥

भो दूय ! गच्छ जइ तुह सामी नियजीवियस्स निव्विन्नो ।
ता होउ समरसज्जो । अहं पि दूअ ! आगओ एसो ॥ २८ ॥

दूएण वि आगंतुं नलस्स कहियं कयंबवज्जरियं ।
तस्सोवरि सो कुविओ चलिओ चउरंगबलकलिओ ॥ २९ ॥

पत्तो तक्खसिलाए समंतओ वेढिया अणेणेसा ।
पायारो व्व दुइज्जो विहिओ कुंजरपरिक्खेवो ॥ ३० ॥

तं असहंतो सन्नहिऊण निग्गओ बाहिं कयंबो । विविहपहरणकिरणदुगुणियदिणमणिपहापसरं सरनियररुद्धनहमंडलं मंडलग्गसंघट्टसमुच्छलियसिहिसिहाभासुरं सुरसिद्धजक्खपिक्खिज्जंतनच्चंतकबंधनिवहं वहंतरुहिरवाहिणीकमलायमाणभडमत्थयं दोहिं वि बलेहिं पारद्धं जुद्धं ।

नलेण भणिओ कयंबो–मारिएहिं किमिमेहिं किमिप्पाएहिं पाइक्केहिं ? अहं तुमं च दो वि जुज्झामो। तओ जंगमगिरिणो व्व पवत्ता दो वि बाहुजुद्धाइएहिं जुज्झिउं। जं जं जुद्धं कयंबेण मग्गिओ नलो तत्थ तत्थ नलेण निज्जिओ सो। तओ पलाइऊण पडिवन्नसंजमो ठिओ पडिमाए कयंबो। दिट्ठो नलेण, भणिओ य–निज्जिओऽहं तुमए इमिणा सच्चरिएण, ता करेसु नियरज्जं। निरीहत्तणेण नलोऽनिलो व्व असारो त्ति उवेक्खिओ कयंबेण। कमंबसत्तरंजियमणेण नलेण कयंबपुत्तो जयसत्ती नाम कओ कयंबरज्जे।

विण्हुस्स व नलस्स भरहद्धरज्जाभिसेओ कओ नरिंदेहिं। पए पए भत्तिकुसलरायकोसलीयवड्ढंतकोसो कोसलाए समागओ गयणचरं-गणागणगिज्जंतबलो नलो विविहविणोएहिं दमयंतीए समं रमंतो गमेइ कालं।

कुबरो पुण नियकुलंगारो रज्जलुद्धो नलस्स छलं गवेसंतो चिट्ठइ। चंदस्स व लंछणं भवियव्वयावसेण जायं नलस्स जूयवसणं। जिणेमि नलरज्जं ति चिंतंतो कूबरो रमावेइ निच्चं। डमरुयगंठिमिव संचरंते जा दुण्हं पि जुएण रमंताणं गओ बहुयकालो। अन्नया नियइ-वसेण नलेण जिणिउं न सक्किओ कूबरो। पडिओ नाणुकूलो नलस्स दक्खस्स वि कंखिओ अक्खो। पुणो पुणो नलसारमारणं कुणइ कूरो कूबरो। नगरगामखेडकव्वडाईणि हाराविओ नलो कूबरेण। तलाओ व्व गिम्हे जलेण जाओ हीयमाणो नलो विहवेण। विसन्नो जणो जुयंघले नले। संपज्जमाणमणोरहो हरिसिओ कूबरो। नलाणुरत्तेण लोएण कओ हाहारवो। तं सुच्चा समागया दमयंती।

सा जंपइ नाह ! पसीय मज्झ पत्थेमि मुंच जूयमिणं।  
नणु वसणदाणदक्खा अक्खा तुह वेरिणो व्व इमे ॥ ३१ ॥

लहुबंधुणो वरं कूबरस्स रज्जं इमं सयं देहि ।
एस हठहरियरज्जो त्ति अत्तणो मा कुरु अकित्ति ॥ ३२ ॥
जुद्धेहिं अज्जियं जं रज्जं तं हारियं व जूएण ।
सित्थं व असोत्तगयं मज्झ मणं देव ! दूमेइ ॥ ३३ ॥
तव्वयणमंकुसं मयगलो व्व मत्तो नलो न मन्नेइ ।
तीइ भणिया अमच्चा जूयाओ नलं नियत्तेह ॥ ३४ ॥
तेहिं पि बहुं भणिओ तहवि नियत्तो नलो न जुयाओ ।
न हि सन्निवायगहियस्स ओसहं किं पि संभवइ ॥ ३५ ॥
हारियसमग्गरज्जो हारियदमयंतिपमुहसुद्धंतो ।
हारियसरीरपरिहियसयलाभरणो नलो राया ॥ ३६ ॥
भणिओ य कूबरेणं मह रज्जं मुंच इत्थ मा चिट्ठ ।
तुह रज्जं दिन्नं पिउणा, अक्खेहिं पुणो मज्झ ॥ ३७ ॥
पबलभुयबलाणं भद्द ! लच्छी न दूरे ।
परिहर मयमेवं कूबरं जंपमाणो ।
परिहियपडरित्थो पत्थिओ सो पहिट्ठो ।
न हि विधुरसहावा हुंती दुत्थे वि धीरा ॥ ३८ ॥

नलाणुमग्गलग्गा दमयंती निसिद्धा कूबरेण । मयच्छि ! मा गच्छ तुमं, मए जूए जियाऽसि त्ति मे सुद्धंतं अलंकरेसु ।

तओ मंतीहिं वुत्तो कूबरो । परपुरिसच्छायं पि न छिवइ महासई दमयंती । ता मा इमं खिवसु निय अंतेउरे । जओ जेट्ठभाउणो भज्जा जणणि व्व दट्ठव्वा ।

अह जइ हठेण एवं काहिसि तत्तो तुमं सई एसा ।
छारुक्कुरुडं करिही सईण न हि दुक्करं किंपि ॥ ३९ ॥

ता इमं सइं कोविऊण मा पडसु अणत्थे । एसा खु भत्तारमणुसरंती

उच्छाहिज्जइ, किं पुण निवारिज्जइ । अलं ते नलं पइ गामखेडाइ-दाणेण । समप्पेहि पाहेयसहियं ससारहिं रहमेक्कं ।

एवं अमच्चभणिएण कूबरेण विसज्जिया नलेण सह दमयंती । समप्पिओ जहुत्तरहो ।

नलेण वुत्तं – जेण मए भरहद्धविजओवज्जिया वज्जिया लीलाए लच्छी तस्स मे किं रहेण ?

पहाणेहिं भणिओ नलो–चिरसेवए वि अम्हे तुमं अणुगच्छंते निवारेइ कूबरो । किं च —

इह वंसे जो राया तं सेवामो त्ति एस अम्ह कमो ।
तुमए विइन्नरज्जं ता मुंचामो कहं एयं ।। ४० ।।

संपयं दमयंती चेव तुह भज्जा मंती मित्तं पाइक्को य । एसा सिरीसकुसुमसूमालसरीरा सूरकरनियरसंतत्तरेणुकणदुग्गमे मग्गे कहं कमलकोमलेहिं चलणेहिं चंकमिहि त्ति ? ता नाह ! गिण्ह रहं । अणुगिण्ह अम्हे । देवीए समं समारोह इत्थ ।

एवं पहाणेहिं पत्थिओ पत्थिओ रहमारूहिऊण दमयंतीए सह नलो । ण्हणुज्जयं व एगवत्थं दमयंतिं दट्ठूण बाहबिंदुदुगुणियहाराहिं रोइयं नगरनारीहिं ।

वच्चंतेण नलेण नयरिमज्झे दिट्ठो हत्थपंचसयप्पमाणो खंभो । रज्जभंसुब्भवं दुक्खं अमुणंतेणेव कोउगेण कयलीखंभो व्व करेण उक्खाओ लीलाए । उक्खायपडिरोवरूवं रायव्वयं व दंसयंतेण पुणो वि आरोविओ तत्थेव ।

इमं दट्ठूण जंपियं नायरेहिं–अहो ! बलसालिणो वि नलस्स रज्जब्भंसो त्ति विचित्तो विहिनिओगो । पुव्वं नयरुज्जाणे कूबरेण सह कीलंतस्स नलस्स समागओ दिव्वनाणनयणो मुणी । कहियं तेण–भावी

इतक्या अवधीत पित्याच्या आदेशानुसार मोहक सूर्यबिंब असलेल्या पूर्वदिशेप्रमाणे पसरलेल्या प्रभाकिरणसमूहांनी युक्त अशा भालावरील (स्वाभाविक) तिलकाने अलंकृत झालेली, संपूर्ण चंद्रम्याने सुंदर दिसणाऱ्या पुनवेच्या रात्रीप्रमाणे प्रसन्न चेहरा असलेली, सरोवरात प्रणयक्रीडा करताना (प्रेमाने) एकरूप झालेल्या चक्रवाक जोडप्याप्रमाणे गोलाकार उभार उरोज असलेली, टवटवीत पालवींनी मोहक दिसणाऱ्या अशोक तरुलतेप्रमाणे कमळासारखे लालेलाल हातपाय असलेली, फुललेल्या फुलांच्या गुच्छांनी शोभून दिसणाऱ्या मल्लिकेप्रमाणे टपोऱ्या मोत्यांचा कंठा (गळ्यात) घातलेली, धवल शारदीय ढगांनी युक्त असलेल्या आकाश-लक्ष्मीप्रमाणे शुभ्र रेशमी वस्त्र परिधान केलेली, उसळी घेणाऱ्या माशांच्या रांगांनी युक्त असणाऱ्या सागरातील लाटांप्रमाणे तिरक्या नजरांच्या फेकींनी सर्व दिशा भारून टाकणारी दमयंती स्वयंवर मंडप भूषवित (तेथे) आली. तिला पाहून आश्चर्ययुक्त चेहऱ्यांनी राजांनी तिलाच आपल्या नेत्रकटाक्षांचे लक्ष्य केले.

८. तेव्हा राजाच्या आदेशाने अंत:पुरातील द्वारपालिका भद्रा राजकुमारीच्या पुढे होऊन राजांचे व राजकुमारांचे विक्रम सांगू लागली.

९. 'दृढ बाहुबल असलेले बल नावाचे हे काशीनगरीचे महाराज आहेत. (उंचच) उंच (उफाळणाऱ्या) लाटा असलेली गंगा (नदी) पाहण्याची जर इच्छा असेल तर यांना वर.'

दयमंती म्हणाली, 'भद्रे, काशीतील निवासी दुसऱ्यांची फसवणूक करण्याची सवय असलेले आहेत असे ऐकावयास येते, तेव्हा माझे मन यांच्यात रमत नाही, म्हणून पुढे हो.' तसेच करून ती म्हणाली,

१०. 'शत्रूंच्या हत्तींना सिंहच असे हे सिंह नावाचे कुंकणाधिपती महाराज आहेत. यांना वरून ग्रीष्मऋतूमध्ये केळीच्या बनात (यांच्याशी) सुखाने क्रीडा कर.'

दमयंती म्हणाली, ‘भद्रे, कुंकणवासी विनाकारण रागावतात; तेव्हा पावला पावला गणिक यांची मनधरणी करणे मला शक्य होणार नाही. तेव्हा दुसऱ्याविषयी सांग.’ पुढे होऊन ती म्हणाली,

११. ‘महेंद्राप्रमाणे सौंदर्य असलेले हे महेंद्र काश्मीरदेशचे महाराज आहेत. केशराच्या वाटिकेमध्ये क्रीडा करण्याची मनीषा असेल तर यांना वर.’

राजकुमारी म्हणाली, ‘भद्रे, माझे शरीर (गार) तुषार वर्षावाला (श. संचयाला) घाबरते हे तुला माहित नाही का ? तेव्हा येथून जाऊया’ असे म्हणत असताना द्वारपालिका पुढे जाऊन म्हणू लागली,

१२. ‘विपुल द्रव्यभांडार असलेले हे जयकोश महाराज कौशांबीचे स्वामी आहेत. मृगनयने, कामदेवाप्रमाणे रूप असलेले हे तुझे मन मोहून टाकतात का ?’

राजकुमारी म्हणाली, ‘कपिंजले, गुंफलेली ही वरमाला अत्यंत रमणीय आहे.’ भद्रेने विचार केला, ‘उत्तर न देणे हाच यांना नकार आहे.’ तेव्हा पुढे जाऊन भद्रा म्हणाली,

१३. ‘कोकिळकंठी, ज्यांच्या तलवाररूपी राहू (दैत्या) ने शत्रूंच्या कीर्तीचंद्रांना ग्रासले आहे त्या कलिंगाधिपती जय (महाराजां) च्या गळ्यात माळ घाल.’

राजकुमारी म्हणाली, ‘तातासमान वृद्धवय (श. परिपक्व वय) झालेल्या यांना प्रणाम असो.’ तेव्हा भद्रेने पुढे होऊन म्हटले,

१४. ‘गजगामिनी, ज्यांच्या हत्तींच्या कळपांच्या (गळ्यातील) घंटांच्या निनादाने जणू ब्रह्मांड फुटते ते हे गौडपती वीरमुकुट (महाराज) तुला आवडतात का ?’

राजकुमारी म्हणाली, ‘बाई ग ! असेही माणसांचे काळेकुट्ट भयानक रूप असते ? त्वरित पुढे चल. माझे हृदय थरथरू लागले.’ तेव्हा किंचित हसत भद्रा पुढे गेली आणि बोलू लागली,

१५. 'हे पद्माक्षी, सिप्रानदीच्या किनाऱ्यावरील वृक्षवाटिकेत क्रीडा करण्याची इच्छा असेल तर या अवंतीनाथ पद्मनाभांना नाथ कर.'

राजकुमारी म्हणाली 'हुशऽ! या स्वयंवर मंडपात फिरून मी दमून गेले. तेव्हा भद्रा अजून मला किती वेळ सांगणार आहे ?' भद्रेने विचार केला. 'हे पण माझ्या मनाला आनंद देत नाहीत,' असे राजकुमारीने सुचविले (श. सांगितले) तेव्हा पुढे जाते.' असा (विचार करून) तसेच करून भद्रा बोलू लागली.

१६. 'ज्यांचे सौंदर्य पाहून सहस्राक्ष (इंद्रा) ला (आपले) हजार डोळे निश्चितपणे सफळ झाले असे वाटते ते हे निषधपुत्र युवराज नळ आहेत.'

आश्चर्यचकित मनाने दयमंतीने विचार केला, 'ओहो ! सर्व रूपवंतांना मागे सारणारी काय ही शरीराची ठेवण (म्हृ.मोहक अंगलट)! ओहो ! काय हे असामान्य लावण्य ! ओहो ! काय हे विपुल सौंदर्य ! ओहो ! माधुर्याचा निवास असलेला काय हा विलास ! तेव्हा, हृदया, यांना पती मानून परम प्रसन्नता मिळव.' तेव्हा तिने नळाच्या नाजुक गळ्यात वरमाला घातली.

'ओहो ! हिने उत्तम वर निवडला, चांगल्या (अनुरूप वरा) स वरले.' असा लोकात कलकलाट माजला.

इतक्या अवधीत कृष्णराजा तलवार उपसून नळाला मारण्यास प्रवृत्त झाला, 'अरे नळ, तुला विवाहात (श. विवाह करण्यास) दमयंती मिळणार नाही. हिने जे तुला वरले ते अयोग्य केले. मला सोडून हिला दुसरा (वर) उचित नाही. तेव्हा हिला सोड किंवा युद्धाला तयार हो.

नळ म्हणाला, 'अरे नराधमा, 'दमयंतीने तुला वरले नाही म्हणून तू का उद्विग्न होतोस ? पुनः आता मला वरल्यामुळे या परस्त्रीची इच्छा करीत असताना कुळाला कलंक (लागेल) याची पर्वा करीत नाहीस, अपयशाच्या डागाला घाबरत नाहीस, लोकांविषयी तुला शरम वाटत

नाही, परलोकाविषयी भीत नाहीस. तेव्हा संतांचा मार्ग सोडलेल्या तुला शिक्षा केली पाहिजे.' असे (म्हणून) तलवार घेऊन नळ क्रोधाग्नीने जळफळत उठला.

विविध शस्त्रांनी भयानक झालेले दोघांचेही सैन्य युद्धाला तयार झाले.

तेव्हा दमयंती विचार करू लागली, 'हाय ! काय दुर्दैवी मी की माझ्याकरिता हा प्रलय माजला ! तेव्हा जर माझी अरिहंतावर भक्ती असेल तर, भगवती शासन देवते, नळाला विजयश्री प्राप्त होऊ देत, युद्ध शांत होऊ देत'; असे म्हणत तिने पाण्याचे भांडे घेतले आणि त्यातून पाण्याच्या तीन छटा शिंपडल्या. शरीराला पाण्याचा स्पर्श होताच कृष्णराजा विझलेल्या अंगाराप्रमाणे निस्तेज झाला. झाडावरून पिकलेले पान पडावे तशी त्याच्या हातून तलवार (खाली) पडली.

निर्विष नागाप्रमाणे क्रोधरहित कृष्णराजा विचार करू लागला, 'मी नळाशी बोललो ते अयोग्य आहे. हा सामान्य पुरुष नव्हे. तेव्हा मला प्रणाम करणे योग्य आहे.' तेव्हा त्याने प्रणामपूर्वक आपल्या अपराधाची नळाकडे क्षमा मागितली.

१७. नळानेही प्रणाम केलेल्या कृष्णराजाशी (प्रेमाने) बोलून त्याला निरोप दिला. खरी गोष्ट अशी आहे की (जं), थोर पुरुष प्रणाम करणाऱ्याविषयी वात्सल्यभाव दाखवतात असे विद्वान बोलतात, ते खरे आहे.

नळाच्या आचरणाने संतुष्ट झालेल्या भीमराजाने सत्कार करून बाकीच्या राजांना निरोप दिला आणि नळाला मोठ्या थाटाने दमयंतीचे पाणिग्रहण करावयास लावले. करमोचन (विधीच्या) वेळी त्याने नळाला अनेक हत्ती, घोडे, रत्नालंकार, वस्त्रादी दिले. अशा तऱ्हेने भीमराजाकडून सन्मान केला जात असता तो तेथे काही दिवस राहिला. त्या (भीम राजा) मागून काही अंतर चालल्यावर (म्ह. वेशीपर्यंत) नळ आपल्या नगरी निघाला. नळासमावेत जात असलेल्या दमयंतीलाही मातेने म्हटले–

१८. 'मुली, (सर्वांशी) गोड बोलावे, (वडिलधाऱ्यांशी) विनयाने वागावे, परनिंदा टाळावी आणि संकटातही शरीराच्या सावलीप्रमाणे आपल्या पतीला तू सोडू नको.'

ती शिकवण अंगिकारून तिने (त्यांना) प्रणाम केला आणि आई-वडिलांनी निरोप दिल्यावर दमयंती (नळराजासह) निघाली. रथामध्ये बसवून नळाने तिला आपल्या मांडीवर घेतले. नंतर नळाच्या प्रयाणा बरोबर चतुरंग सैन्याने उडवलेल्या पृथ्वीवरील धुळीच्या लोटाने आकाशमंडळ व्याप्त झाले असताना रस्त्यामध्ये आकाशातील रत्न (असलेला) सूर्य अस्तास गेला. नजरेचा आवाका संपूर्णपणे झाकून टाकीत विश्वामध्ये दाट काळोख पसरला. पाणी, जमीन, झाडे, पर्वत व खड्डा यांच्यातील फरक दिसून येईना. तरीही आपल्या नगरी (जाण्याकरिता) मन उत्कंठित झालेल्या नळाने प्रयाण थांबवले नाही.

१९. नजरेचा आवाका (काळोखपटलाने) झाकल्यामुळे आपले सैन्य अडखळत, खड्ड्यात पडत आणि वाकड्या रस्त्याने (म्ह. भलतीकडे) जात असलेले पाहून नळ प्रियेला म्हणाला.

'प्रिये क्षणभर जागी हो आणि कपाळावरील (स्वाभाविक) तिलक रूपी सूर्य प्रकाशित कर; कारण काळोखाने दृष्टीमार्ग रोखल्यामुळे सैन्य पुढे जाण्यास असमर्थ झाले आहे.'

उठून दमयंतीने हाताने भालप्रदेशाला स्पर्श केला. विपुल प्रभेचे निवासस्थान असलेला (तिच्या भालावरील) तिलक अंधःकाराचा नाश करीत प्रकाशू लागला. तेव्हा अडथळा नसल्यामुळे सैन्य रस्त्यावरून निघाले.

कोशलापुरीच्या परिसरात गेल्यावर नळ दमयंतीला म्हणाला, 'प्रिये, या माझ्या नगरीतील प्रदेश जिनमंदिरांनी सुशोभित झाला आहे.'

'ती म्हणाली, नळनाथांच्या प्राप्तीने मी धन्य झाले ! मी नेहमी मंदिरात (जिन) पूजा करीन.'

आता शुभ दिनी, अनेक अवडंबरांनी मंचक वैभवसमूहांनी पसरले असताना, प्रत्येक घरावर फडफडणारी (श. जणू आनंदाने नाचणाऱ्या) पताकांची टोके आकाशाला स्पर्श करीत असताना, विविध (मांगलिक) तूर्यवाद्यांच्या निनादांनी दिशामंडल भरून गेले असताना, अखंडितपणे तरुणींचा मेळावा नाचत असताना आणि पावलापावलागणिक मंगलविधी

केले जात असताना नळाने (कोशला) नगरीत प्रवेश केला. त्याने दमयंतीसमवेत आई–वडिलांना प्रणाम केला. त्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

तेव्हा नळ आणि दमयंती काही वेळा जलक्रीडा करीत; काही वेळेला हिंदोळ्यावर झोके घेण्याचे सुख अनुभवीत; काही वेळेला सुगंधित फुलांचे गुच्छ स्वतः आकर्षकपणे गुंफून ते परस्परांच्या केसात घालत. काही वेळेला अक्षद्यूतात रमत; काही वेळेला स्वतः नळ विविध वाद्यांचे वादन करण्यात दंग असताना एकांतात दमयंतीलाही नाचायला लावी. अशा रीतीने नळ दमयंतीपासून दूर न होता नवनवीन क्रीडा करीत काळ घालवीत होता.

एकदा नळाला आपल्या राज्यावर व कूबराला युवराजपदावर ठेवून निषधाने मुनिधर्म स्वीकारला.

२०. अनेक राजे आपली मस्तके ज्याच्या पदकमलावर नमवित होते आणि क्रोधाविष्ट शत्रूंना ज्याचे पसरलेले तेज सहन होत नव्हते असा अग्नीप्रमाणे असलेला नळ राज्याचे (न्यायाने) पालन करू लागला.

एकदा नळाने मंत्र्यांना विचारले, 'पित्याने व्यापलेली पृथ्वीच मी पाळतो आहे की (त्याहून) अधिक ?' ते म्हणाले, 'निषध (महाराजां) नी तिसरा भाग कमी अशा अर्ध्या भारताचा उपभोग घेतला, पण आपण सर्व भारतार्ध उपभोगताहात. तेव्हा पुत्र पित्याहून वरचढ आहे असे (म्हटले जाते ते) योग्य आहे. पण येथून दोनशे योजनावर तक्षशिला नगरी आहे. तेथे कदंब राजा आहे. तो आपली आज्ञा मानत नाही.

२१. अखिल भारतार्धावर विजय संपादन केलेल्या आपल्या निर्मळ कीर्तीचंद्रावर दुराचारी काळा डाग राहिला आहे.

आपण दुर्लक्ष केल्यामुळे छोटासा रोग वाढावा असा बलशाली होऊन तो दुर्जय बनला आहे. पण जर का आपण त्याला पराजित करण्याचे मनात घेतले, तर पर्वतावरून पडलेल्या घड्याप्रमाणे तो नष्ट होईल. म्हणून प्रथम दूत पाठवून त्याचे मन जाणून घ्यावे. नंतर जसे योग्य वाटेल तसे

करावे.' तेव्हा वेगवेगळ्या तऱ्हेने बोलण्यात कुशल अशा दूताला सूचना देऊन पाठविले. वेळ न दवडता (त्वरित) जाऊन त्यानें कदंबाला म्हटले—

२२. "शत्रूंचे अरण्य जाळण्यात बडवाग्नी असलेल्या नलमहाराजांनी आज्ञा केली आहे—माझी सेवा पत्करून आपल्या राज्याचे पालन कर.

२३. जर असे न करशील, तर शुभ कर्माचा नाश करणाऱ्या चारित्रभ्रष्ट मुनीप्रमाणे सात अंग असलेले राज्य गमाऊन बसशिल.

२४. पुनः मी तुझ्या हिताचा विचार करून दूत पाठविला आहे. नाही तर अवचितपणेच मी तुझा (केव्हाच) नाश केला असता ?"

२५. असे दूताचे बोलणे ऐकून दात ओठ खात (श. पुढील दातांनी ओठ चावत), स्वतःचे (सामर्थ्य) न जाणता कदंबराजा म्हणाला.

२६. 'तुझा स्वामी मूर्ख की मत्त झाला आहे की वातांच्या झटक्याने उन्मत्त बनला आहे? म्हणून सर्व शत्रूरूपी नागांना गरुड असलेल्या मला ओळखत नाही ?

२७. अशारीतीने असंबद्ध बडबड करणाऱ्या नळाला थोपवतील असे चांगल्या वाईटाचा विचार करण्यास समर्थ असलेले त्याच्या पाशी कोणी मंत्री नाहीत का ?

२८. हे दूत, जा. जर तुझा स्वामी आपल्या जीवनाबद्दल विरक्त बनला असेल, तर युद्धाला तयार होऊ देत. दूत, हा मी पण (युद्ध करण्यास) येतो आहे.'

२९. दूतानेही येऊन नळाला कदंबाचे बोलणे सांगितले. क्रोधाविष्ट होऊन चतुरंग सैन्यासह तो त्याच्यावर (आक्रमण करण्यास) निघाला.

३०. तो तक्षशिलेस पोहोचला. त्याने चोहोबाजूंनी तिला वेढा दिला. जणू दुसरा तटच अशी (सभोवती) हत्तीसेना उभारली.

ते असह्य झाल्यामुळे (युद्धाकरिता) तयार होऊन कदंब (नगरीतून) बाहेर पडला. दोनही सैन्यामध्ये युद्ध सुरू झाले. नाना शस्त्रांच्या आघातांनी बाहेर पडलेल्या किरणांनी सूर्याचा पसरलेला प्रकाश द्विगुणित झाला.

( सुटत असलेल्या ) बाणांच्या समुहांनी आकाशमंडळ आच्छादले. तल-वारींच्या प्रहारांनी निर्माण झालेल्या अग्निज्वाला भयंकर दिसू लागल्या. ( योद्धयांची ) कबंधे समुहांनी नाचत असलेली देव, सिद्ध व यक्ष ( उत्सुकतेने ) पाहत होते. योद्धयांची मस्तके वाहत असलेल्या रक्ताच्या प्रवाहात (जलाशयातील) कमळाप्रमाणे दिसत होती.

नळाने कदंबाला म्हटले, ‘ किडयाप्रमाणे असलेल्या या पायदळांना मारून काय करावयाचे ? तू आणि मी दोघेच युद्ध करूया. ’ तेव्हा जंगम (म्ह. फिरत्या) पर्वताप्रमाणें दोघेही द्वंद्वयुद्धादि युद्ध करू लागले. कदंबाने ज्या ज्या युद्धाची मागणी केली त्या त्या (युद्धा) मध्ये नळाने त्याला जिंकलें. तेव्हा पळून जाऊन संयम धारण करून ( ध्यान ) प्रतिमेत कदंब राहिला. नळाने पाहिले आणि म्हटले, ‘ या सच्चरित्राने तू मला जिंकले आहेस; तेव्हा आपले राज्य कर. ’ विरक्ततेने ( क्षुद्र ) वाऱ्या-प्रमाणे ते असार मानून कदंबाने नळाची उपेक्षा केली. कदंबाच्या (आत्म) सामर्थ्याने आनंदित मन झालेल्या नळाने कदंबपुत्र जयशक्तीस कदंबाच्या (तक्षशिला) राज्यावर बसविले.

( मांडलिक ) राजांनी विष्णूप्रमाणे नळाचा भारतार्धराज्यावर अभिषेक केला. ( निष्ठेने राज ) भक्ती करण्यात कुशल असलेल्या राजांच्या ( विविध ) नजराण्यांनी हळूहळू ( श. पावला पावला गणिक ) त्याचे द्रव्य भांडार वाढू लागले. आकाशगामिनी ( विद्याधर–सिद्ध ) रमणींचा समूह त्याच्या सामर्थ्याचे गुणगान करीत असताना नळ कोशलानगरीत आला. तो विविध क्रीडांनी दमयंती सह रममाण होत दिवस घालवू लागला.

पण आपल्या कुळाचा कलंक असलेला कूबर नळाला फसवण्याची ( संधी ) शोधत राहिला. चंद्रावरील डागाप्रमाणे दुर्दैवाने जुगाराचे व्यसन जडले होते. ‘ नळाचे राज्य जिकेन, ’ असा विचार करीत कूबर नळाला खेळवत असे. दोघेही जुगार खेळत असताना ( इकडे–तिकडे ) सरकणाऱ्या डमरूवरील (दोराच्या) गाठीप्रमाणे विजयश्री (एकदा इकडे तर दुसऱ्यांदा तिकडे) झुलत असताना पुष्कळ काळ लोटला. एकदा नियतीच्या अवकृपेने

(श. आधीन झाल्यामुळे) नळ कूबराला जिंकू शकला नाही. खेळात कुशल असूनही नळाचे इच्छिलेले फासे अनुकूल पडले नाहीत. पुनः पुन्हा नळाने लावलेले द्रव्य क्रूर कूबर हिरावून घेऊ लागला. कूबराने नळाची नगरे, गावे, खेडी, व्यापारी शहरे जिंकून घेतली. (श. नळाला हरवायला लावली.) उन्हाळ्यात तलावातील पाणी कमी व्हावे, त्याप्रमाणे नळ वैभवहीन होऊ लागला. जुगारात बेहोष (श. अंध) झालेल्या नळाविषयी लोक खिन्न झाले. मनोरथ पूर्ण होत असल्यामुळे कूबर हर्षित झाला. नळावरील प्रेमामुळे लोक हाहाकार करू लागले. तो ऐकून दमयंती (तेथे) आली.

३१. ती म्हणाली, 'नाथ, माझ्यावर कृपा करा. मी प्रार्थना करते. हा जुगार सोडून द्या. संकटात टाकण्यास दक्ष असलेले हे फासे खरोखर आपल्याला शत्रूप्रमाणे आहेत.

३२. हे राज्य स्वतः धाकटा भाऊ कूबराला द्या, हे चांगले. 'याने हट्टाने राज्य घालविले,' अशी आपली अपकीर्ती होऊ देऊ नका.

३३. जे राज्य युद्ध करून मिळविले ते जुगारामध्ये घालवले म्हणून, नाथ, धनुष्याची दोरी कानापर्यंत ओढता न आल्यामुळे (वीराला) व्हावे तसे माझ्या मनाला दुःख होते आहे.'

३४. अंकुशाची पर्वा न करता उन्मत्त हत्तीप्रमाणे नळाने तिचे म्हणणे मानले नाही. (तेव्हा) ती मंत्र्यांना म्हणाली, 'नळ (महाराजां) ना जुगारापासून परावृत्त करा.'

३५. त्यांनीही पुष्कळ तऱ्हेने सांगितले, तरीही नळ जुगारापासून परावृत्त झाला नाही. खरोखर सन्निपात झालेल्या माणसाला कसलेही औषध संभवत नाही.

३६. नळराजा सर्व राज्य हरला, दमयंतीप्रमुख अंतःपुरातील सर्व स्त्रिया घालवून बसला आणि अंगावर घातलेले सर्व अलंकार हरला.

३७. कूबर म्हणाला, 'माझे राज्य सोड. येथे राहू नको. पित्याने तुला राज्य दिले, फासांनी पुनः मला (ते) दिले.'

३८. 'भद्र प्रबल बाहुबल असलेल्यांना (विजय) लक्ष्मी दूर नाही. (हा) गर्व सोडून दे.' असे म्हणत नेसते वस्त्रच धन असलेला तो आनंदाने निघाला. खरोखर, संकटातही धैर्यशील कष्टी ( श. दुःखी स्वभावाचे ) होत नाहीत.

नळाच्या मागून जाणाऱ्या दमयंतीला कूबराने अडवले. 'हे मृगाक्षी, तू जाऊ नकोस. द्यूतात मी तुला जिंकले. आहे, म्हणून माझे अंतःपुर विभूषित कर.'

तेव्हा मंत्री कूबराला म्हणाले, 'महासती दमयंती परपुरुषाच्या सावलीलाही स्पर्श करीत नाही. तेव्हा हिला आपल्या अंत.पुरामध्ये टाकू नका. कारण वडिल भावाच्या पत्नीकडे मातेप्रमाणे पाहावे.

३९. आणि जर हट्टाने असे कराल, तर ही सती आपल्याला भस्मसात करील. खरोखर सतींना काही सुद्धा करणे कठिण नाही.

तेव्हा या सतीला भडकवून अनर्थ ओढवून घेऊ. (श. अनर्थात पडू) नका. खरोखर पतीमागून जाणाऱ्या हिला उत्साहित करावे; या उलट हिला का आडवता ? नको ते नल (महाराजां)ना गाव, खेडे, आदि प्रदान करणे, शिदोरी सह सारथ्या समवेत एक रथ द्या.'

असे मंत्र्यांनी सांगितल्यावर कूबराने नळासह दमयंतीला पाठवले. सांगितल्याप्रमाणे रथ अर्पण केला.

नळ म्हणाला, 'ज्या मी अर्ध भारत जिंकून मिळालेले वैभव लीलेने सोडून दिले त्या मला रथ काय कामाचा ?'

मंत्र्यांनी नळाला म्हटले, 'दीर्घकाल सेवा करूनही आम्ही आपल्या मागून जात असता कूबराने आडवले. आणि पुन।

४०. या वंशात जो राजा असेल, त्याची सेवा करावी, हा आमचा धर्म आहे, आपण राज्य दिले. तेव्हा आम्ही यांना कसे सोडावे ?

आता दमयंतीच आपली पत्नी, मंत्री, मित्र, आणि पायदळ आहे. शिरीष फुलासारखे शरीर कोमल असलेली सूर्याच्या किरणसमूहांनी

तापलेल्या धूलिकणांनी दुर्गम झालेल्या रस्त्यावरून कमलासारख्या सुकोमल पावलांनी कसे चालेल ? तेव्हा, प्रभू, रथ घ्या. आमच्यावर अनुग्रह करा, राणी समवेत यावर आरूढ व्हा.'

अशा रीतीने मंत्र्यांनी विनवणी केल्यावर नळराजा दमयंतीसह रथात बसून निघाला. स्नानास तयार झाल्याप्रमाणे एकवस्त्रा दमयंतीस पाहून (अविरत गळणाऱ्या) अश्रूबिंदूंनी जणू दुसरे (मोत्यांचे) हार घातलेल्या नगरस्त्रिया रडू लागल्या.

जात असताना नळाने नगरीमध्ये पाचशे हात प्रमाणाचा खांब पाहिला. राज्य नष्ट झाल्यामुळे निर्माण झालेल्या दुःखाची क्षिती न बाळगता कुतूहलाने त्याने केळीचा खांब उपटावा तसे लीलेने तो उपटून काढला. (उद्दंड राजांना) भ्रष्ट करून (आणि शरण आल्यावर पुनः त्यांना) तेथेच स्थापन करण्याचे जणू राजव्रत दाखवीत, पुनः त्याने (तो खांब) तेथेच उभारला.

ते पाहून नागरिक बोलू लागले, 'अहो, सामर्थ्यशाली असूनहीं नळ राज्य भ्रष्ट झाला. काय हा नशिबाचा योग ! पूर्वी नगरोद्यानात कूबराबरोबर नळ खेळत असता (तेथे) दिव्यज्ञानचक्षू असलेले मुनी आले. त्यांनी (भाकित) केलें, 'नळ भावी दक्षिणेकडील भारतार्धाचा स्वामी होईल. तो नगरामध्ये असलेला पाचशेहे प्रमाणाचा खांब उपटेल. अशा या दोन्ही गोष्टी घडलेल्या आम्ही आमच्या डोळ्यांनी पाहिल्या. पण नळ जिवंत असतानाही कोसलामधे दुसरा राजा झाला हे विसंगत आहे. अथवा मुनिवचन विपरीत होत नाही. पण जर कूबर (राजा म्हणून) नांदला नाही, तर नळच येथे राजा होईल.'

अशा रीतीने लोकांचे बोलणे ऐकत असताना रडत असलेल्या दमयंतीने अश्रुजलाने रथ भिजवला आणि नळ नगरीतून बाहेर पडला. भीमकन्येला नळ म्हणाला, 'प्रिये, कोठे जाऊया ?'

तेव्हा नळाच्या आदेशाने सारथ्याने रथाच्या घोड्यांना कुंडिनपुराकडे जायला प्रेरित केले. क्रमाने नळ अरण्यात पोहोचला. (तेथे) गुरगुरणाऱ्या

विक्राळ वाघांमुळे अनेक प्रवासी घाबरून गेले होते. भयंकर गर्जना करणाऱ्या सिंहांनी (तेथे) हरणांच्या कळपांचा संहार केला होता. सरपटणाऱ्या विषारी सापांनी ते भयानक झाले होते. श्वापद समूहांचे ओरडणे (तेथे) ऐकू येत होते. तेथे हाती धनुष्य, बाण व भाले घेतलेल्या भिल्लांनी त्याला रोखले. रथातून उडी मारून ( श. रथ सोडून ) हाताने तलवार नाचवत नळ त्यांच्या पुढे ठाकला. 'सिंहाप्रमाणे असलेले आपण कोल्ह्यासमान असलेल्या यांना कसले आव्हान देता ? भारतार्धाच्या विजयाने प्राप्त झालेल्या जयश्रीचे विलासभवन असलेल्या आपल्या तलवारीला पशूसमान असलेल्या यांच्यावर प्रहार करताना लाज नाही का वाटणार ?' असे म्हणत रथातून उतरून दमयंतीने नळाला हाताने धरले. दमयंतीने शीलप्रभावाने दुस्सह असा हुंकार सोडला. सिंहगर्जनेने हरिण पळावेत तसे ( तिच्या हुंकाराने घाबरून) भिल्ल निरनिराळ्या दिशांना पळाले. नळासमवेत दमयंती भिल्लांच्या मागून दूरवर गेली.

४१. इतक्यात दुसऱ्या भिल्लांनी त्यांचा तेथील उत्कृष्ट रथ पळवला. नशीबाने पाठ फिरवली म्हणजे माणसाचा पराक्रम काय करणार ?

४२. दमयंतीचा हात आपल्या हाती घेऊन तिला पाणिग्रहणोत्सवाच्या वेळची आठवण देत नळ त्या अरण्यात चालला.

४३. दर्भांच्या टोकांनी भेदलेल्या तिच्या कमलाप्रमाणे सुकोमल पावलातून ठिबकत असलेल्या रक्ताच्या थेंबांनी दमयंतीने जणू ते अरण्य इंद्रगोपांकित केले.

४४. राज्य ( उपभोगत असताना ) दमयंतीच्या मस्तकावर ( राजाचिन्ह म्हणून ) जो पट्टबंध होता, तो आता नळाने आपल्या वस्त्राच्या तुकड्यासह तिच्या पायांना बांधला.

४५. रस्त्याने चालल्यामुळे शरीर थकल्यामुळे झाडाखाली बसलेल्या दमयंतीला नळराजा आपल्या नेसत्या वस्त्राच्या पदराचा पंखा करून वारा घालू लागला.

४६. नळाने पानाच्या द्रोणातून पाणी आणून तहानेलेल्या तिला पाजले. तिने नळाला विचारले, 'अद्यापि किती अरण्य जावयाचे आहे ?'

नळ म्हणाला, 'प्रिये, हे अरण्य शंभर योजन (प्रमाणाचे) आहे. अद्यापी आम्ही (अवघे) पाच योजन ओलांडले. धीर धर.' अशा तऱ्हेने बोलत ते रस्त्यावरून जात असताना साहाय्य करण्यास अशक्य झाल्यामुळे जणू लज्जित होऊन सूर्य मावळत्या पर्वतशिखरावर लपला. अरण्यात नळाने अशोकाच्या पालवींनी प्रशस्त शय्या पसरली. त्याने दमयंतीस म्हटले, 'प्रिये, येथे झोपून दुःखाला मुद्रा ठोकून निद्रेला अवसर दे. पुरे भीतीची शंका. मी तुझा पहारेकरी,' असे (म्हणून) नळाने शय्येवर आपले अर्धे वस्त्र पसरले. अरिहंत देवाला वंदन करून आणि पंच परमेष्ठी मंत्राचा जप करून दमयंती तेथे झोपली. ती झोपली असताना नळ विचार करू लागला—

४७. 'जे पुरुष सासऱ्याकडून आसरा मिळवतात, ते पुरुष म्हणून (प्रशंसिले) जात नाहीत. तेव्हा दुर्दैवी मी दमयंतीच्या पित्याच्या घरी कसा जाईन ?

४८. वज्रासारखे कठोर हृदय करून प्रिय अशाही दमयंतीला सोडून रंकाप्रमाणे स्वत: मी कोठेतरी दुसरीकडे जाईन.

४९. शीलप्रभावामुळे दमयंतीवर कोणतेही संकट येणार नाही. सतीचे शीलच सर्वांगाचे रक्षण करणारे कवच आहे.' तेव्हा त्याने खंजिराने अर्धे वस्त्र कापले. दमयंतीच्या वस्त्राच्या पदरावर आपल्या रक्ताने (खालील) अक्षरे लिहिली,

५०. 'वटवृक्षाच्या उजव्या दिशेला विदर्भाकडे, पण डाव्या दिशेला कोशलाकडे रस्ता जातो. जेथे (जावे) वाटेल तिकडे जा.

पण मी दुसरीकडे जाईन.' तेव्हा जणू मूक रुदन करीत व हळुवार पावले टाकीत नळ जाऊ लागला. झोपलेल्या आपल्या प्रिय कांतेकडे मान वळवून पाहत कितीतरी दूर जाऊन (श. भूमिभाग आक्रमून) तो विचार करू लागला. 'आहाराच्या इच्छेने वाघ किंवा सिंह या झोपलेल्या अनाथ मुग्धेला जर खाईल, तर माझी काय अवस्था होईल ? म्हणून सूर्योदयापर्यंत हिचे रक्षण करतो सकाळी ही आपल्या इच्छेने जाऊ दे.' तेव्हा संपत्ती गमावलेल्या माणसाप्रमाणे नळ त्याच पावली परतला.

जमिनीवर (शांत) झोपलेल्या दमयंतीला पाहून त्याने विचार केला, 'हाय ! एकवस्त्रा एकटी दमयंती निर्जन अरण्यात झोपली आहे. अहो ! नळाचे अंत:पुर सूर्याच्याही नजरेला पडत नव्हते. माझ्या कर्मदोषाने या कमलनयनेची ही दशा झाली आहे. तेव्हा हताश असा मी काय करू ? जणू पतीहीन अशा प्रियेला जमिनीच्या पृष्ठावर पडलेली पाहत असतानाही जर मला निर्लज्जाला लाज वाटली नाही, तर खरोखर मी वज्राने घडवला गेलो आहे. अरण्यात मी सोडून दिल्यामुळे (सकाळी) जागी झाल्यावर माझ्याशी प्रतिस्पर्धा करण्यासाठी ही जीवाचाही त्याग करील. तेव्हा या पतिव्रतेला सोडून दुसरीकडे जाण्यास माझे मन धजावत ( श. उत्साही होत ) नाही, माझे जगणे वा मरणे हिच्या बरोबर होऊ दे. अथवा शेकडो संकटांनी भरलेल्या अरण्यात मीच दु:खाचा भागीदार व्हावे. पुन: ही वस्त्रावर लिहिलेली माझी आज्ञा जाणून स्वजनाघरी जाऊन सुखाने राहील.' असा निश्चय करून (तेथे) रात्र घालवून प्रिया जागी होण्याच्या वेळी घाईने पावले टाकीत नळ नजरेआड गेला (श. अदृश झाला. )

उमललेल्या कमळाच्या सुगंधाने सुगंधित झालेला आल्हादक वारा (वाहत असताना) पहाटे दमयंतीने स्वप्न पाहिले. 'फळांनी व मंजरींनी ( श. फुलांनी ) (बहरून) आकर्षक झालेल्या आंब्याच्या झाडावर मी चढले. मी त्याची मधुर फळे खाल्ली. अवचितपणे रानहत्तीने तो (वृक्ष) उखडून टाकला. तेव्हा मी पक्षाच्या अंड्याप्रमाणे जमिनीवर पडले.' तेव्हा जागी झाल्यावर नळ न दिसल्यामुळे कळपातून चुकलेल्या हरिणीप्रमाणे दमयंती (इकडेतिकडे) दिशा पाहत विचार करू लागली. 'हाय ! मी अतिमहान (संकटात) पडले आहे. कारण नाथांनी निराधार (अवस्थेत) मला अरण्यात सोडून दिले. अथवा सकाळी मला तोंड धुण्याकरिता पाणी आणण्यास नाथ कोठे तरी जलाशयाकडे गेले असावेत. अथवा नळांच्या असामान्य रूपावर भाळल्यामुळे कोणा तरी विद्याधरीने त्यांना रतीक्रिडेसाठी नेले असावे तीच झाडे, तेच पर्वत, आणि तेच अरण्य. (केवळ) चंद्रासारखा मोहक चेहरा असलेले नळ दिसत नाहीत.' अशारीतीने मन अनेक कुशंकांनी आकुल झाले असताना (सर्व) दिशांना पाहून नळ न दिसल्यामुळे घाबरून

ती स्वप्नाच्या अर्थाचे चिंतन करू लागली. 'फुलाफळांनी समृद्ध आम्रवृक्ष म्हणजे नळमहाराज. मी जो फळाचा अस्वाद चाखला तो म्हणजे राज्यसुखाचा उपभोग घेतला. रानहत्तीने तो (वृक्ष) उखडला, म्हणजे दैवाने नळांचा राज्यावरून भ्रष्ट केले. पुनः जी मी त्यावरून पडले म्हणजे नळापासून दुरावले तेव्हा या स्वप्नाने मला त्यांचे दर्शन (सुख) दुर्लभ झाले.'

५१. म्हणून दमयंती गळा काढून मोठमोठ्याने रडू लागली. भित्र्या मनाच्या स्त्रियांना संकटात धीर राहत नाही.

५२. 'हाय ! नाथ, आपण माझा का त्याग केला ? मी आपणाला भारभूत झाले होते का ? खरोखर नागाला स्वतःची कात (अथवा शरीराला स्वतःची काचोळी) केव्हाही भार होत नाही.

हे वनदेवींनो, मी तुमची प्रार्थना करते. माझ्या प्राणनाथाला दाखवा. अथवा हे धरणी, पिकलेल्या वाळकाप्रमाणे फूट, म्हणजे त्या विवरातून शिरून मी पाताळात शांती मिळवीन.' असा विलाप करीत अश्रूजलाच्या प्रवाहांनी रानातील झाडांना सिंचन करीत नळाविना जळी स्थळी कोठेही आनंद प्राप्त न होता श्वेत पदरावर अक्षरे पाहून दमयंती प्रफुल्ल वदनाने वाचू लागली. 'खरेच प्रिय (नाथां)नी केवळ शरीराने माझा त्याग केला, मनाने नव्हे. नाहीतर कसे काय बरे आदेश देऊन माझ्यावर अनुग्रह करतील ? तेव्हा वडिलधाऱ्याप्रमाणे पतीची आज्ञा पाळताना माझे येथील जीवन (श. माझा इह लोक ) पवित्र होईल. म्हणून पित्याच्या घरी चलते. खरी गोष्ट अशी की (जं) स्त्रियांना पतीशिवाय पतीचे घर तिरस्काराचेच घर होय.' असा निश्चय करून (वस्त्रावरील) अक्षरे पाहत जणू नळ सांगातीच आहे (असे समजून) ती वटवृक्षाच्या उजवीकडील दिशेच्या रस्त्याने निघाली. तिच्या निर्मळ शीलप्रभावाने (कोणत्याही) उपद्रवाचा तिच्यावर केव्हाही असर झाला नाही. तसेच खरोखर–

५३. क्रोधावेशाने पंजा (मारण्यास) सज्ज होऊन वज्र (तीक्ष्ण) दाढा समूहामुळे त्याच्याकडे पाहण्यास भय वाटत असलेला (श. न पाहवणारा) सिंहही तिच्या जवळच्या प्रदेशाकडे जाऊही शकत नव्हता.

५४. मदाच्या गंधाने भारावून भ्रमर व टोळांच्या (गुंजारवाने) क्रोधाविष्ट होऊनही सर्व दिशामंडळ (आपल्या चित्कारांनी) बधिर करीत सोंडा उंचावलेला हत्तींचा कळप दूरून जात होता.

५५. धूराच्या लोटांनी दिशा काळवंडणारा मोठाल्या ज्वाला असलेला आणि आकाशाच्या पृष्ठभागाला भिडणारा वडवाग्नी (तिला) संतप्त न करता तिच्यापाशी पोहोचण्यापूर्वीच विझून गेला.

५६. ।सरलेल्या मोठाल्या फणांतून फुत्कार टाकत असताना विषांचे थेंब सर्वत्र उधळीत अत्यंतिक क्रोधाने विवश होऊनही नाग तिला ( डंख ) मारण्यास समर्थ झाले नाहीत

५७. केवळ तिच्या दृष्टीक्षेपाने अत्यंतिक अहंकाराचा प्रभाव नष्ट होऊन राक्षस भूतादि तोंड फिरवून (तिच्यापासून) दुरून जाऊ लागले.

आता प्रवासाच्या ( श. रस्त्याच्या ) परिश्रमाने घामाच्या पाण्याने गात्रे धुवून निघालेल्या काटयादिमुळे विद्ध झालेल्या पायांच्या तळव्यापासून रक्त ठिबकत असलेल्या, आणि धूळीने शरीरकांती मलीन झालेल्या तिला एक मोठा तांडा दिसला. तिने विचार केला, ' ओहो ! माझ्या पुण्योदयाने अरण्य ओलांडण्यास कारणीभूत असा प्रशस्त तांडा माझ्या दृष्टीस पडला. जेव्हा ती किंचित स्वस्थ झाली. तेव्हा ( अचानक ) चोहोकडून विविध शस्त्रांनी भयंकर झालेल्या चोरांनी तांडा रोखला. तेथील लोक घाबरले. ती म्हणाली, ' भिऊ नका. ' तिने चोरांना हाकारले, 'अरे दुष्टांनो, मी रक्षा करीत असलेला हा तांडा लुटू नका, नाहीतर अनर्थ पावाल.' तरीही चोर ( आक्रमण करण्यापासून ) थांबले नाहीत. तेव्हा तिने शीलप्रभावाने असह्य असे हुंकार सोडले. धनुष्याच्या प्रत्यंचाच्या टणत्कारांनी कावळे (उडून जावेत) त्याप्रमाणे त्या (हुंकारां)नी चोर पळून गेले.

तांड्यातील लोक म्हणाले, ' आमच्या पुण्याईने ही कोणी तरी देवी (येथे) राहिली आहे की जिने चोरांपासून तांड्याचे रक्षण केले.'

मातेप्रमाणे तिला प्रणाम करून सार्थवाहाने विचारले, ' देवी, आपण कोण आहात ? या अरण्यात का फिरताहात ? '

रडत तिने भावाप्रमाणे असलेल्या त्याला आपली सर्व हकिगत सांगितली.

तो म्हणाला, 'नळमहाराजांची पत्नी म्हणून आपण मला पूजनीय आहात. आपण चोरापासून रक्षण करीत असताना उपकाराने मला विकत घेतले आहे. तेव्हा माझे निवासस्थान पवित्र करा,' असे म्हणून त्याने दमयंतीला आपल्या निवासाकडे नेले. सार्थवाहाने देवीप्रमाणे तिची आराधना केली.

इतक्या अवधीत पाऊस सुरू झाला. मोठचा गडगडाटाने ब्रह्मांडाचे भांडे भरून गेले इंद्रधनुष्य (प्रकट) झाले. मोरांचा समूह (आनंदाने) नाचू लागला ढगांच्या पटलाने आकाशमंडळ झाकून गेले. अखंडित वर्षावामुळे (वातावरण) थंड झाले. पाण्याच्या प्रवाहाने पृथ्वीतल विभूषित झाला तीन दिवस (रात्री) अखड वृष्टी झाली. तेथे दमयंती आनंदाने राहिली. वृष्टी थांबताच ती तांडा सोडून निघाली. तिला (एक) राक्षस दिसला. वडवाग्नीने आग भडकलेल्या पर्वताप्रमाणे त्याचे केस पिंगट होते. दुसरे रूप धारण केलेल्या कृतांतकाळाप्रमाणे त्याचे शरीर काळेकुट्ट होते. विजेच्या अनेक छटांनी भयंकर दिसणाऱ्या ढगाप्रमाणे त्याने विक्राळ कातऱ्या हाती घेतल्या होत्या. तो म्हणाला, 'सात दिवसाच्या (श.रात्रीच्या) भुकेलेल्या मला भक्ष्य मिळाले आहे, तेव्हा मी तुला खाईन.'

ती म्हणाली, 'भद्र, जन्मलेल्या प्राण्याला मरण निश्चित आहे. अकृतार्थाला मरणाचे भय. पण मी सुरवातीपासून देव-गुरूभक्तीने कृतार्थ झाले आहे मला मरणाची भीती नाही. आणि पुन:-

५८. अनेक प्रकारच्या दु:खांनी व्यथित झालेली मी दु:खातून सुटका होण्यासाठी मरणाची प्रार्थना करते आहे. नळाच्या विरहाग्नीने जळत असलेल्या मला तू आनंदाने खावेस.

५९. तेव्हा खा का विलंब करतोस? ही मी स्वत:ला तुझ्या स्वाधीन करते. मरणाशिवाय दु:खांना कोठून जलांजली मिळणार ?'

तेव्हा तिच्या धैर्याने राक्षस संतुष्ट झाला. तो म्हणाला, 'भद्रे, मी संतुष्ट झालो आहे. तुझे मी काय प्रिय करू ?'

ती म्हणाली, ' जर संतुष्ट झाला असशील, तर माझ्या पतीचे मिलन केव्हा होईल ते तू सांग. '

विभंगज्ञानबलाने जाणून राक्षसाने सांगितले, 'प्रवासाच्या दिवसापासून सुरू करून बारा वर्षे पूर्ण झाल्यावर पित्याच्या घरी राहत असताना नळ स्वत:च (येऊन) तुला भेटेल.' पुन: तो म्हणाला, 'हा प्रवासाचा त्रास काय कामाचा? जर म्हणत असशील तर केवळ क्षणभरात तुला वडिलांच्या घरी घेऊन जाईन.' ती म्हणाली, ' नळ (महाराजां)च्या भेटीविषयी सांगितल्याने मी कृतार्थ झाले आहे. मी परपुरुषाबरोबर जात नाही. तू आपल्या ठिकाणी जा. '

तेज:पुंज चमकणारे देवाचे शरीर दाखवून राक्षस अदृश्य झाला.

पतीचा बारा वर्षांचा प्रवास जाणून दमयंतीने व्रते घेतली. ' नळ भेटणार नाहीत तोवर मी लाल कपडे, पानाचा विडा, अलंकार, विलेपन आणि उन्मत्त करणारे अन्न घेणार नाही.' तेव्हा तीव्र तपाचरणामध्ये तत्पर असलेली दमयंती पारण्याच्या वेळी बीजरहित फळांच्या आहाराने प्राण जगवत हृदयात धारण केलेल्या (भगवान) शांतिनाथांच्या प्रतिमेचे ध्यान करीत पर्वतगुंफेमध्ये जाऊन बसली

तांड्यामध्ये ती न दिसल्यामुळे गोंधळलेल्या मनाने सार्थवाह (तिचा) शोध करीत पर्वतगुंफेपाशी आला. ध्यान संपल्यावर ती त्याच्याशी बोलू लागली. त्यांचे बोलणे ऐकून काही तपस्वी आले कान देखील न हलविता उभ्या राहिलेल्या हरिणीप्रमाणे ते (निश्चल) राहिले.

इतक्या अवधीत मोठाल्या धारांनी ढग वर्षाव करू लागला. (अविरत) बाणांच्या (वर्षावा) प्रमाणे (पावसाच्या) धारांनी ताडले जात असताना तपस्वी म्हणाले, 'आता पावसाच्या वर्षावापासून सुटका करून घेण्यासाठी कोठे जावे ?'

दया येऊन दमयंती म्हणाली, 'भद्र, भिऊ नका ?' त्यांच्या चोहोबाजूने गोलाकार रेघ मारून तिने शीलशापना केली (म्ह. शीलाची शपथ घेऊन ऐकवले), ' जर माझे शील अखंडित असेल तर ढगाने गोलाकार रेघेबाहेर वर्षाव करावा.' तेव्हा छत्राने झाकल्याप्रमाणे पाणी गोलाकार

रेघेमध्ये पडले नाही. पडत असलेल्या पावसाच्या पूराने दुसरीकडील दगडेही धुवून गेली.

ते पाहून विस्मित मनाने ते म्हणाले, 'अहो ! असले रूप मानवी (स्त्री)चे नव्हे, किंवा अशी शक्तीही नव्हे, तेव्हा, खरोखर, ही कोणी तरी देवी असावी.'

सार्थवाहाने विचारले, 'आपण कोणाचे ध्यान करता ? आणि निर्भय कशा राहता ?'

ती म्हणाली, 'मी अरिहंतप्रभूंचे ध्यान करते. त्यांच्या प्रभावाने मला भीती वाटत नाही.' (सत्) देव, गुरू व धर्माचे स्वरूप विस्ताराने सांगून तिने सार्थवाहाला जिनधर्म स्वीकारावयास लावला. तपस्व्यांनीही खीर मिळाल्यावर कांजीची निंदा करावी तसे स्वतःच्या धर्माची निंदा करीत जिनधर्म अंगिकारला.

तेथे सार्थवाहाने नगर वसविले. पाचशेहे तपस्वी येथे आत्मजागृत झाले म्हणून 'तापसपुर' असे ते प्रसिद्ध झाले. तेथे (भगवान) शांतिनाथांची प्रतिमा असलेले मोहक जिनमंदिर बांधविले. सर्वच जिनधर्मामध्ये तत्पर होऊन काळ घालवू लागले.

एकदा मध्यरात्री दमयंतीने पर्वतशिखरावर उगवत्या सूर्याच्या प्रभापुंजाप्रमाणे प्रकाश पाहिला. देव वर उडत वर जात असलेले व खाली येत असलेले दिसले. त्यांच्या जयजयकार आवाजाने लोक जागे झाले. दमयंती त्यांच्या बरोबर पर्वतावर चढली. तेथे देवांनी सिंहकेसरी मुनींचा केवलज्ञानप्राप्तीचा उत्सव केला.

त्या मुनींना वंदन करून सर्व समोर बसले. इकडे त्या केवलींचे जयभद्र नावाचे गुरू तेथे आले. तेही केवलींना वंदन करून बसले. केवलींनी असार संसाराचे स्वरूप उत्तमरीतीने विषद करणारा धर्मोपदेश केला.

इतक्या अवधीत आकाश प्रकाशित करीत तेथे (एक) देव आला. केवलींना वंदन करून तो दमयंतीला म्हणाला, 'भद्रे, मी येथेच तपोवनामध्ये उग्र तपाचरणात तत्पर असलेला कुलपतीचा कर्पर नावाचा शिष्य आहे.

पंचाग्नीतप साध्य करूनही तपस्व्यांनी माझे अभिनंदन केले नाही. तेव्हा त्यांच्यावर अत्यंत क्रोधाविष्ट होऊन मी दुसरीकडे गेलो घनदाट काळोखाने दाटलेल्या रात्री जात असता मी पर्वताच्या दरीत पडलो. पर्वताच्या कडीकपारी आपटल्यामुळे दात पडल्याच्या वेदनेने बेहोष होऊन मी तेथेच पडून सात रात्री राहिलो. अमंगल स्वप्नांप्रमाणे तपस्व्यांनी त्याचा उच्चारही केला नाही; मग उपचार कसला ? विशेषत: घरातून निघून गेलेल्या सापाप्रमाणे मी तपोवनातून निघून गेल्यामुळे तेथील तपस्व्यांना आनंद झाला. तोही (मी) तपस्व्यांविषयी विशेष क्रोध करून मरण पावून तेथेच तापसवनात साप होऊन जन्मलो. एकदा मी फणा उंचाऊन तुला दंश करण्यासाठी धावलो. तूही मला पाहून परमेष्ठीमंत्र जपू लागलीस. त्यामुळे माझ्या कानावर (शब्द) पडताच माझी गती रोखली गेली. पुन: मी बिळात शिरलो. एकदा तपस्व्यांना तू धर्म सांगत असताना मी ऐकला.

६०. 'जो क्रोध, मान, माया आणि लोभाधीन होऊन प्राणिवध करतो, तो जीव दुसऱ्या जन्मात अत्यंतिक दु:खे भोगतो.'

तेव्हा मी विचार केला, 'हाय ! जो प्राणिवध करून जगतो त्या माझे कसे होईल ? या तपस्व्यांना मी पूर्वी कोठेतरी पाहिले आहे;' असा उहापोह करीत असताना मला जातिस्मरण झाले. संवेगपूर्वक पूर्वी केलेल्या दूराचारांची निंदा करीत मी अनशन केले. मरून तो मी सौधर्मस्वर्गामध्ये कुसुमप्रभ नावाचा देव झालो. तुझा धर्मोपदेश ऐकल्यामुळे देवत्व प्राप्त झाले म्हणून उपकारी अशा तुझ्या दर्शनास मी आलो आहे. तेव्हा मी तुझा धर्मपुत्र आहे.' त्याने तपस्व्यांना म्हटले, 'पूर्वी केलेल्या क्रोधाच्या आचरणाबद्दल मला क्षमा करा. पूर्वी स्वीकारलेली श्रावकव्रते पाळा.'

गिरिकंदरातून ते सापाचे कलेवर काढून झाडावर लटकविले आणि म्हटले, 'जो कोणी क्रोध करेल, तो कर्पराप्रमाणे दुसऱ्या जन्मात साप होईल.'

तेव्हा विरक्तचित्ताने कुलपतीने केवलींना म्हटले, 'भगवान, मला दीक्षा द्या.'

केवली म्हणाले, ' हे यशभद्र आचार्य तुम्हाला दीक्षा देतील. '

पुन: कुलपतीने विचारले, ' आपण दीक्षा कशी काय घेतली ? '

केवली सांगू लागले ' कोशलानगरी मधील कूबराचा मी मुलगा, भंगानगरीच्या केशरीराजाने आपली बंधुमती नावाची कन्या मला दिली. पित्याच्या अनुज्ञेने जाऊन मी तिच्याशी विवाह केला. तिच्यासह परत येत असताना रस्त्यावर हे आचार्य पुढे आलेले दिसले. मी अत्यंत भक्तीने त्यांना वंदन केले कानांना अमृतप्रवाहाप्रमाणे त्यांचा उपदेश ऐकला. मी त्यांना विचारले, ' भगवान, माझे जीवन किती आहे ? '

उपयोग लावून आचार्यांनी सांगितले, वत्स, पाचच दिवस. '

तेव्हा मी मरण जवळ आलेले जाणून म्हणालो, ' भगवान, माझे जीवन थोडे (राहिले) आहे, आता मी काय करू ? '

दया येऊन आचार्य म्हणाले वत्स, दु:ख करू नको. दीक्षा स्वीकार, कारण एका दिवसातही, ती स्वर्गमोक्षाला कारण आहे. '

' तेव्हा मी दीक्षा स्वीकारली. आचार्यांच्या सांगण्यावरून मी येथे आलो. शुक्लध्यानाच्या अग्नीने कर्मइंधन जाळून मी केवली झालो. ' असे सांगून (मन–वचन–काय) योगांचा विरोध करून पुनर्जन्माला कारणीभूत असलेल्या कर्मांचा क्षय करून सिंहकेसरी मोक्षाला गेले.

देवांनी केवलींच्या शरीराचा (अग्नि) संस्कार केला. कुलपतीने यशभद्रआचार्यांपाशी दीक्षा स्वीकारली

दमयंती आचार्यांना म्हणाली, ' मलाही दीक्षा द्या. '

आचार्य म्हणाले, 'भद्रे. तुला नळाबरोबर सुखोपभोग भोगावयाचे आहेत, म्हणून तुला दीक्षा देता येत नाही.

सकाळी पर्वतावरून उतरून आचार्य तापसपुराला गेले. अशा रीतीने धर्मपरायण दमयंती गात्रे (धुळीने) मलिन झाली असताना सात वर्षे पर्वतगुंफेत राहिली. एकदा तिने प्रवाशाचे बोलणे ऐकले ते असे– 'दमयंती, मी अमक्या ठिकाणी तुझ्या पतीला पाहिले.' तेव्हा आनंदित होऊन ती गुंफेतून बाहेर पडली. आवाजाच्या रोखाने ती धावू लागली आणि दूर गेली. अरण्यात

सापडली. नळ न दिसल्यामुळे ती रडू लागली. 'हाय ! मी काय करू ? कोठे जाऊ ?' असा आक्रोश करीत ती त्याच पर्वतगुंफेकडे जाऊ लागली. जबडा पसरून 'मी तुला खाईन' असे म्हणत राक्षसीने तिला पाहिले. शीलप्रभावामुळे तीही तिला खाऊ शकली नाही. स्वप्नात पाहिल्याप्रमाणे राक्षसी अदृश्य झाली.

पुढे जात असताना तिला पाणी नसलेली विहीर दिसली. तहानेने व्याकुळ झालेल्या तिने टाचेचा प्रहार करताच शीलप्रभावामुळे तेथे पाणी निर्माण झाले. ते पिऊन ती पुढे निघाली. (चालून) दमल्यामुळे अशोक झाडाखाली ती विसावा घेऊ लागली.

तांड्यातील लोकांनी तिला पाहिले. ते म्हणाले, 'भद्रे, आपण कोण आहात ? देवीप्रमाणे दिसता.'

ती म्हणाली, 'मी मानवी (स्त्री) आहे. तांड्यातून चुकल्यामुळे अरण्यात भटकते आहे. मला तापसपुरचा रस्ता दाखवा.'

ते म्हणाले, 'आम्ही पाणी आणण्यासाठी येथे आलो आहोत. सूर्य अस्तगिरिशिखरावर गेला असल्यामुळे आम्ही आपल्याला मार्ग दाखवू शकत नाही. पण जर आमच्या बरोबर आलात तर तांड्यासह आपल्याला कोणत्या तरी नगराकडे नेऊ.'

त्यांच्या बरोबर ती तांड्यामध्ये गेली. तेथे तिला पाहून धनदेव सार्थवाहाने विचारले, 'तू कोण आहेस ?'

ती म्हणाली, 'मी व्यापाऱ्याची मुलगी आहे. पित्याच्या घरी जात असताना अरण्यात झोपल्यावेळी पतीने सोडून दिले. बांधवाप्रमाणे असलेल्या आपल्या माणसांसह आले आहे.'

सार्थवाह म्हणाला, 'मी अचलपुरास जाणार आहे. तेव्हा मुली, तूही चल. तुला फुलाप्रमाणे काळजीपूर्वक नेईन.'

तेव्हा तिला प्रमुख वाहनात बसवले. सार्थवाह निघाला. झाडावरील प्रफुल्लित फुलांमध्ये चमकणारे परागपुंज असलेल्या गिरिकुंजामध्ये त्याने निवास केला.

रात्री तांड्यातील माणूस पंचनमस्काराचा जप करताना दमयंतीने ऐकले. तिने सार्थवाहाला म्हटले, 'जो नमस्कार जपतो तो श्रावक माझा साहधर्मी आहे. त्याला भेटण्याची इच्छा आहे.'

पितृवत्सल असल्याप्रमाणे तिला घेऊन तोही तेथेच गेला. वस्त्रावर चितारलेल्या तमाल झाडाच्या पानाप्रमाणे निळाचा जिन–बिंबाला वंदन करीत असताना तो श्रावक दिसला. दमयंतीनेही जिनप्रतिमेला वंदन केल.

श्रावकाला प्रणाम करून तिने विचारले, 'हे (बंधु), कोणत्या तीर्थंकराची ही प्रतिमा आहे ?'

तो म्हणाला, 'ऐक, पृथ्वीसुंदरीचा रत्नजडित मासपट्टाच अशा कांचीनगरीमध्ये राहणारा मी व्यापारी आहे. तेथे एकदा धर्मगुप्त नावाचे ज्ञानसंपन्न मुनी आले. त्यांना वंदन करून मी विचारले, 'मला मुक्ती केव्हा मिळेल ?' त्यांनी म्हटले, 'स्वर्गातून च्युत होऊन मिथिलानगरीत प्रसन्नचंद्र राजा होऊन एकूणविसावे तीर्थंकर (भगवान) मल्लिनाथांच्या पाशी संयम स्वीकारून सिद्ध होशील'' तेव्हापासून (भगवान) मल्लिनाथांच्या विषयी माझ्या (मनात) भक्ती निर्माण झाली. वस्त्रावर चितारलेल्या (भगवान) मल्लिनाथांच्या प्रतिमेची मी पूजा करतो.'

त्यानेही विचारल्यावर दमयंतीने आपली हकिगत सांगितली.

तो म्हणाला 'हे सार्थवाह तुला पित्याप्रमाणे आहेत आणि मी भाऊ आहे. तेव्हा तू खेद करू नयेस.'

सकाळी सार्थवाह अचलपुरास गेला. तेथे दमयंतीला सोडून तो दुसरीकडे गेला. तहानेलेली ती नगरातील विहिरीपाशी आली. स्त्रियांना ती जलदेवीप्रमाणे दिसली.

६१. पाण्याच्या तीरावर तिचा डावा पाय गोधाने (एक जातीचा साप) धरला. आपल्या जातीच्या भेटीकरिता निश्चितपणे दुःखावर दुःख येते.

तिने नमस्कार (मंत्रा) चा जप केला. त्याच्या प्रभावाने गोधाने पाय सोडला. पाणी पिऊन ती विहिरीपासून निघून गेली. खिन्न मनाने

विहिरीकाठी बसली. तेथे शत्रूरूपी नागांना गरुड असा ऋतुपर्ण राजा होता. त्याची चंद्राप्रमाणे उज्वल कीर्ती असलेली चंद्रयशा राणी होती. तिच्या दासींनी दमयंतीला पाहिले. अत्यंत रूपवती म्हणून आश्चर्यचकित झालेल्या त्यांनी राणीला सांगितले. तिनेही तिला आपल्या पाशी आणविले. दमयंतीला पाहून, 'ओहो ! काय हे सौंदर्याचे माधुर्य ! ' असे म्हणत तिला गाढ आलिंगन दिले. दमयंतीनेही राणीच्या पायांवर लोटांगण घातले. तिने विचारले. ' भद्रे, तू कोण आहेस ? '

तिने सांगितले, ' मी वणिकपुत्री. पतीने मला अरण्यात सोडले.'

राणी म्हणाली, 'चंद्रावती कन्येप्रमाणे माझ्या वाड्यात निश्चित राहा.'

राणीही नगराच्या परिसरात दीन, अनाथादींना दररोज दान देवबीत असे. एकदा दमयंती म्हणाली, ' महाराणी, यदा कदाचित (श. पण जर) माझे नाथ भोजनाकरिता येथे आले, तर मी दानशाळेत दान देईन. '

राणीने तिची (दानशाळेत) नेमणुक केली. पतीला पाहण्याच्या इच्छेने ती दान देई. याचकांना ती विचारी, ' अशा रूपाचा पुरुष तुम्ही पाहिला का ? ' एके दिवशी दानशाळेत असताना तिने कोतवालांनी बांधलेल्या चोराला नेत असताना पाहिले. तिने कोतवाळांना विचारले, ' याने काय विनष्ट केले आहे ? '

त्यांनी सांगितले, ' चंद्रावती (राजकन्ये) चा रत्नकरंडक याने चोरला आहे. म्हणून याला ठार करण्यात येत आहे. '

चोरही दाती तृण ( श. बोट ) धरून व प्रणाम करून दमयंतीला म्हणाला, ' देवी, माझी सुटका करवी. आपल्याला मी शरण आलो आहे.'

दयावती दमयंतीने शीलशापना केली. शील प्रभावाने चोराचे बंधन तुटले. कोतवाल निघून गेले.

ही हकिकत ऐकून राजा तेथे आला आणि दमयंतीला म्हणाला, ' मुली, तू हे अयोग्य काय केलेस ? चोराचे रक्षण करणे योग्य नाही.

कारण दुष्टाचे पारिपत्य करावे आणि शिष्टांचे पालन करावे हा राजधर्म आहे. पण जर का हा केला नाही, तर सर्वत्र अव्यवस्था माजून मात्स्यन्याय सुरू होईल.'

दमयंतीने विनविले, 'महाराज, मन दयेने भारल्यामुळे मी असे केले. तेव्हा माझ्या या अपराधाची क्षमा करा. कारण दुष्ट रोगाप्रमाणे याची पीडा माझ्या मनात संक्रमित झाली.'

तेव्हा राजाने चोराला सोडले. तोही 'आपण माझी माता आहात,' असे म्हणत रोज दमयंतीला प्रणाम करी. एकदा तिने त्याला विचारले, 'तू कोण आहेस ? कोठून आला आहेस ?'

त्याने सांगितले, 'मी तापसपुरात राहणाऱ्या वसंत व्यापाऱ्याचा पिंगल नावाचा सेवक आहे. जुगारादि व्यसनासक्त असल्यामुळे मी वसंत व्यापाऱ्याच्या घरी भगदाड पाडून सारभुत द्रव्य चोरले.

६२. ते आपल्या हाती घेऊन जीवाच्या भीतीने रस्त्यावरून पळत असता चोरांनी मला लुटले. दुराचरणींच्या बाबतीत चांगले किती असणार ?

६३,६४. येथे येऊन मी या राजाची सेवा करू लागलो. चंद्रवती (राजकन्ये)च्या दागिन्यांची पेटी पाहून कसे तरी माझे मन विचलित झाले. ती हस्तगत करण्याची इच्छा निर्माण झाली. विशेषत: दुराचरणी माणसांचा स्वभाव बदलत नाही.

६५. जाड (शं. विपुल) वस्त्र अंगावर पांघरून ती (दागिन्यांची पेटी) घेऊन जात असताना बाह्य गोष्टीवरून अंतरंग जाणण्यात (श. इंगित) कुशल असलेल्या राजाने मी चोर म्हणून ओळखले.

राजाच्या आज्ञेने कोतवालांनी मला बांधले. वध करण्याकरिता नेत असता मी आपणाला पाहिले. ओळख पटून मी आपणाला शरण आलो. आपण माझी सुटका केली. पुन: पुन: आपण तापसपुरातून निघून गेल्यानंतर वसंत व्यापारी जेवणाचा त्याग करून सात दिवस (उपवाशी) राहिला. यशभद्र आचार्यांनी व बाकीच्या लोकांनी समजावल्यावर आठव्या दिवशी

त्याने भोजन केले. एकदा मौल्यवान (श. प्रमुख) नजराणा घेऊन व्यापारी (राजा) कूबराच्या भेटीस गेला. त्यानेही संतुष्ट होऊन त्याला छत्रादि लांछित तापसपुराचे अधिपत्य दिले. तोही (मंगल) तूर्य (वाद्यां)च्या निनादाने दिशा निनादित झाल्या असताना तापसपुरात आला. तेथे राज्याचे पालन करू लागला. दमयंतीने पिंगलाला पापरूपी पर्वताला वज्रासमान असलेली (मुनि) दीक्षा घ्यायला लावली.

एकदा भीमराजाने ऐकले ते असे — 'द्यूतात नळाला जिंकून कूबराने राज्य अलंकृत केले आहे. दमयंतीला घेऊन नळाने महारण्यात प्रवेश केला. तो जिवंत आहे की मेला हे कोठेही समजले नाही. ते ऐकून मोठाल्या अश्रुधारांनी उरोज भिजवीत पुष्पदंती रडू लागली. भीम-राजाने त्यांच्या शोधासाठी स्वामीकार्य करण्यात कुशल असलेल्या हरिमित्र नावाच्या तरुणाला पाठविले. क्रमाने तो अचलपुरामध्ये ऋतुपर्ण राजापाशी गेला.

चंद्रयशा राणीने त्याला विचारले, 'माझ्या पुष्पदंती भगिनीचे कुशल आहे ना ?'

तरुण म्हणाला, 'महाराणींचे नेहमीचेच कुशल आहे. परंतु नळ–दमयंती राज्यभ्रष्ट झाल्याचे ऐकून महाराणींच्या मनाला अत्यंत दुःख झाले आहे.'

चंद्रयशा म्हणाली, 'काय म्हणतोस ?'

तरुणाने सुरवातीपासून नळाच्या द्यूताची हकिकत सांगितली. तेव्हा चंद्रयशेला रडत असलेली पाहून राजपरिवार रडू लागला.

सर्वजण शोकाकुल पाहून भुकेने व्याकूळ झालेला तरुण दानशाळेत गेला: तेथे भोजनाकरिता बसला. दानाधिकारिणी दमयंतीस पाहून आनंदित होऊन त्याने तिला प्रणाम केला (आणि म्हटले), 'देवी, उन्हाळ्यातील वेलीप्रमाणे काय ही आपली दीनावस्था ! सद्भाग्यानेच आपण जिवंत दिसलात. आता सर्वांचे कुशल होईल.'

असे म्हणून भुकेची व्यथा विसरून तो चंद्रयशा (राणी) पाशी गेला. त्याने म्हटले, 'आपले अभिनंदन करतो. दमयंती (देवी) आपल्या दानशाळेत आहेत.'

ते ऐकून चंद्रयशा तेथे आली. तिने दमयंतीला गाढ आलिंगन दिले आणि म्हटले, 'धिःकार असो माझा! सामान्य माणसांच्या (लक्षणाहून) भिन्न असलेल्या (शरीरावरील) सामुद्रिक लक्षणांनी (असामान्यत्व) सांगूनही मी तुला ओळखले नाही. वत्से, मी (प्रेम) वत्सल असूनही स्वत.ला लपवून तू माझी का वंचना केलीस? माझ्यापाशी तुला (सांगायला) काय लाज वाटली? सांग, तू नळाचा त्याग केलास का? की नळाने तुला सोडले? खरोखर नळानेच तुला सोडले (असावे). संकटात सापडलेल्या पतीचा जर तू त्याग केला असतील, तर खात्रीने सूर्य पश्चिमेला उगवला असता. हाय! नळा, गुणसंपन्न असलेल्या हिचा त्याग करताना तुला (कशी) लाज वाटली नाही? तुझ्या कुळा (चारा) ला हे योग्य आहे का? मी तुझे दुःख (वाटून) घेते. (तुझ्या भेटीदाखल) मी हर्षदान करते. तुला ओळखले नाही या माझ्या अपराधाची क्षमा कर. झळाळणाऱ्या कांतीचे उगमस्थान असा तुझ्या भालावरील तिलक कोठे आहे? तेव्हा चंद्रयशेने दमयंतीचा भालप्रदेश आपल्या चुंबनाने (श. थुंकीने) पुसला.

६६. तेव्हा दमयंतीच्या भालावरील तिलक ढगातून मुक्त झालेल्या सूर्याप्रमाणे आणि आग्नीतून बाहेर काढलेल्या सुवर्ण गोळ्या-प्रमाणे झळाळू लागला.

६७. आता राणीने आपल्या हातांनी देवीच्या प्रतिमेप्रमाणे तिला स्नान घातले. आणि उत्तम कपडे परिधान करावयास लावून तिला राजापाशी नेले.

६८. चंद्रयशा आणि दमयंती दोघीही राजाच्या सभेमध्ये बसल्या. त्यावेळी विश्वाचा दीप असा सूर्य अस्तास गेला.

६९. काजळाने भांडे भरावे त्याप्रमाणे काळोखाने आकाशमंडळ व्यापले. तरीही राजसभेमध्ये अंधाराचा लवलेशही पसरला नाही.

७०. तेव्हा राजा (आश्चर्याने) म्हणाला. 'खरोखर सूर्य अस्त पावला आहे. येथे दीप (लावला) नाही वा अग्नी (पेटविला) नाही. मग हा असा प्रकाश कोठून आला ?'

तेव्हा राणीने प्रभापुंजाचे उगमस्थान असा दमयंतीच्या भालावरील स्वाभाविक तिलक दाखविला. राजाने कुतूहलाने तो आपल्या हाताने झाकला. तेव्हा पर्वतगुंफेप्रमाणे राजसभा अंधाराने भरून गेली. हात काढून राजाने राज्यभ्रष्टादि हकिगत तिला विचारली. चेहरा खाली करून रडत तिने ती सर्वत्र (हकिगत) सांगितली. राजानेही आपल्या उत्तरीयवस्त्राने डोळे पुसत म्हटले, 'बाळे, रडू नको. विधी देवदानवावरही प्रभाव गाजवितो.'

इतक्या अवधीत सूर्याच्या किरणजालाप्रमाणे तेज पसरलेल्या देवाने सभेत येऊन व हात जोडून दमयंतीला म्हटले, 'मी पिंगल चोर आपल्या आदेशाने (मुनी) चरित्र धारण करून विहार करीत तापसपुरास गेलो, तेथील स्मशानात (ध्यान) प्रतिमेत राहिलो. चितेतील अग्नीने जळत असता धर्मध्यानात मग्न होऊन पंचपरमेष्ठी मंत्राचा जप (श. स्मरण) करीत व पूर्वपापांची निंदा करीत मी मरण पावलो आणि पसरलेल्या तेजाने झळाळणारा देव झालो. अवधी ज्ञानाने पूर्व जन्म जाणून जीविताचे रक्षण करून दीक्षा घ्यायला लावल्यामुळे परोपकारिणी अशा आपल्या दर्शनासाठी (येथे) आलो आहे. तेव्हा आपण सुखाने दीर्घकाळ राहा.' तेव्हा सात कोटी सुवर्ण (मोहरां) चा वर्षाव करून देव अदृश्य झाला.

अशा रीतीने देवाने दाखवलेले सत्कर्माचे प्रत्यक्ष फळ पाहत असताना ऋतुपर्णाने जिनधर्म स्वीकारला.

त्या वेळी तरुणाने (योग्य समय जाणून) त्यास विनंती केली, 'महाराज दनयंती (देवीं) ना पित्याच्या घरी पाठवा.'

चंद्रयशेनेही म्हटले, 'असेच होऊ दे.'

तेव्हा ऋतुपर्ण राजाने निरोप दिला आणि दययंती चतुरंगिनी सेनेबरोबर निघाली. ती येत असलेले ऐकून प्रेमाच्या धाग्याने बांधलेला भीम राजा पुष्पदंतीसमवेत (स्वागताकरिता) सामोरा गेला. आईवडिलांना पाहून आनंदित मनाने रथातून उतरून दमयंती त्यांच्या पायांवर पडली.

७१. (भेटण्यास) अत्यंत आतूर झालेल्या आणि दीर्घ काळाने भेटलेल्या त्यांच्या डोळ्यातील ओघळलेल्या पाण्याने चोहोकडे जमिनीवर चिखल झाला.

७२. यमुना व गंगेच्या संगमाप्रमाणे मातेला आलिंगन देऊन व मातेच्या गळी पडून दमयंती मोठमोठ्याने कितीतरी वेळ रडत राहिली.

७३. तेव्हा निर्मळ पाण्याने कमळासारखे चेहरे धूवून त्या एकमेकीला सर्वच सुखदुःखे सांगू लागल्या.

७४, आता दमयंतीला मांडीवर बसवून पुष्पदंती म्हणाली, 'आमचं सत्कृत्य उदयाला आलं म्हणून तू जिवंत दिसलीस.

७६ बाळे, आमच्या प्रासादात सुखाने राहत असताना आपल्या पतीला भेटशील (श. पाहशील). खरोखर माणूस जिवंत असला (म्हणजेच) दीर्घ काळाने का होईना चांगल्या गोष्टी प्राप्त करतो.'

प्रसन्न झालेल्या राजाने तरुणाला पाचशेहे गावे दिली. नगरात जाऊन दयमंती आली म्हणून त्याने सात दिवस विशेषकरून देव व गुरूंची पूजा केली. आठव्या दिवशी तो दमयंतीला म्हणाला. 'जेणे करून आपले नळाशी (लौकरात) लौकर मिलन घडेल तसे मी करीन'

तेव्हा दमयंतीला सोडून अरण्यात भटकत असताना नळाला वनाच्या झुडुपातून धूर निघत असलेला दिसला. तो वर धावत जात असलेल्या भ्रमरसमूहाप्रमाणे काळा आणि पंख असलेल्या पर्वताप्रमाणे आकाशात फिरत असलेला दिसला. निमिषमात्रात तो भडकलेल्या ज्वालांप्रमाणे विकराळ आणि जमिनीवरून उसळलेल्या विजेच्या पुंजक्याने पिंगट बनलेल्या ढगासारखा वाटत होता. तेव्हा वडवाग्नी पेटला. जळत असलेल्या वेळूंचा तडतड आवाज पसरला. अनेक प्रकारच्या श्वापदांचे भयंकर ओरडणे सुरू झाले झाडे जळू लागली. तेथे नळाने शब्द ऐकले, 'इक्ष्वाकुकुलरूपी कमलांना (फुलविणारा) सूर्यबिंब असलेल्या नळा, माझे रक्षण कर.' उगीचच करुणातिशयाने आवाजाच्या रोखाने जात असता 'रक्षण कर, रक्षण कर' असे म्हणणारा नाग त्यास वनामध्ये

दिसला. 'याला माझे नाव व कुळ कसे समजले ? नागाला मानवी भाषा कशी येते ?' अशा (विचाराने) मन आश्चर्याने भारले असता त्याला काढण्याकरिता त्याने उत्तरीय फेकले ते जमिनीवर पडताच नागाने आपल्या शरीराने त्याला वेढले. विहीरीतील दोराप्रमाणे त्यास ओढून वडवाग्नीचा स्पर्श झाला नाही अशा ठिकाणी नागास ठेवण्याची इच्छा करत असलेल्या नळाच्या हाताला त्याने दंश केला. त्या नागास जमिनीवर टाकून नळ म्हणाला, 'कृतघ्न अशा तू चांगले केलेस की उपकार केलेल्या माझ्यावर असा (प्रति) उपकार केलास. जो दूध पाजतो त्याला तुझ्या जातीच्या (नागा) ने दंश करावा, हे खरेच आहे.' अशा रीतीने बोलत असताना नागाच्या विषाच्या तीव्र प्रभावाने नळाचे शरीर दोर लावलेल्या धनुष्याप्रमाणे बुटके झाले. पिशाच्च्याप्रमाणे केस पिंगट झाले, उंटाप्रमाणे ओठ लांबट झाले, रंकाप्रमाणे हातपाय लहान झाले आणि नळ गणपतीप्रमाणे लंबोदर झाला. आपण सर्वांगाने बेढब झालो आहे हे पाहून नळाने विचार केला, 'हाय ! या (बेढब) रूपाने माझे जीवन व्यर्थ आहे. तेव्हा परलोकाला हितकारक अशी दीक्षा स्वीकारतो.'

अशा विचारात नळ गढून गेला असताना नाग तेज चोहोकडे पसरत असलेला आणि रत्नजडित कुंडले चमकत असलेला देव झाला तो म्हणाला, 'दुःख सोड. मी तुझा पिता निषध आहे. तेव्हा तुला राज्य देऊन मी दीक्षा स्वीकारली. (विधीपूर्वक चारित्र्य पाळून) मेल्यावर मी ब्रह्मलोकात देव झालो. मी अवधिज्ञानाने ही तुझी दशा जाणली. (तुझ्यावरील) प्रेमाने मी नागाचे रूप घेऊन जखमेवर मीठ चोळावे त्याप्रमाणे दुर्दशेत पडलेल्या तुझ्या शरीराला विद्रुप केले. तू कडू औषध प्यावे तसे ते हितावह मानावेस. कारण तू सर्व राजांना सेवक केले आहेस. तुझ्या विद्रुपपणामुळे न ओळखून ते तुला त्रास देणार नाहीत. आता दीक्षा घेण्याचीही इच्छा करू नकोस. अद्यापी तुला तितक्याच पृथ्वीचा (पूर्वीप्रमाणे) उपभोग घ्यावयाचा आहे. मीच तुला मुनिधर्म (श. चारित्र्य) स्वीकारावयाचा (योग्य) समय सांगेन. हे बेलफळ आणि हा रत्नकरंडक तोवर घे आणि प्रयत्नपूर्वक सांभाळ.

जेव्हा आपल्या (मूळ) स्वरूपाची इच्छा करशील, तेव्हा हे बेलफळ फोड, त्यामध्ये देवदूष्य (म्ह. दैवी कपडे) पाहशील. हा रत्नकरंडक उघड, त्यात (मौक्तिक) हार, इत्यादि अलंकार दिसतील. ते दैवी कपडे आणि अलंकार परिधान केल्यावर त्याचक्षणी स्वतःचे रूप तुला प्राप्त होईल.'

नळाने देवाला दमयंतीची हकिगत विचारली. त्याने तिच्या प्रमुख सतित्वाविषयी सर्व सांगितले. देव नळाला म्हणाला, 'असा अरण्यात का भटकतोस ? जेथे जाण्याची इच्छा आहे तेथे तुला नेतो '

नळ म्हणाला, 'मला सुंसुमार नगरात न्या.'

तेव्हा तसे करून देव स्वर्गाकडे गेला. नळही त्या नगरातील बागेत भूषणभूत असलेल्या जिनमंदिरातील (भगवान) नमिनाथांच्या (वीतराग प्रतिमेला) वंदन करून सुंसुमार नगराच्या वेशीपाशी आला. तेथे (साखळदंडांने) बांधलेला खांब उखडून वाऱ्याच्या झुळकीनेही अंबारी हलत असताना, वर उडत असलेल्या पक्षांनाही सोंडेने पकडत आणि वनातील झाडे मोडत उन्मत्त हत्ती फिरू लागला.

तेथे दधिपर्ण राजाने तटावर चढून म्हटले, 'जो या उन्मत हत्तीला वश करील, तो जे मागेल ते त्याला मी देईन '

बुटक्या नळाने म्हटले, 'मी वश करावे, असा तो उन्मत्त हत्ती कोठे आहे ?' असे बुटका म्हणत असताना ढगाप्रमाणे चित्कारत हत्ती त्या ठिकाणी आला. बुटका वेगाने त्याच्याकडे धावला. हत्तीच्या सोंडेचा प्रहार् चुकवण्यात कुशल असलेल्या त्याने समोर, मागे आणि बाजूला सरकत हत्तीला दमवले. गरुडाप्रमाणे झेप घेऊन तो त्याच्या खांद्यावर बसला. पूर्वीच्या जागी गळ्याभोवती दोर टाकून व पायांमध्ये अडकवून तो त्याच्या गंडस्थळावर (जोराच्या) चपराकी मारू लागला. हातात असलेल्या अंकुशानें बुटका हत्तीला पुढे हाकू लागला. लोकांनी (हर्षाने) जयजयकार केला. राजाने सोन्याची शृंखला दिली. हत्तीला वश करून नळाने त्याला बांधावयाच्या खांबापाशी नेले. तेव्हा उतरून प्रणाम न करता नळ दधिपर्ण राजाच्या आसनावर बसला. राजाने म्हटले,

'हे बुटक्या, हत्तीला (वश करण्याच्या) शिक्षणकुशलतेहून दुसरेही कसले ज्ञान तुला आहे का ?'

बुटका म्हणाला, 'मी दुसरे काय सांगू? जर सूर्यपाक (म्ह. सूर्यकिरणाच्या उष्णतेवरील) स्वयंपाक पाहण्याची इच्छा असेल, तर करतो.'

तेव्हा प्रासादात जाऊन राजाने बुटक्याला मूग, तांदुळ, भाजी, मसाला आदि दिले. सूर्यप्रकाशावर भांडी ठेवून सूर्यविद्येचे स्मरण करीत बुटक्याने दिव्य भोजन तयार केले. कल्पवृक्षाने दिल्याप्रमाणे ते सुस्वादू भोजन राजाने परिवारासह खाल्ले. राजा (समाधानाने) उद्गारला, 'ओहो ! काय ही भोजन तयार करण्यातील कुशलता ! ओहो ! काय हे रसातील माधुर्य ! ओहो ! काय ही (यातील) विशेष मोहकता ! ओहो ! काय हे सर्व इंद्रियांना होणारी हितावहता ! असे भोजन करणे नळच जाणत होते. तेव्हा नळ (महाराजां)ची सेवा करीत असताना याचा मला केव्हापासूनचा परिचय आहे. तेव्हा हे बुटक्या, तू नळ आहेस का ? अथवा नळ असे विद्रूप नव्हते. दोनशेहे योजन अंतरावर असणाऱ्या त्यांचे (येथे) कसे येणे होईल ? भारतार्धाच्या त्या अधिपतीचे एकाकीपण कोठून संभवणार ? ' तेव्हा, संतुष्ट झालेल्या राजाने बुटक्यास वस्त्रालंकार, एक लाख रुप्याची नाणी आणि पाचशेहे गावे दिली. बुटक्याने ते सर्व घेतले (मात्र) पाचशेहे गावे घेतली नाहीत. राजाने बुटक्याला म्हटले, 'मी तुला दुसरे काही देऊ का ?'

बुटका म्हणाला, 'जर असे असेल, तर शिकार आणि दारू आपल्या राज्यात बंद करावे.'

त्याच्या बोलण्याला बहुमान देण्याकरिता राजानेही तसेच केले.

एकदा (दधिपर्ण) राजाने बुटक्यास विचारले, 'तू कोण आहेस व कोठून आलास ?'

बुटका म्हणाला, 'कोशलामधील नळ महाराजांचा मी हुंडिक नावाचा आचारी आहे. मी त्यांच्याजवळ कला शिकलो. कुबरभावाने

(जुगारात) राज्य जिकल्यामुळे नळमहाराज दमयंतीला घेऊन अरण्यात गेले. नळ तेथेच मरण पावले. तेव्हा मी आपल्याकडे आलो आहे; पण गुणाची पारख नसणाऱ्या कपटाने भरलेल्या कूबरापाशी राहिलो नाही.'

७६. तेव्हा नळाच्या मरणाची हकीकत ऐकून दधिपर्णराजा वर्णनही करता येणार नाही असा (अत्यंत) दुःखी झाला.

७७. दधिपर्णाने एकदा दमयंतीच्या पित्याकडे कसल्यातरी मित्र कार्याकरिता दूत पाठविला.

भीम (राजा)नें दूताचा (योग्य) सत्कार केला. एके प्रसंगी (बोलत असता) दूत (सहज) राजासमोर म्हणाला, 'माझ्या स्वामीपाशी नळाचा आचारी आहे. तो नळाच्या शिकवणीने सूर्यकिरणावर स्व पाक करणे जाणतो.'

ते ऐकून दमयंती पित्यास म्हणाली, 'तात, हेराला पाठवून आचारी कसा आहे ते समजून घ्या. नळाशिवाय सूर्यकिरणावर स्वयंपाक करणे दुसऱ्या कोणालाही माहित नाही. यदाकदाचित वेषांतर केलेला हा नळच असावा.'

७८. तेव्हा राजाने स्वामिकार्यात तत्पर अशा कुशल नावाच्या ब्राह्मणाला दधिपर्णाच्या आचार्याचे (खरे) स्वरूप जाणण्याकरिता पाठविले.

७९. शुभ शकुनांनी उत्साह द्विगुणीत होऊन तो सुंसुमार नगरात आला. बुटक्याला पाहून तो त्याच्यापाशी बसला आणि (आशा निष्फळ झाल्याने) उदास झाला.

८०. कुशल विचार करू लागला, 'कोठे तो नळ आणि कोठे हा बुटका! कारण मेरू (पर्वत) व मोहरी यांमध्ये जे अंतर आहे तेच यांच्यामध्येही आहे.'

तेव्हा मनात कसला तरी उपाय योजून कुशल गाऊ लागला,

८१. 'हाय! खरोखर महासती दमयंतीला अरण्यात झोपलेल्या स्थितीत ज्याने सोडून दिले, तो नळ एकटाच (या जगामध्ये) निष्ठुर, निर्दय असा भ्याड पुरुष आहे.'

पुनः पुन्हा गाइले जाणारे ते (गीत) ऐकून दमयंतीची आठवण करीत आसवे गाळीत नळ रडू लागला.

'का रडतोस ?' असे कुशलाने विचारले.

बुटका म्हणाला, 'तुझे करुणरसमिश्रित गीत ऐकून मला रडू आले.' बुटक्याने त्याला घडलेली हकिकत विचारली.

कुशलाने नळाच्या जुगारापासून सुरवात करून दमयंती विदर्भास येईपर्यंतची हकिकत सांगितली. पुनः ब्राह्मणाने विचारले, 'हे ठेंगण्या (मित्रा), दधिपर्णराजाच्या दूताने भीमराजासमोर तू सूर्यकिरणावर स्वयंपाक करणारा आचारी आहेस असे सांगितले. सूर्यकिरणावर स्वयंपाक करण्यास समर्थ असा नळच आहे अशा विचाराने दमयंतीने वडिलांना विनवून तुला पाहण्याकरिता मला पाठविले. तुला पाहून मी विचार करू लागलो, 'कोठे (हा) अतिशय कुरुप ठेंगणा आणि कोठे (तो) सर्व अंगोपांगांनी सुंदर असा नळ ! कोठे (हा) माशांच्या समूहास गट्ट करणारा बगळा नि कोठे तो जनतेला आनंदित करणारा चंद्रमा ! तसेच मी येत असताना समोर अनेक (शुभ) शकुन झाले, तेहि व्यर्थ ठरले, कारण तू नळ नाहीस.'

दमयंतीच्या प्रेमाच्या आधीन झाल्यामुळे बुटक्याने ब्राह्मणाला आपल्या घरी नेले. कारण —

८२. ज्या ठिकाणी प्रेमाचे माणूस राहतं त्या दिशेकडून आला असताना कावळा सुद्धा आनंद देतो. मग आपल्या आवडीच्या माणसानं पाठवलेल्या माणसाविषयी काय (सांगावं) ?

'महासती दमयंती आणि थोर पुरुष नळ यांच्याविषयी सांगणाऱ्या तुझे मी काय स्वागत करू ? ' असे म्हणून त्याने भोजनादि सत्कार केला. दधिपर्णाने दिलेले (सर्व) अलंकार (त्यास) देऊन टाकले.

नंतर कुशल सुखरूपपणे कुंडिणपुरास आला. मदोन्मत्त हत्तीस वश करण्यापासूनची बुटक्याची सर्व हकीकत त्याने भीम (राजा)स सांगितली.

दमयंती म्हणाली, 'तात, खरोखर तो नळ आहे. परंतु कोणत्यातरी दोषी अन्नामुळे किंवा कर्मदोषामुळे तो विद्रूप झाला आहे.

८३. हत्ती (वश करण्याच्या) शिक्षणातील कुशलता, सूर्यकिरणावर स्वयंपाक करण्यातील सामर्थ्य आणि अत्यंत विस्मयकारक दान (करण्यातील उदारता) हे (असामान्य गुण) नळाशिवाय दुसरीकडे सापडणार नाहीत.

तात, कोणत्यातरी निमित्ताने त्या बुटक्यास येथे आणा, म्हणजे त्याची मी स्वत: पारख करीन.'

भीम (राजा) म्हणाला, 'मुली, (तुझे) खोटेच स्वयंवर सुरू करून मी दधिपर्णाला निमंत्रण देतो. दधिपर्ण पूर्वीच तुझ्यावर मोहित झाला होता, पण तू नळाला वरलेस. तेव्हा आता तुझे स्वयंवर ऐकून तो ताबडतोब येईल आणि त्याच्याबरोबर बुटकाही (येईल). जर तो नळ असेल तर तुला दुसऱ्याला देत असताना सहन करणार नाही. तसेच नळ घोड्याचे तंत्र (श. हृदय) जाणणारा आहे. जर तो बुकटा नळ असेल तर रथाच्या घोड्यांना प्रेरणा देण्यावरून जाणता येईल. नळाच्या प्रेरणेमुळे घोडे वेगामध्ये वाऱ्याप्रमाणे होतात. जवळचा दिवस (मुहूर्त म्हणून) सांगेन. जर तेथे बुटका वेगाने येईल तर तो खरेच नळ होय. सामान्य मनुष्यही पत्नीविषयीचा अपमान सहन करीत नाही, मग नळ–राजाविषयी काय (सांगावे)?'

भीम (राजा) ने दधिपर्णाकडे दूत पाठविला. त्याने चैत्र शुद्ध पंचमीला दयमंतीचे स्वयवर असल्याचे सांगितले.

दधिपर्ण विचार करू लागला, 'मला दमयंती हवीशी आहे. परंतु ती दूर देशी आहे, सकाळी पंचमी (सुरू). तेथे जाणे शक्य नाही. तेव्हा मी काय करू?' अशा (विचारामुळे) दधिपर्ण थोडाशा पाण्यातील माशाप्रमाणे दु:खी झाला.

बुटक्याने विचार केला, 'दमयंती महासती असल्यामुळे ती दुसऱ्या पुरुषाची इच्छा करणार नाही. जरी इच्छा केली तरी देखील

मी जिवंत असताना तिला कोण घेईल ? तेव्हा दधिपर्णास मी तेथे सहा प्रहरात नेतो, म्हणजे त्याच्याबरोबर मलाही प्रसंगाने तिला पाहता येईल.' बुटका दधिपर्णास म्हणाला, 'आपण का दुःखी आहांत ? कारण सांगा. खरोखर रोगाविषयी न सांगता रोग्याची चिकित्सा करता येणार नाही.'

राजा म्हणाला, 'नळाने देवांच्या नगरात सुखाने प्रवेश केला आहे. (म्ह. नळराजा मरण पावला आहे.) पुनः दमयंती आता स्वयंवर करणार आहे. दमयंतीविषयी माझ्या (मनात) अभिलाषा आहे. विदर्भ देश दूर आहे. मध्ये सहा प्रहर आहेत. दूत पुष्कळ दिवसांनी आला मग मी इतक्या वेळात कसा जाईन, या काळजीने मला स्वस्थता वाटेना.'

बुटका म्हणाला, 'जातिवंत घोडे जुंपलेला रथ मला द्या, म्हणजे सकाळी मी तुम्हाला तेथे नेतो,'

'हा सामान्य मनुष्य नव्हे, तर विद्याधर अगर देव असावा.' असा विचार करून त्याच्या सांगण्याप्रमाणे राजाने रथ दिला.

तो (प्रवासास) तयार करून नळ दधिपर्णाला म्हणाला, 'रथात चढा.'

८४. राजा, पानाचे तबक वहाणारा सेवक, छत्र धरणारा, दोघे चवऱ्या ढाळणारे असे हे पांचजण व सहावा बुटका त्या रथात चढले.

८५. बेलफळ आणि रत्नकरंडक वस्त्राने कमरेस बांधून देव व गुरूंची आठवण करून बुटक्याने घोड्याला हांकले.

८६. घोड्यांचे तंत्र जाणणाऱ्या नळाने उत्कृष्ठ घोड्यांना हाकल्यावर स्वामीच्या इच्छेप्रमाणे विमान चालविल्याप्रमाणे रथ पुढे निघाला.

८७. आता रथाच्या वेगाने (निर्माण झालेल्या) वाऱ्याने उडवल्यामुळे दधिपर्णाचे (उत्तरीय) वस्त्र (खाली) पडले; जणू त्याने हर्षातिषयाने नळावरून ते ओवाळून टाकले.

दधिपर्णाने हे बुटक्यास सांगितले.

बुटका हसून म्हणाला, 'आपले वस्त्र कोठे (पडले) आहे (असे आपणास वाटते)? वस्त्र पडल्यापासून रथ पंचवीस योजने (पुढे) आला आहे. आणि पुनः हे घोडे मध्यमप्रतीचे आहेत. पण जर का उत्तम असते, तर एवढ्या वेळात हाकले असता पन्नास योजनावर रथ आला असता.'

बिभीतक झाड पाहून दधिपर्ण सांगू लागला, 'येथील बिभीतकावर जितकी फळे असतील ती न मोजताच त्यांची संख्या मी जाणतो. परत येताना मी तुला गंमत दाखवतो.'

बुटका म्हणाला, 'मी सारथ्य करीत असताना कालक्षेपाविषयी भिऊ नका. एका मुठीच्या प्रहाराने आपल्यापुढे सगळी फळे पाडतो.'

राजा म्हणाला, 'पहा आश्चर्य. तू (फळे) पाड. फळे अठरा हजार आहेत.'

तेव्हा बुटक्याने मुठीच्या प्रहाराने ती पाडली. दधिपर्णाने मोजली तो तितकीच भरली. (नळ) राजाने दधिपर्णाला घोड्यांच्या तंत्राची विद्या दिली. दधिपर्णापासून त्याने फळे मोजण्याची विद्या घेतली.

सकाळी रथ कुंडिनपुराजवळ आला दधिपर्णाचा चेहरा उमलेल्या कमळाप्रमाणे प्रफुल्लित झाला.

इतक्या अवधीत रात्र संपत असता (म्ह. पहाटे) दमयंतीने स्वप्न पाहिले. तिने विधीपूर्वक पित्यास सांगितले ते असे–' निर्वृतिदेवी कोशलातील बाग येथे आणत असलेली मला दिसली. देवीच्या सांगण्यावरून मी आंब्याच्या झाडावर चढले. देवीने माझ्या हातात प्रमुख कमळ दिले. अगोदर (वर) बसलेला पक्षी झट्कन् खाली पडला.'

भीम (राजा) म्हणाला, 'मुली, शुभ स्वप्न आहे. निर्वृतिदेवी म्हणजे तुझे अगणित पुण्य उदयाला आले. कोशलातील बाग म्हणजे कोशलराज्याची प्राप्ती. आंब्याच्या झाडावर चढणे म्हणजे नळाशी मिलन होणे. अगोदर आरूढ झालेला पक्षी (खाली) पडणे म्हणजे कूबराचे राज्यावरून भ्रष्ट होणे. पहाटे (स्वप्न) पाहिलेस म्हणजे आजच तुला नळ भेटणार.'

त्याचवेळी दधिपर्ण नगर–वेशीत आला. मंगल नावाच्या सेवकाने भीम (राजा)स सांगितले. भीमाने येऊन मित्राप्रमाणे त्यास अलिंगन दिले. त्यास उत्कृष्ट निवासस्थान देण्यात आले. भोजनादि सत्कार करून भीम म्हणाला, 'आपल्यापाशी सूर्य–किरणावर स्वयंपाक करणारा आचारी आहे, त्यास मला दाखवावे.'

दधिपर्णाने भोजन करण्याकरिता बुटक्यास आज्ञा केली. त्याने पण कल्पवृक्षाप्रमाणे त्याचक्षणी भोजन केले. दधिपर्णाच्या आग्रहाने आपल्या परिवारासह भीमराजा ते पक्वान्न जेवला. त्याचा अस्वाद घेण्याकरिता त्या पक्वान्नाने भरलेले ताट आणवून दमयंती जेवली. रसास्वादामुळे बुटका (म्हणजे) नळच अशी तिची खात्री झाली. ती म्हणाली, "पूर्वी ज्ञानाचे आगर असलेल्या आचार्यांनी, 'या भारतामध्ये नळाशिवाय सूर्यकिरणावर भोजन करणे दुसऱ्यास माहित नाही,' असे मला सांगितले होते. तेव्हा खरोखर हा नळच होय: पुन्हा खरी गोष्ट म्हणजे त्या बाबतीत कोणत्या तरी कारणाने हा बुटका झाला असावा. भोजन ही नळाची एक परीक्षा, दुसरीही आहे नळाच्या बोटाचाही स्पर्श होताच मी रोमांचित होते. तेव्हा बुटका मला बोटाने स्पर्श करू दे. तरी पण याही परीक्षेत तो उतरेल.' तेव्हा बुटक्यास विचारले, 'तू नळ आहेस का ?'

तो म्हणाला, 'कोठे तो भरदार छातीचा नळ आणि कोठे मी लोकांच्या डोळ्यांना दुःख देणारा बुटका !'

तरी पण अत्याग्रहामुळे त्याने बोटाने दमयंतीच्या वक्षस्थळास स्पर्श केला. तेवढ्याही बोटाच्या स्पर्शाने पण हृदयातील हर्षोत्कर्षाने काकडी (वरील काट्या) प्रमाणे दमयंतीचे शरीर रोमांचित झाले. 'तेव्हा झोपले असताना मला आपण सोडून गेलात. आता, प्राणनाथ, आपले दर्शन झाले, कोठे जाल ? असे म्हणत तिने नळाला आपल्या महालाच्या आतमध्ये नेले आणि विनविले, 'आपले (मूळचे) रूप प्रकट करा.'

तेव्हा बेलफळ व रत्नकरंडकातील वस्त्रालंकार परिधान करून नळ आपल्या मूळच्या रूपात (प्रकट) झाला. त्यास पाहून दमयंतीचे अंतःकरण प्रसन्न झाले.

भीम ( राजा ) नेहि नळास जाणून आपल्या सिंहासनावर बसविले. ' आपण स्वामी आहात, तेव्हा मी काय करावे ती आज्ञा करा, ' असे म्हणत हात जोडून भीम समोर उभा राहिला.

दधिपर्णाने नळास विनविले, ' आपण स्वामी असूनही अजाणपणे मी अनुचित आज्ञा केली त्याची मला क्षमा करा. '

दमयंतीने बोलावल्यावरून ऋतुपर्ण राजा चंद्रयशेसमवेत आला. तसेच तापसपुराधिपती वसंतश्रीशेखर (ही) (आला). भीमराजाने त्यांचा (योग्य) सत्कार केला.

एकदा सर्वच जण भीमराजाच्या सभेत बसले असताना पसरत असलेल्या अलौकिक तेजाने झळाळत असलेला देव (तेथे) आला. हात जोडून त्याने दमयंतीला म्हटले ' खरे म्हणजे मी तपस्व्यांचा कुलपती. आपण मला बोध केला. जिनधर्माच्या प्रभावाने मरून मी सौधर्मकल्पात देव झालो.' असे (म्हणून) सात कोटी सुवर्ण (मोहरां)चा वर्षाव करून तो आपल्या ठिकाणी गेला.

भीम, ऋतुपर्ण, दधिपर्ण, वसंत, इत्यादी राजांनी एकत्र येऊन नळाला राज्यावर बसविले. नळाच्या आज्ञेने त्यांनी आपापली सेना एकत्र केली. त्यांच्या समवेत हत्ती मोठमोठ्याने गर्जना करीत असताना, घोड्यांच्या खुरक्षेपांनी जमिनीवरील धुळीने आकाश व्यापले असताना आणि रथांच्या चाकांच्या घरघर आवाजाने शत्रू मंडळांच्या कर्णयुगुलांना बधिर करीत नळ कोशलानगरीपाशी पोहोचला. दूताला पाठवून कुबराला कळविले ते असे – ' तुझ्या भेटीकरिता नळ आला आहे. तो अयोध्येच्या परिसरात राहिला आहे. ' नळ आल्याचे ऐकून अग्नीच्या आलिंगनाप्रमाणे कुबराचे शरीर अत्यंतिक संतापाने वेढले.

८८. नळाने दूताच्या तोंडून त्याला सांगितले, ' माझ्याशी युद्ध कर. तुझी ( राज ) लक्ष्मी माझी होऊ दे, अथवा माझी ( राज ) लक्ष्मी तुझी होऊ दे. '

८९. आता युद्धाला घाबरलेल्या कुबराने पुन: द्यूत ( खेळावयास ) सुरुवात केली. सत्कृत्यात बलवान असलेल्या नळाने त्याचे सर्व हिराऊन घेतले.

९०. 'कुबर क्रूर असला तरी माझा धाकटा भाऊ आहे,' अशा ( विचाराने ) क्रोधरहित होऊन निर्मळ गुणाच्या नळाने पूर्वीप्रमाणे त्याला युवराज केले.

९१. आपले राज्य मिळवून दमयंतीशी संयोग घडून आलेल्या नळ राजाने उत्कंठित होऊन अयोध्यानगरीतील जिनमंदिरांचे दर्शन घेतले. ( म्ह. जिन मंदिरांतील जिनप्रतिमांना वंदन केले. )

९२. अनेक प्रकारच्या नजराण्यासह राजांनी नळाच्या चरणकमलांना प्रणाम केला. त्याने अनेक हजार वर्षे भारतावर्षाचे राज्य केले.

९३. एके दिवशी तेजाने झळकत असलेला निषधदेव स्वर्गातून आला आणि वैषयिक सुखांचा उपभोग घेण्यात रमलेल्या नळाला असे म्हणाला.

९४. 'रागादी चोराकडून विवेकधन लुटले जात असताना जो स्वतःचेही रक्षण करीत नाही तो तू ( योग्य ) पुरुष आहेस का ?

९५. दीक्षा घेण्याचा ( योग्य ) समय तुला सांगेन, असे मी पूर्वी म्हणालो होतो. तेव्हा आता मानव जन्माच्या झाडाचे फळ असा संयम ( म्ह. मुनिधर्म ) स्वीकार.'

९६. असे म्हणून देव अदृश्य झाला. आता निर्मळ अवधिज्ञानाचे रत्नाकर असलेले जिनभद्र नावाचे आचार्य तेथे आले.

९७. तेव्हा दमयंतीसमवेत जाऊन नळाने त्यांना वंदन केले आणि त्यांच्या समोर बसून हात जोडून असे विचारले.

९८. 'भगवान, आम्ही पूर्व जन्मात काय केले म्हणून असे (विशाल) राज्य मिळवून आम्ही घालवले आणि पुन: सर्वच प्राप्त केले ?'

९९, १००. आचार्य म्हणाले, 'सौम्य, ऐक, याच जंबू द्विपात भारत वर्षात आष्टापद पर्वताजवळ कधीही परचक्राचे आक्रमण न झालेले संगर

( नांवाचे ] नगर होते. तेथे कार्मणाने दिग्वधूंना अंकित केलेला मम्मण ( नावाचा ) राजा होता.

त्याची राणी वीरमती. एकदा तिच्यासह शिकारीला निघालेल्या राजाने नगराबाहेर तांड्या बरोबर जात असलेल्या मूर्तिमंत धर्मच अशा प्रशांत संतोषप्रमुख विशिष्ट गुणांनी युक्त असलेल्या मुनिवर्यास पाहिले. शिकारीच्या महोत्सवामध्ये विघ्न करण्यास तत्पर असा हा मला अपशकुन आहे.' असा विचार करीत त्याने कळपातून हत्तीला धरावे तसे त्यास तांड्यातून धरले आणि परतून आपल्या वाड्यात नेले. बारा घटका त्याची विटंबना केली. नंतर दया येऊन राजाने आणि राणीने त्याला विचारले. ' तू कोठून आलास आणि कोठे निघाला आहेस ? '

मुनीने म्हटले, 'अष्टापद पर्वतावरील शिरोमणी अशा जिन प्रतिमांना वंदन करण्यासाठी मी तांड्यासह रोहीटकपुरातून निघालो आहे. मंत्राने नागांचे विष उतरावे त्याप्रमाणे असे मुनीचे बोल ऐकून त्यांचा क्रोध नाहीसा झाला. त्यांचा भद्रभाव जाणून मुनीने जीवदयाप्रमुख धर्म सांगितला. जन्मापासून धर्माचे बोल कानावर न पडल्यामुळे त्यांच्यात काही धर्मपरिणाम झाला. अन्न-पाणी इत्यादीने त्यांनी मुनीला आहार दिला. त्यास कितीतरी दिवस ठेऊन घेतले. रोग्यांना औषध द्यावे तसे त्यांना धर्मज्ञान दिल्यावर त्यांनी निरोप दिला आणि मुनी आष्टापदास गेला. अशा रीतीने मुनीच्या संपर्काने आत्मजागृत झालेल्या त्यांनी कृपणांनी द्रव्याचे करावे तसे प्रयत्नपूर्वक श्रावकधर्माचे पालन केले.

एकदा शासनदेवतेने धर्मात स्थिर करण्याकरिता वीरमतीला अष्टपदपर्वताकडें नेले. तेथे आपआपल्या वर्ण-प्रमाणयुक्त असलेल्या विविध रत्नांनी नटवलेल्या आणि देव-दानव ज्यांचा महिमा गात आहेत अशा तीर्थंकरांच्या प्रतिमा पाहून तिला अत्यंत प्रसन्नता वाटली. तेव्हा वंदन करून ती आपल्या नगराकडे आली. त्या वीरमतीने, ' मी हे महातीर्थ वंदिले, ' अशा श्रद्धेने प्रत्येक जिनाकरिता वीस वीस आयंबिल (तपे) केली.

१०१. वीरमतीने चोवीस जिनप्रतिमांना योग्य असे वर माणके जडावलेले सुवर्णमय असे मनोहर तिलक करविले.

१०२. एके दिवशी आपल्या परिवारासमवेत अष्टापदपर्वतावर जाऊन तिने जिनांची अभिषेक, विलेपन नैवेद्यादींनी पूजा केली.

१०३. तिने भक्तिभावाने जिनप्रतिमांच्या कपाळावर ते तिलक लावले. जणू तिच्या पुण्याच्या झाडाला ती फुले शोभून दिसताहेत.

१०४. तेथे तीर्थामध्ये आलेल्या चारणमुनी आदींना योग्य दान देऊन तिने (आयंबिल) तपाचे उद्यापन केले.

१०५. आपला मानवी जन्म कृतकृत्य झाला, वैभव सफल झाले आणि जीवनही कृतार्थ झाले असे मानत वीरमती पुनः आपल्या नगराला पोहोचली.

१०६. अशा रीतीने भिन्न शरीर असूनही चित्त एकरूप झालेल्या आणि जिनधर्मात मन गुंतवलेल्या त्या दोघांचाही पुष्कळ काळ निघून गेला.

१०७. जीवांचा मरणात शेवट होत असल्यामुळे मम्मण राजा योग्य वेळी समाधीमरणाने मरून सौधर्म स्वर्गात गेला.

१०८. त्याच्या मागून मरून वीरमती तैथेच मनोहर देवी झाली. चंद्र मावळल्यावर ज्योत्स्ना किती वेळ मागे राहणार ?

१०९, ११०. मम्मणाचा जीव तेथून (म्ह. सौधर्मस्वर्गातून) च्युत होऊन येथे जंबूद्वीपातील भारतामधील बहलीदेशाला कंकणाप्रमाणे भूषणभूत अशा पोतनपुरामध्ये धम्मिलास गोपाळाच्या रेणुका नावाच्या पत्नीच्या (पोटी) धन्य नावाचा निर्मळ गुणांनी परिपूर्ण असा पुत्र जन्मला.

१११. वीरमतीचा जीव पुनः धूसरी नावाची त्याची पत्नी झाला. धन्य आपल्या म्हशी (नगरा) बाहेर जाऊन चारू लागला.

११२, ११३. आता पावसाळा सुरू झाल्यावर ढग मोठाली वृष्टी करत असताना म्हशींना चारण्याकरिता डोक्यावर छत्र धरून धन्य अरण्यात गेला. त्याने तेथे उग्र तपाने कृश झालेले, कायोत्सर्ग ध्यानात पर्वताप्रमाणे निश्चल उभे असलेले मुनी पाहिले.

११४, ११५. भक्तिभावाने त्यांच्या डोक्यावर छत्र धरून त्याने मुनीवरील (पावसाच्या) वृष्टीचे कष्ट निवारण केले. आता वृष्टी थांबल्यावर धन्याने वंदन करून मुनींना म्हटले, 'आपण येथे कोठून आलात ?' मुनी म्हणाले, 'भद्र, मी पंडुदेशाहून आलो आहे.

११६. तेथे आलेल्या माझ्या गुरूंना वंदन करण्याकरिता मी लंकापुरीकडे चाललो आहे. पण सात दिवस (श. रात्री) वर्षाव करीत असलेल्या ढगाने रोखले.'

११७. धन्य म्हणाला, 'प्रभू, आता जमीन चिखलाने दुर्गम झाली आहे. तेव्हा या माझ्या म्हशीवर बसून नगरामध्ये चला.'

११८. मुनी म्हणाले, 'मुनींना वाहनावर आरूढ होणे अयोग्य आहे' तेव्हा धन्यबरोबर मुनी हळूहळू नगराकडे गेले.

११९. धन्य मुनींना म्हणाला, 'तोवर आपण एक क्षणभर येथे थांबा, की जोवर घरातून मी दूध घेऊन येईन.'

१२०. घरी जाऊन व दूध घेऊन धन्य त्वरित आला आणि त्याने भक्तीने महामुनींना दुधाने पारणे करावयास लावले.

१२१. आपल्या पत्नीसह धन्याने मुनिपाशी श्रावकधर्म स्वीकारला. मुनी पावसाळ्यात (चातुर्मासाकरिता) तेथेच पोतनपुरात राहिले.

१२२. नंतर (मुनी) दुसरीकडे गेले. धन्याने धूसरीसह दीर्घकाल श्रावकधर्म पाळून नंतर संयम (म्ह. श्रमणधर्म) स्वीकारला.

१२३. सात वर्षे त्या (श्रमणधर्मा)चे पालन करून धन्य प्रियेसह मरण पावला. (मरणसमयी) वासनावश झाल्यामुळे (ती दोघे) हिमवंतावर (हरिण) युगुल झाली.

१२४. तेथून मेल्यावर तो सौधर्म स्वर्गात क्षीर डिंडिरा देव झाला आणि ती त्याची पत्नी क्षीरडिंडिरा देवी झाली.

१२५. सौधर्मातून च्युत होऊन तो तू धन्य नळ झालास. राजा, ही धूसरीच तुझी दमयंती प्रिया झाली.

१२६. पूर्वजन्मात जे मुनींना (आहार) दान दिले आणि श्रावकधर्म (आणि नंतर श्रमणधर्म) पाळला त्याचे फळ म्हणून सुंदर रूप व हे राज्य तुला मिळाले.

१२७. ही दमयंतीही, खरोखर त्या (श्राविका व साध्वी) धर्माच्या परिणामाने तुझी प्रिया झाली. विशेष (आयंबिल) तप व (जिनप्रतिमांना) तिलक प्रदान केल्यामुळे कोणीही तिला (नळाच्या विरहावस्थेत अरण्यात) झागाळले नाही.

१२८. पुन: त्या मुनीची जी बारा घटका 'विटंबना केली, त्यामुळे तू बारा वर्षे राज्यभ्रष्ट झालास.'

१२९. हे आचार्यांचे बोलणे ऐकून नळ राजा संसारविरक्त बनला. त्याने गुणांनी मोहक झालेल्या पुष्कर नावाच्या पुत्रास राज्यावर बसविले.

१३०. दमयंती बरोबर आचार्यांच्या पाशी नळाने दीक्षा घेतली, श्रुतज्ञानाचे अध्ययन केले, तपाचरण केले आणि दु:सह परीषह सहन केले.

१३१. आता कर्मांच्या विचित्रपणामुळे आणि (काम) विकार जिंकणे कठिण झाल्यामुळे नळ मुनी दमयंतीशी वैषयिक भोग भोगण्याची इच्छा करू लागला.

१३२. तेव्हा आचार्यांनी त्याचा त्याग केला. (देव झालेल्या) पित्याने येऊन त्यास बोध केला. (मुनि) व्रत पाळणे अशक्य झाल्यामुळे तो (मारणांतिक) अनशन करू लागला.

१३३. नळावर अनुरक्त झाल्यामुळे दमयंतीनेही ते (अनशन) केले. तेव्हा मरून नळ कुबेर झाला. पुनः दमयंती त्याची पत्नी झाली.

१३४. व्रत किंचित भंग झाल्यामुळे त्यांना क्षुद्र देवत्व प्राप्त झाले. (विधिपूर्वक तपाचरणाने) कर्मांचा क्षय करून दोघेही क्रमाने मोक्ष मिळवतील.

• • •

# शब्दार्थ

अक्क–(अर्क) सूर्य
अच्च–(अर्च्) पूजा करणे.
अद्धाण–(अध्वन्) मार्ग.
अपवग्ग–(अपवर्ग) मोक्ष.
आउज्ज–(आतोद्य) वाद्य.
आयंस–(आदर्श) आरसा
आलाणक्खंभ–(आलानस्तम्भ) हत्तीस बांधावयाचा खांब.
ईहियत्थ–(ईहितार्थ) इच्छितार्थ
उदग्ग–(उदग्र) अत्यंत
कइवय–(कतिपत) काही
कम–(क्रम) पाउल
कम्मण–(कार्मण) जादू
कयन्नु–(कृतज्ञ) कृतज्ञ
करवाल–(करवाल) तलवार
करह–(करभ) उंट.
कवडकूव–(लपटकूप) कपटाची विहीर, कपटाने परिपूर्ण.
किवाण–(कृपाण) तलवार
कुलिस–(कुलिश) वज्र
कोयंड–(कोदण्ड) धनुष्य.
कंकेल्लि–(कंकेली) अशोक.
कंचुलिया–(कञ्चुलिका) कात, काचोळी
कंठकंदल–(कण्ठकन्दल) नाजुक गळा.
खत्त–(दे.) भगदाड.
गयणमणी–(गगनमणी) आकाशरत्न, सूर्य
गरह–(गर्ह्) दूषण देणे, तिरस्कार करणे.
गंजिय–(गञ्जित) गांजलेला.
चाय–(त्याग) त्याग.
चिक्कार–(चीत्कार) चीत्कार, रथाचा खरखर आवाज.
चूयपायव–(चूतपादप) आंब्याचे झाड.
छारुक्कुरूड–(क्षारुत्करट) उकिरडा
जूह–(यूथ) कळप.
तक्कर–(तस्कर) चोर.
तरणि–(तरणि) सूर्य.
तलार–(दे.) कोतवाल.
तिमि–(तिमि) तिमा मासा.
थेव–(स्तोक) थोडेसे.
दइय–(दइत) प्रियकर, पती.
दुकूल–(दुकूल) दुकूल झाडाच्या सालीपासून बनवलेले वस्त्र.
देसणा–(देशना) प्रवचन.
धम्मेल्ल–(धम्मिल्ल) वेणी, केशसंभार
नग्गोह–(न्यग्रोध) वटवृक्ष
निट्ठीवण–(निष्टीवन) थूक.
निप्पच्चूहं–(निष्प्रत्यूहं) संकटमुक्त

निम्महण–(निर्मथन) विनाश
नियर–(निकर) समूह, संग्रह.
निसीह–(निशीथ) मध्यरात्र.
पच्चाएस–(प्रत्यादेश) मात करणे
पच्चूस–(प्रत्यूष) सकाळ
पडिवत्ति–(प्रतिपत्ति) आदरसत्कार
पणिहि–(प्रणिधि) गुप्त दूत.
पण्हि–(पार्ष्णि) टाच
पत्थिव–(पार्थिव) राजा
पन्नग–(पन्नग) साप
पयं–(पयः) पाणी.
परिरंभ–(परि+रभ्) आलिंगन.
देणे.
पाडिसिद्धि–(दे.) प्रतिस्पर्धा
पायव–(पादप) झाड.
पार (शक्) शक्य असणे.
पारद्धि–(पापर्धि) पारध, शिकार.
पाहुणो–(प्राघुण) पाहुणा.
पाहेय–(पाथेय) शिदोरी
बंधुर–(बन्धुर) मोहक, सुंदर
भासुर–(भासुर) झळाळणारे,
तेजस्वी.
भोग–(भोग) फडा, शरीर.
मत्तंड–(मार्तण्ड) सूर्य
मयगल–(मदकल) हत्ती
मायंद–(माकन्द) आंब्याचे झाड
रिंखव–(रिंख्) फिरणे.

रिंछोली–(दे.) रांग
रोलंब–(रोलम्ब) भ्रमर
वम्मह–(मन्मथ) मदन
वसण–(वसन) वस्त्र
(व्यसन) संकट
वारण–(वारण) हत्ती.
वारिभिंगार–(वारिभृङ्गार)
पाण्याची झारी.
विच्छड्ड–(विच्छर्द) ऐश्वर्य, वैभव.
विच्छुरिय–(विच्छुरित) आच्छादित
वितत्थ–(वित्रस्त) घाबरलेला.
विवन्नो–(विपन्नः) मरण पावला.
विसज्ज–(विसर्जय्) निरोप देणे.
विसहर–(विषधर) साप.
वेला–(वेला) किनारा
वेव–(वेप्) कापणे, थरथरणे.
सउण–(शकुन) पक्षी.
सत्थर–(स्रस्तर) शय्या.
सरिसव–(सर्षप) मोहरी.
संदण–(स्यन्दन) रथ
सित्थं–(सिक्थम्) प्रत्यंचा.
सिहंडि–(शिखण्डि) मोर.
सीलसावण–(शीलशापन)
शीलाची शपथ.
सुरिंदसरासण–(सुरेन्द्रशरासन)
इंद्रधनुष्य.
सूवसार–(सूपकार) स्वयंपाकी.
हरि–(हरि) सिंह.

० ० ०

जागे व्हा बसून राहा. झोपल्याने तुम्हाला काय फायदा ?
– सुत्तनिपात – २–२२–१

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.,

( मुख्य कचेरी सातारा. )
– सर्वत्र ११८ शाखा –
विदेशविनिमयासह सर्व बँकिंग सेवासुविधा.
आपुलकीनं वागणारी माणसं !

शत्रू, मित्र व मध्यस्थाशी विवेकाने वागा – ( नागकुमारचरिउ ३–३ )
१०० वर्षाच्या अनुभवांनी जगभर नावाजलेला

# -: बीकन :–

पूर्वीचे वर्दिग्टन सिम्सन मोनो ब्लॅन्क पंपसेटस्
**वितरक :- बी. के. जगदाळे आणि कं.**
जय–विजय टॉकीज समोर, सातारा.

शरीराचे भोगच माणसाच्या दुःखाला कारण आहेत. ( करकंडचरिउं ९–४ )

# रूपसमीर क्लॉथ एम्पोरीयम्

शिवाजी सर्कल, सातारा. फोन २०६१

धर्मच माणसामध्ये श्रेष्ठ आहे या जन्मीही. परजन्मीही.
दीघनिकाय – ३–४–२

# जंबापा निलकंठापा आवटे

तंबाखू अँड जनरल कमिशन एजण्ट
निपाणी (बेळगांव)

आवुस, मी प्रत्यक्ष वर्तमान सोडून दूर भविष्याकडे धावणार नाही
संयुत्तनिकाय–१–१–२०

# श्री. रामचंद्र विष्णू मंगरूळे, सराफ

१२१ सदाशिव पेठ, सातारा–१

---

तृष्णेचा सर्वथा अंत होणेच निर्वाण म्हटले आहे. सुत्तनिपात–५–६८–४

# पद्मोदय ट्रेडिंग कार्पोरेशन

आसामच्या दर्जेदार चहाचे एकमेव विक्रेते.

ट्रेडमार्क–१) चक्रवर्ती २) रत्नदीप आणि ३) लालकुंभ ब्रँड चहा

प्रोप्रा. श्री वसंतराव डी. पाटील, निपाणी (बेळगाव)

---

एकदा चूक झाली असताना पुनः तिची पुनरावृत्ती करू नये.
दसवेयालियसुत्तं–८–३१

# चक्रवर्ती ट्रेडिंग कंपनी

सुप्रसिद्ध आसाम चहाचे व्यापारी, निपाणी

ट्रेडमार्क–१) हॉटेल किंग ब्रँड चहा, २) लालपान ब्रँड चहा,
३) श्रीफळ ब्रँड चहा.

प्रोप्रा. – जिनदास पारिसा मालगावे.

---

भावनाशून्य माणूस कधीही सिद्धी प्राप्त करू शकत नाही. भावपाहुड–४

अनेक डॉक्टर व ग्राहकांनी प्रशंसिलेले

फुटलेल्या पायावर अत्यंत गुणाकारी आयुर्वेदिक

# अमृत मलम

बनविणार–नागांवकर बंधू, निपाणी (बेळगांव)

पुण्यशाली माणूस जाईल तेंथे सर्वत्र सफलता आणि सुख प्राप्त करतो.
विमानवत्थु - २ : ३४ : ४००

# बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखाना

## शुभेच्छा–

दौलतनगर [ता. पाटण, जि सातारा ]

अ. पां. पाटील
चेअरमन

सं. बा. घोरपडे
कार्यकारी संचालक

---

संपत्तीने कोणाला दीर्घायुष्य प्राप्त होत नाही. संपत्तीने कोणी म्हातारपणाचा नाशही करू शकत नाही. मज्झिमनिकाय २–३२–४

फोन नं. ५८

सतत २५ वर्षे ग्राहकांचे पसंतीस आलेली

# जी. एस्., विलास व मंगल बिडी

अवश्य वापरा

मे. विलास बिडी फॅक्टरी, जी. एस्. कुरबेट्टी अॅण्ड ब्रदर्स
**ब्रँच**–जमखंडी ] **निपाणी,** बेळगांव

वैडुर्य रत्नासमान चमकणाऱ्या काचेच्या तुकड्याचे मोल जवाहिऱ्यासमोर काही सुद्धा असत नाही. उत्तरज्झयणसुत्तं – २०–२

**लक्ष्मीसेन एजन्सीज**

वितरक :– धूतपापेश्वर लि. पनवेल, मुंबई.
सी–५२५ राजाराम रोड, कोल्हापूर २
( नगर वाचन मंदीर जवळ )

---

मोहामुळेच मी आणि माझे विकल्प निर्माण होतात (पवयणसार–२–८८)

**मे. श्रीमंदर जिन्नापा मेळवेका अॅन्ड ब्रदर्स**

जनरल मर्चंट अॅण्ड कमिशन एजंट ( फोन – १७६ )

**निपाणी** ( बेळगांव )

---

क्षमेहून अधिक मोठे काहीसुद्धा नाही. ( विसुद्धीमग्ग – ९–२ )

**–: न्यू महावीर क्लॉथ स्टोअर्स :–**

**फॅन्सी कापडांचे व्यापारी**

**राजू टेलर्स** ( जेण्टस् स्पेशालिस्ट )

पृथ्वीवंदन को. ऑ. हौ. सोसायटी, ना. म. जोशी मार्ग,
मुंबई – ४०००१३ **प्रोप्रा. एस्. एस्. देशमाने**

---

वाईट कर्माचे वाईट फळ मिळते. ओववाइयसुत्तं – ५६

**–: युनायटेड स्टील वर्क्स :–**

० वेल्डर्स ० फेब्रिकेटर्स ० कॉन्ट्रॅक्टर्स

६६३ गुरुवार पेठ, सातारा.

योग्य प्रकारे आचरण केलेला धर्म सुख देतो. सुत्तनिपात– १ : १०१२

# मे. बी. डी. ढणाल

हार्डवेअर अँड पेन्टस मर्चंट,

दलाल पेठ निपानी ( बेळगांव )

प्रज्ञेचा डोळाच सर्व श्रेष्ठ आहे. इतिवुत्तक – ३ : १२

# मे. लोकमान्य ग्रंथ भांडार

फोनः – २२०६

मोतीचौक, सातारा

इंग्लिश मिडियमची पुस्तके, कॉलेज व शालेय पुस्तके,
धार्मिक ग्रंथ, ललित वाङ्मय व स्टेशनरीचे विक्रेते
शाळा व कॉलेजची जुनी पुस्तके घेतली व विकली जातील.

मूर्खांपासून दूर राहणे, पंडितांचा सत्संग करणे, पूज्य जनांचा सत्कार करणे उत्तम मंगल आहे. खुद्दकपाठ– ५ : २

# मे० पी. जी. गुंडे अँड सन्स

प्रिंटर्स, स्टेशनर्स, अकौंट बुक मॅन्युफॅक्चरर्स

**निपाणी** ( बेळगाव )

निर्ग्रंथ प्रवचन सहजसिद्ध आहे. ते स्वयं प्रकाशमान आहे.
निशीथभाष्य – ३१

सरकारमान्य दुकान नं. २१ – C. – १५.

# महालक्ष्मी क्लॉथ स्टोअर्स

अधुनिक कापडांचे व्यापारी, दु. नं. ५,
नाम जोशी मार्ग, शिवाजी नगर, मुंबई – ४०००१३

असंतुष्ट माणसास येथे तेथे सर्वत्र भीती वाटते (आयारंगचुण्णि १-२-२)

सातारा जिल्ह्यातील कराड, फलटण, मायणी, पाचगणी, दहिवडी, आदि ६० शाखांमार्फत शहरी व ग्रामीण जनतेची–ठेवीवर भरघोस व्याज, लोकमंगल, आवर्तक, पेन्शन, लॉकर, आदि. योजना द्वारे-अविरत सेवा करणारी अग्रेसर बँक

**दि सातारा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सातारा**

शिवाजी सर्कल, सातारा.

| | | |
|---|---|---|
| **त्र्यं. शा. भोसले** | **वि. वा. पाटील** | **वि. म. वीर** |
| व्यवस्थापक | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

---

विनयाने इंद्रियांवर विजय मिळविता येतो.

नागकुमारचरिउ– ३ : ३

सर्व प्रकारचे कापड मिळण्याचे विश्वसनीय केंद्र

| | |
|---|---|
| **धनलक्ष्मी एंटरप्राइझ** | **लाहोटी ब्रदर्स** |
| पोवई नाका, **सातारा.** | खण आळी, **सातारा.** |

---

वाणीने बोललेले दुष्ट आणि कठोर वचन जन्मजन्मांतराचे वैर आणि भयास कारण होते. दसवेयालियसुत्तं–९–३–७

**मंगल हार्डवेर मार्ट**

हार्डवेअर, मशिनरी पार्टस्, पेण्टस् मर्चण्ट, निपाणी ( बेळगांव )

प्रोप्रा. बापुसाहेब नारायणराव ढणाल

---

ज्ञान नसेल, तर चारित्र्यही नाही. – व्यवहारभाष्य ७-२१७

**दत्ता शंकर पिलके**

फोन –२२०७

किराणा भुसार स्वस्त आणि स्वच्छ
माल मिळण्याचे खात्रीलायक ठिकाण
५७/१ गिते बिल्डिंग, सातारा–१

प्रज्ञेने तृप्त झालेल्या माणसाला तृष्णा आपल्या आधीन
करू शकत नाही. जातक – १२:४६७:४३

सतत ५० वर्षे लोकदरास पात्र ठरलेल्या आमच्या

**स्पेशल, रॉयल व पिस्तूल बिडयाच ओढा**

–: स र्व त्र मि ळ ता त. :–

**नकली मालापासून सावध राहा**

बिडी कारखानदार – **पिस्तुल बिडी वर्क्स प्रा. लि.,**
१०९ साखरवाडी, **निपाणी** ( बेळगांव )

– ट्रेडमार्क होल्डर्स –
मे. एच. साळवे कदम आणि कंपनी
**निपाणी** ( बेळगांव )
– बिडीचे वितरक –

१. एच्. व्ही. के. एजन्सीज
ब्रॅन्च **निपाणी** कोल्हापूर, मिरज
२. मे. साळवे कदम एजन्सीज
ब्रॅन्च बेळगांव, हुबळी

---

जन्माबरोबरच मनुष्याच्या मुखात कुऱ्हाड निर्माण होते. अज्ञानी दुर्वचन
बोलून स्वतःच छेद करतो. सुत्तनिपात–३–३६–१

**आण्णाप्पा बापू शेट्टी**

**– सुप्रसिध्द तंबाखूचे व्यापारी –**

**निपाणी [ बेळगाव ]**

स्वतःच अनाथ असताना दुसऱ्याचा नाथ कसा होशील ? उत्तर–२०–१३

# प्रविण किराणा स्टोअर्स

किराणा व भुसारी मालाचे होलसेल व रिटेल व्यापारी

गुरुवार पेठ, निपाणी.

प्रोप्रा. :– संघवी कांतिलाल धोंडिलाल शाह

---

ज्ञान मानवी जीवनाचे सार आहे. ( दंसणपाहुड - ३१ )

# मे. एस्. एस्. आडके अॅन्ड सन्स

मोटार स्पेअर पार्ट अँड टायर डिलर्स

पी. बी. रोड निपाणी ( बेळगांव )

---

आजच आपल्या कर्तव्य कर्मात मग्न होणे आवश्यक आहे. उद्याला मृत्यूही येईल. कोणी सांगावे ?

( मुज्झिमनिकाय – ३–३१ : १ )

# मे महावीर भूपाल देसाई

५६० शाहूपुरी कोल्हापूर.

स्टॉ १) महाराष्ट्र अॅग्रो इंडस्ट्री कार्पो. लि.

२) झुआरी अॅग्रो केमिकल्स लि. गोवा

३) फर्टिलायझर कार्पो. ऑफ इंडिया लि. मुंबई.

४) बागलकोट उद्योग लि.